
# हिमकोंदणातील हिरा

सूर्यकांत कुलकर्णी



REFBK-0029624
REFBK-0029624

संदर्भ/भू-प्रवास
८२४
२९६२४

# हिमकोंदणातील हिरा

सूर्यकांत कुलकर्णी

REFBK-0029624

मेहता पब्लिशिंग हाऊस

■ हिमकोंदणातील हिरा / प्रवासवर्णन
© सूर्यकांत कुलकर्णी,
इ-१० वीज मंडळ वसाहत,
चतुःश्रृंगीच्या पायथ्याशी,
सेनापती बापट रोड,
पुणे ४११०५३.

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे ३०. ✆ ४७६९२४

■ अक्षरजुळणी
सॅक लेसर,
पुणे.

■ मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.,
कोथरूड,
पुणे २९.

■ प्रथमावृत्ती
ऑगस्ट, १९९८

■ मुखपृष्ठ मांडणी
बाबू उडुपी

■ किंमत
ऐंशी रुपये

■ ISBN 81-7161-783-2

# मनोगत

रसिक वाचकांपुढे माझे हे पुस्तक ठेवताना खूप आनंद होतोय्. मानवी जीवनाच्या अल्प आयुष्यात समाधान वाटावे, असे जे मी अनुभवले, त्यात तुम्हां सर्वांना सहभागी करून घ्यावे, म्हणून हा शब्दप्रपंच.

हिमालय म्हटले, की आध्यात्मिक तरल विचारांना ओढ लावणारी, गिर्यारोहकांच्या साहसी मनाला खेचून घेणारी बर्फाच्छादित शिखरांची मालिका आपल्या डोळयांसमोर येते; पण ही सर्व कल्पनेतच. लहानपणापासून मीसुद्धा कथा, कविता, पाठ्य पुस्तकांतील धडे यांतून हिमालयाची वर्णने वाचत होतो, ऐकत होतो. कायम बर्फाच्छादित असलेल्या या हिमालयातील अत्युच्च एव्हरेस्ट या शिखरावर शेर्पा तेनसिंग कसा गेला असेल? त्याने तिथे अभिमान भरून यावा, असा आपला तिरंगा राष्ट्रध्वज कसा लावला असेल? याचे खूप अप्रूप वाटत होते.

पुढे शिक्षण, नोकरी नि संसार या चाकोरीबद्ध घाण्यात मीही झापड लावून फिरू लागलो. हिमालय तर दूरच राहिला; पण स्वतःच्या चार भिंतींपलीकडेही एक विस्तीर्ण, अगम्य, आव्हानात्मक असे जग आहे, हे मी साफ विसरून गेलो होतो. भारतातील मानवी जीवन संसार, नोकरी नि उरलेला वेळ राजकीय पक्षांच्या राजकारणी उलाढालींनीच व्यापला आहे. आपल्या गप्पांनी, विचारांनी राजकारणात कुठलाही फरक पडणार नाही, हे माहीत असूनही भारतातील नव्वद टक्के जनता या गप्पाटप्पांत मशगुल असलेली दिसते. मीही त्यातीलच एक होतो. 'होतो' यासाठी म्हणतो, की एक विचारांची अशी काही आल्हाददायक झुळूक आली, की काया थरथरावी, तशी माझी जीवनातील

विचाराची दिशाच बदलून गेली.

पुणे विद्युत् मंडळातील नाट्य-स्पर्धेतील नाटकाची तालीम करीत असताना समर्थ रामदास स्वामींच्या ओव्यांवरील विवरणाचे एक पुस्तक हातात पडले. ते पुस्तक परीस आहे, हे त्यावेळेस मात्र माझ्या लक्षात आले नाही.

*मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें ।*

*कृपा केलिया रघुनाथें । प्रचीत येते.*

ह्या ओवीच्या विवरणातून मी हिमालयात ट्रेकिंगला जाण्याचा विचार डोक्यात घेतला. मी शरीराने ट्रेकिंगच्या संदर्भात बोजड, अननुभवी असा हिमालयात जाणार होतो. थेट एव्हरेस्ट बेस कॅम्पला!

विद्युत् मंडळातील रिक्रिएशन क्लबच्या सदस्यांनी या एव्हरेस्ट बेस कॅम्पचा कार्यक्रम आखलाच होता. मी अचानक त्यांच्यामध्ये घुसलो नि मग त्यानंतर एक एक दिवस अगदी थेट बेसकॅम्पला जाऊन घरी येऊपर्यंत कसा सोनियाचा होऊन गेला, त्याचेच हे वास्तव वर्णन आपल्यापुढे ठेवतो आहे.

विद्युत् मंडळातील अभियंता चंद्रशेखर सबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सातजणं होतो. वेळोवेळी या सर्वांशी चर्चा करून या पुस्तकास आकार दिला आहे. या सर्वांच्या सहकार्याने मी जसा सहज एव्हरेस्ट बेसला जाऊ शकलो, तसाच आमच्यामधील चर्चेने पुस्तकातील तपशिलाकडे.

श्रीसमर्थ उक्तीने कृतीची प्रेरणा दिली, तर श्री. अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, यांनी पुस्तक लिखाणास त्यांनी जे प्रोत्साहन दिले, ते मला लेखक बनविण्यासच कारणीभूत झाले.

श्री. मोहन वेल्हाळ व श्री. रवींद्र सांभारे हे माझे या पुस्तकासाठी मदतीचे दोन

आधारस्तंभच झाले. त्यांनी केलेल्या वेळोवेळीच्या मौलिक सूचना मला या लेखनास खूपच उपयोगी आल्या.

श्री.अनिल किणीकर, माझ्या ओबडधोबड काल्पनिक लिखाणास वास्तवतेच्या वाटेने नेणारा, अगदी माझे बोट धरून खाचखळग्यांतून सहजतेने नेणारा एक मार्गदर्शक. मी जसा ट्रेकिंगमध्ये पूर्ण अनभिज्ञ; पण माझ्या सात सहकाऱ्यांनी मला जसे थेट एव्हरेस्ट बेस कॅम्पला नेले, तसेच पुस्तक लिखाणही मी पहिल्यांदाच करतो आहे. साहित्याच्या शिखराच्या या पायथ्याशी नेण्याचे काम असेच श्री. किणीकर यांनी केले.

हे वर्णन वाचकांपुढे ठेवण्याचा उद्देश असा, की वाचकांनी ईश्वरनिर्मित या सृष्टि-सौंदर्याकडे, त्याने रचलेल्या आव्हानाकडे आपल्या नित्य चाकोरीबद्ध जीवनातून वेळ काढून जरूर जरूर झेपावे व सुखद क्षणांचा अनुभव घ्यावा. या पुस्तकामुळे एखाद्यास जरी अशी प्रेरणा झाली, तरी या लिखाणास सफलता मिळाली, असे मी समजेन.

गिर्यारोहणासंबंधी बऱ्याचशा संस्था कार्यरत आहेतच. तथापि, कुणा इच्छुकास माहिती हवी असल्यास संपर्कासाठी खाली पत्ता देत आहे.

धन्यवाद!

**- सूर्यकांत कुलकर्णी**

ई-१० वीज मंडळ वसाहत,
चतुःशृंगीच्या पायथ्याशी,
सेना. बापट रोड, पुणे-५३.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
ग्रा. क्र. ८८४
२९९२४
१५/१/९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

। श्री ।

अण्णामामा,
चैत्र शु॥ १०, शके १९१६,
काठमांडू, दि. २१-४-९४

चि. अनामिकास,
गोड पाप्यासह शुभाशीर्वाद.

वीस तारखेला–रामनवमीच्या दिवशी तू या जगात आलास, त्या वेळेस तुझा हा मामा मात्र हिमालयातील त्याला अनभिज्ञ असलेल्या शिखराकडे जाण्याच्या उद्देशानं निघालेला.
तुला बघण्याची संधी जरी लवकरात लवकर मिळणार नसली, तरी तुला तुझ्या आयुष्यातलं पहिलं पत्र पाठवण्याची संधी मात्र मी घेतली आहे.
अनादिकालापासून अनंताकडं वाटचाल करण्याऱ्या या जगात तुझं स्वागत असो.

घरी पत्र लिहायचंच होतं. ते फक्त कालच रामनवमीच्या दिवशी या जगात पदार्पण केलेल्या माझ्या भाच्याच्या नावानं लिहीत होतो, एवढंच.

बाहेरचे सर्व आवाज थांबले होते.

काठमांडूतील हॉटेलच्या खोलीत मी एकटाच जागा होतो. बाकी तिघे झोपले होते. मोरे व भालेराव यांची घोरण्याची जुगलबंदी चालू झाली होती. गायकानं क्षणभरासाठी द्रुतमधून संथ लयीत यावं व पुन्हा द्रुतगतीत गायनास सुरुवात करावी, तशी कूस बदलल्यानंतर दोघांचीही घोरण्याची लय कमी-जास्त होत होती.

छतास टांगलेला फॅन अलिप्तपणे फिरत होता. खिडकीच्या तावदानांतून काठमांडूवर पसरलेली रात्र दृष्टीस पडत होती. अंधाराचे पडदे फाडीत एखादी कार सुळकन् जात होती. तेवढाच आवाज.

खरोखरच मी मला सर्वस्वी अज्ञात असलेल्या वाटेकडं निघालो होतो. मला इथपर्यंत घेऊन आलेल्या घटनांचा मागोवा घेतानाही आश्चर्य वाटत होतं.

नजर स्थिर झाली होती.

मन:पटलावरून एक एक करीत घटनांची मालिका सुरू झाली.

पुरुषाचं भाग्य केव्हा उजळेल, हे सांगता येत नाही; या उक्तीचा प्रत्यय मला येऊ लागला होता. नाही तर ट्रेकिंगचा ओ का ठो कळत नसतानाही माझ्या मनात हिमालयाच्या पायथ्याशी जावं, असं का यावं?

पूर्ण डोह डहुळताना त्यातील खाली-वर होणाऱ्या कणांप्रमाणे माझ्या मनाचा डोह डहुळताना मनाच्या कोपऱ्यात कुठं तरी लपून राहिलेला 'हिमालय' या विषयाचा विचार वर आला असावा.

जानेवारी ९४ चालू झाला होता. आमच्या वीज मंडळाच्या दरवर्षी होणाऱ्या नाट्यस्पर्धा ह्या वर्षी फेब्रु., ९४ च्या पहिल्या आठवड्यात इचलकरंजी इथं होणार होत्या. या स्पर्धेत पुणे शहर विभागातर्फे 'दुसरा सामना' हे आळेकरलिखित नाटक सादर करण्याचं काम वीज मंडळातील एक अभियंता मित्र रवींद्र सांभारे हे करणार होते. मीही त्यात एक भूमिका करत होतो. पुण्याच्या वीज मंडळाच्या रास्ता पेठ रिक्रिएशन हॉलमध्ये या नाटकाच्या तालमींनी गती घेतली होती. सर्व कलाकारांच्या तालमी काही एकदम होत नव्हत्या. मग आपला प्रवेश संपला, की परत तालमीस उभं राहीपर्यंत इतरांच्या तालमी बघत बसणं, इकडे तिकडे हिंडत वेळ काढणं एवढाच उद्योग.

रिक्रिएशन हॉलची ती जुनीपुराणी वास्तू चांगलीच उंची होती. बॅडमिंटन खेळण्यासाठी मोठमोठ्या क्षमतेचे दिवे छताला, भिंतींना लटकलेले. फॅन नव्हतेच. त्यामुळं उकाडा खूपच जाणवायचा. आपलं काम संपलं, की तिथंच बाकड्यावर बसून ताणून देणं जास्त बरं वाटायचं.

अशाच एका निवांत वेळी विजय मुळगुंद यांनी आणलेलं एक पुस्तक हाती पडलं.

विजय मुळगुंद हे आमच्या वीज मंडळातील एक कर्मचारी तर होतेच; पण मंडळातील असलेल्या 'कामगार संघ' या संघटनेचं नेतृत्वही कुशलतेनं करत. दासबोधातील काही श्लोक व त्यांवरील टीका-टिपणी असं छोटं पुस्तक होतं.

वाचता–वाचता एका श्लोकावर त्यांनी लिहिलेल्या परिच्छेदावर माझं सारखं लक्ष जाऊन मन एकाग्र होऊ लागलं.

*'मनीं धरावें, तें होतें। विघ्न अवघेंचि नासोन जातें।*
*कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते॥...'*

या श्लोकावर टिपणी करताना लेखकानं लिहिलं होतं:

'मनुष्यानं एखाद्या असाध्य कार्याचा संकल्प सोडला आणि त्यादृष्टीनं त्यानं खरोखर मनापासून प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू केले, तर त्याच्या शरीरात सुद्धा त्या कार्यसिद्धीच्या सफलतेच्या दृष्टीनं बदल सुरू होतात व काया-मनाच्या इच्छेला साथ देऊन कार्य सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करते व रामराया-कृपेनं याचा अनुभव येतो.'

काय असेल, ते असो; पण या परिच्छेदानं मला झपाटून टाकलं, हे निश्चित. मग जिथं असेल, तिथं प्रत्येक क्षण नि क्षण माझ्या डोक्यात याच परिच्छेदाचा विचार सुरू झाला होता.

असाध्य कार्याचा संकल्प व त्यादृष्टीनं प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू केल्यास शरीरात देखील कार्यसिद्धीच्या दृष्टीनं बदल सुरू होतो. हे जरा अनाकलनीयच होतं व याचा प्रत्यय स्वतःच घ्यावा लागणार! कारण दुसऱ्यास एखादं कार्य असाध्य आहे, हे आपणांला कसं समजणार? व त्याच्या शरीरातले बदल तर समजणं शक्यच नव्हतं, तेव्हा स्वतःशिवाय या रामदास-उक्तीचा प्रत्यय घेता येणारच नाही. रामदासांच्या 'मनी' ह्या शब्दाचं खरं प्रचंड असं स्वरूप थोडंसं उमजू लागलं होतं. स्वतःच अनुभव घ्यावा, यासाठी रामदास म्हणतात.

*'मनीं धरावें, तें होतें...'*

मग मला अशक्य अशा सिद्धीकडे– की जिथं माझी शारीरिक क्षमताही बदलू शकेल, अशा एखाद्या कार्याच्या शोधास मी लागलो.

रिक्रिएशन क्लबमध्ये नाटकाच्या तालमींबरोबरच, स्पोर्ट्स ॲक्टीव्हिटीज्, कामगार प्रशिक्षणाच्या सहली, यासंबंधी नेहमी चर्चा, गप्पा सुरू असायचा, अशाच गप्पांच्या ओघात आमचा आणखी एक मित्र सबनीस या वर्षी 'एव्हरेस्ट बेस' साठी ट्रेक ग्रूप नेतोय्, असं कळलं. सबनीस वीज मंडळात एक इंजिनीअर, पण कामाबरोबर

स्पोर्ट्समध्ये अत्यंत रस घेणारा. मी बरीच वर्षं त्याला ओळखतही होतो. तो एव्हरेस्ट बेस ट्रेक काढतोय्, म्हटल्यानंतर माझ्या विचारातील झपाटून टाकलेल्या रामदासांच्या परिच्छेदानं या एव्हरेस्ट बेस कॅम्पचा धागा कधी पकडला, ते समजलं नाही; पण माझे विचार मात्र त्या ट्रेकच्या दिशेनं सुरू झाले. कारण की, मी एकदाही ट्रेकिंग केलं नव्हतं, ना त्या ट्रेकिंगसाठी माझं शरीर फिट होतं. रामदासांच्या उक्तीचा प्रत्यय घेण्यासाठी चालून आलेल्या या संधीचा फायदा घ्यावा, असे विचार मनात सुरू झाले.

दोन वर्षांपूर्वी म्हणजे डिसेंबर, ९२ मध्ये मी माझ्या काही मित्रांसमवेत पोखरा - दार्जिलिंग ट्रिपला गेलो होतो. पोखऱ्याहून मत्स्यपुच्छ या हिमाच्छादित पर्वतराशीचं दर्शन मला झालं नि मी मंत्रमुग्ध होऊन बघतच राहिलो. निसर्गाची ती अद्‌भुत किमया बघून डोळयांत अश्रूच आले. आयुष्यात मी प्रथमच बर्फाच्छादित पर्वताचा भाग पाहत होतो. कल्पनेच्याही पलीकडील विलोभनीय दृश्य मी मनात साठवत होतो.

वरपासून खालपर्यंत चांदीच्या वर्खात लपेटून टाकावं, असं ते पर्वतशिखर बर्फानं लपेटलं होतं. सूर्याची कोवळी किरणं पूर्ण शिखरावर पडली होती. पहाटेची वेळ असल्यामुळं शांतता तर होतीच; पण शिखराच्या होणाऱ्या दर्शनामुळं ती अजून शांत वाटत होती. आत्तापर्यंत हिमालय वाचला, ऐकला होता; पण त्याचं एक शिखर पाहण्याचा अनुभव मात्र फारच वेगळा होता. स्वतःला अंतर्मुख करणारा होता. आजूबाजूला एवढा निसर्ग भरून राहिला होता, गर्द हिरवी झाडी होती, डोंगर-दऱ्या होत्या, थंड वाऱ्याची झुळूक अंगावर शिरशिरी आणत होती. मोठमोठ्या इमारती, लॉजेस्, मागे एअरपोर्ट होता... सर्व सर्व होतं; पण माझ्या डोळयांसमोर होता फक्त मत्स्यपुच्छ व त्याच्यासमोर मंत्रमुग्ध झालेला मी. निसर्गाच्या या अद्‌भुत किमयेचं, निर्मितीचं पहिलं दर्शन मी आयुष्यात कधीही विसरू शकणार नाही.

तिथून आम्ही दार्जिलिंग गाठलं होतं. पोखऱ्यालाच कांचनगंगा या शिखराबद्दल ऐकलंच होतं; पण आता ती शिखरं प्रत्यक्ष पाहीपर्यंत मला चैन पडणार नव्हती. दार्जिलिंगला पोचण्यास रात्री साडेआठ वाजले होते. सनराईज टायगर पॉईंट पाहण्यासाठी पहाटे चार वाजता निघावं लागेल, असं कळल्यावर आमचे सर्व सहकारी गारठले. मग मी एकटाच टूरिस्ट जीपनं पहाटे चार वाजता निघालो. इतर टूरिस्ट होते; पण अनोळखी अशा निसर्गरम्य ठिकाणी एकट्यानंच जावं, असं मला वाटतं. त्यामुळं निसर्गनिरीक्षण व्यवस्थित होऊ शकतं. दार्जिलिंगच्या जीप वेगळयाच. तेथील चढासाठी खास नऊ गिअर्सच्या बनवलेल्या जीप्स टायगर हिलचा रस्ता कापत होत्या. थंडगार हवेचे सपके बसत होते. नवदांपत्यांच्या चेष्टमस्करी चालू होत्या, जीपमधला टेपरेकॉर्डर हिंदी गाण्यांची उजळणी करत होता.

साधारण पहाटे पाच वाजता आम्ही टायगर हिलवर उतरलो.

थंडीचा कडाका चांगलाच जाणवू लागला होता. हिलवर एकमेव हॉटेल. तिथं कॉफी घेऊन हॉटेलच्या टेरेसवर आलो. किर्रर अंधार कमी होऊ लागला होता. अस्पष्टसं दिसू लागलं होतं. पूर्व दिशा समजली होती; पण कांचनगंगेची शिखरं नेमकी कुठल्या दिशेला आहेत, हे जवळपास कुणालाच माहीत नव्हतं. त्यामुळं उत्सुकता आणखीच ताणली गेली होती.

अर्धा-पाऊण तास असा कल्पना करण्यातच गेला नि अचानक एकदम सगळे शहारून गेले. 'ओ गॉड!' असा आश्चर्याचा उद्गार नकळत तोंडातून बाहेर पडला आणि सर्व आसमंतात शिरला.

पश्चिमेच्या बाजूला एक पूर्ण सुवर्णकड दिसू लागली होती. काळ्या मेघांनी भरलेल्या आकाशात लख्ख्कन वीज चमकावी, तशी पसरलेल्या धुक्यात, धूसर प्रकाशात ती सुवर्णकड दिसू लागली होती. दार्जिलिंगवर अजून सूर्योदय व्हावयाचा होता; पण कांचनगंगेच्या शिखरावर मात्र त्यानं जणू सोनेरी किरणांचा वर्षावच केला होता. चित्रकार जसा चित्राची आऊटलाईन प्रथम काढून, मग चित्र पुरं करण्यास सुरुवात करतो, तसंच सूर्यकिरणांनी आधी पूर्ण सुवर्णकड रंगवली व मग हळूहळू किरणं खाली पसरू लागली होती. कांचनगंगा हे नाव सार्थ करणारी सुवर्णकड माझ्या आजपर्यंतच्या आयुष्यातल्या आठवणींच्या मंडपाची एक सुवर्ण-झालरच होऊन बसली. लांबच्या लांब पसरलेल्या सुवर्णराशी आता हळूहळू स्पष्ट दिसू लागल्या होत्या. पोखऱ्यास एकाच शिखराचं दर्शन झालं होतं. इथं तर रांगच्या रांग समोर दिसत होती. संपूर्ण दार्जिलिंग आता धुक्यातून बाहेर आलं होतं. निसर्गानं केलेली उधळण प्रत्येक क्षणी नजरेत भरत होती. पण स्मृतीत भरून राहिली होती, ती कांचनगंगेची शिखरं व पहाटे पहाटे दिसलेली त्यांची सुवर्णकड.

दार्जिलिंग - पोखरा इथं घरातील सर्वांना घेऊन पुनः यायचंच, असं मनाशी मी त्या वेळेसच ठरवलं होतं.

ट्रिप संपली होती. सर्व आपआपल्या कामास लागले होते. मी ट्रिपला एकटाच गेल्याबद्दल घरातील सर्वजण माझ्यावर थोडे नाराजच होते. पण डिसेंबर म्हणजे शाळा चालू होत्या, त्यामुळं सर्वांचाच नाइलाज झाला होता.

त्यानंतर काही महिन्यांनी घरात झालेला एक प्रसंग.

वृषालीनं-माझ्या मुलीनं—माझ्याकडे एक वही दिली. तीत स्वतःबद्दलची पूर्ण माहिती भरावयाची होती. तुमचा आवडता लेखक, कवी, पुस्तक, पदार्थ, प्रसंग वगैरे वगैरे अशी बरीच माहिती विचारली होती. त्यात एक प्रश्न होता 'आवडतं ठिकाण ?'

मी सहज लिहून गेलो : 'हिमालयाचा पायथा'.

हृषीकेशनं–माझ्या मुलानं–ते सर्व वाचलं नि मला विचारलं,

'अण्णा, हिमालयाच्या पायथ्याशी पूर्ण बर्फच असेल ना! मग तिथं कसं वाटतं?'

मी एकदम चमकलोच.

याला आता काय सांगायचं? आपण कधीच बर्फाच्या डोंगराच्या पायथ्याशी गेलो नाही.

तरी 'हिमालयाचा पायथा' हे आवडतं ठिकाण म्हणून कसं लिहिलं? मत्स्यपुच्छ व कांचनगंगा यांची दर्शनं झाली होती, ती किती तरी मैलांवरून, मग अनुभव नसताना मी 'हिमालयाचा पायथा' हे आवडतं ठिकाण म्हणून का लिहिलं? डोक्यात विषय असणं आणि त्याचा खराखुरा अनुभव घेणं यांत जमीन-अस्मानाचा फरक. अनुभवशून्य अभिप्रायाबद्दल माझं मलाच अपराधी वाटू लागलं.

हृषीकेशनं विषय सोडून दिला; पण माझ्या खोटेपणामुळं तो विषय मला चिकटला.

मी विचार करू लागलो :

आपल्यासमोर 'हिमालय' हाच विषय वारंवार सामोरा का येतोय्? दार्जिलिंगमधील हिमदर्शनाची फीत तर माझ्या डोळ्यांसमोरून सारखी उलगडत जायची. रिवाईंड व्हायची, की पुन्हा उलगडणं चालू.

असं किती तरी वेळा होऊ लागलं.

असं का व्हावं?

यामागं काही ईश्वरी संकेत तर नाही ना?

त्यात अचानक समर्थांनी घडवलेलं मनोदर्शन.

या विचारानं डोक्याचा पार भुगा होईल, की काय, अशी स्थिती.

तसा माझा पिंड देवाधर्माकडं वळणारा. अध्यात्माविषयी नुकतीच आवड निर्माण झाली होती. महेशाचं वास्तव हिमालयातील कैलास पर्वतावर, असं पुराणांतून वारंवार कानांवर पडलेलं. सर्व ऋषिमुनींची तपोभूमी हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांतून.

या अशा हिमालयात जावं, असं मला का वाटू लागलं, याचा काही मेळच लागेना.

हिमालयाची ओढ मात्र मला स्वस्थ बसू देईना.

काही तरी पूर्वसुकृतच असलं पाहिजे.

सारखं वाटायचं, की तो मला बोलावतोय्,

'ये, अरे, एकदा तरी ये... या पुण्यभूमीचं एकदा तरी दर्शन घे.'

नोकरीतील कामाच्या व घरसंसारातील कष्टांच्या त्याचत्याचपणामुळं शरीर-मनावर कंटाळा आला होता. हे सर्व सोडून कुठं तरी लांब जावं, असंही वारंवार वाटू

लागलं होतं.

– नि त्याच वेळेस मनाच्या कोपऱ्यात पडलेल्या हा हिमालयाचा विषय 'एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक' या धाग्यानं अलगद उचलला होता नि मग विचार करू लागलो, की आपली शरीरयष्टी ट्रेकिंगला योग्य नाहीच. अनुभवही नाही. मग

*'मनीं धरावें, तें होतें। विघ्न अवघेंचि नासोनी जातें।*

*कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते।।*

या श्लोकाप्रमाणे आपण प्रयोग करायचा का ? हिमालय पाहायचं मनात होतंच. फक्त शारीरिक योग्यता आणायची होती. त्यासाठी कष्ट घेणं आवश्यक होतं नि हळूहळू मनाचा निश्चय होऊ लागला.

१९७८ साली – म्हणजे त्या वेळेस मी सत्तावीस वर्षांचा असेन – तोरणा, राजगड ट्रिप म्हणून चढलो होतो; पण त्यानंतर रस्त्यावरच्या स्पीडब्रेकरच्या 'डोंगरा'शिवाय कुठलाही डोंगर चढलो नाही वा त्याच्या वाटेलाही गेलो नाही. स्पीडब्रेकरचा डोंगर ओलांडत होतो, तोही स्वयंचलित वाहनावर स्वतःचं वजन सत्तर-बहात्तर किलो, छाती नि पोट यांच्या स्पर्धेत पोटानं म्हणजे ढेरीनं बाजी मारली होती. जाड, फोपसा वगैरे शब्द केव्हाच मागे पडले होते. स्वयंचलित वाहनावर पूर्ण भरवसा असल्यामुळं पायांना दररोज अदमासे अर्धा किलोमीटरची जबरदस्त चाल करण्याची सवय अंगी बाणवून घेतली होती! बाजार-हाट करताना हातात पिशवी आली, की लगेच रिक्शा करून घर गाठणं एवढी मोठी वजन उचलण्याची सवय! स्वतःच्या बहात्तर किलोंनंतर अजून ओझं उचलण्याची कोणी माझ्याकडून अपेक्षाही केली नव्हती. डायरी नि कागदपत्रं घेऊन आमच्या वीज मंडळाच्या पिंपरी विभागीय कार्यालयाच्या सदुसष्ट पायऱ्या चढता- चढता माझी जी दमछाक व्हायची, ती बघून कर्मचारी मित्रांनी मला विभागीय कार्यालयात न येण्याची सूट देऊन टाकली होती; नि या सगळ्या प्रचंड अनुभवानंतरही माझ्या मनाचा मात्र निश्चय होऊ लागला होता की,

'नाही! आता जायचंच. एव्हरेस्टचा पायथा गाठायचाच!'

आम्ही बसवत असलेलं 'दुसरा सामना' हे नाटक एकदा स्पर्धेत सादर केलं, की मग एव्हरेस्ट या विषयाला हात घालायचा, असं मनोमन ठरवलं नि नाटकाच्या तालमी करू लागलो.

फेब्रुवारी, ९४ च्या पहिल्या आठवड्यात नाट्यस्पर्धा इचलकरंजी इथं होणार होत्या. आमच्या पुणे झोनचं नाटक सादर होणार होतं ५ फेब्रु., ९४ ला. नाटकाच्या तालमींच्या वेगाबरोबरच एव्हरेस्टचा विषयही डोक्यात गती घेऊ लागला होता.

फेब्रुवारीचा पहिला आठवडा नाटकाच्या धामधुमीत झटक्यात निघून गेला होता. नाट्यस्पर्धेत आम्हांला म्हणावं तसं यश मिळालं नाही. त्यामुळं पुढील फेरीत

आमचं नाटक जाणार नव्हतं.

एक आठवडा थोड्याशा विषण्णतेतच व नाटकाच्या अपयशाच्या चर्चेतच गेला.

सबनीस रिक्रिएशन हॉलमध्ये भेटत असे; पण एव्हरेस्टला जाण्याचा विषय मी अजून काढला नव्हता. कारण एव्हरेस्टचा विषय माझ्या डोक्यात असला, तरी अजून घरी यासाठी परवानगी घेण्यासाठी मी धीर केला नव्हता. बस, रेल्वे वा कुठल्या वाहनानं प्रवास करणं वेगळं; पण इथं चक्क पायी चालणं व तेही ओझं घेऊन व अनभिज्ञ प्रदेशात. त्यामुळं परवानगीला कां कूं होणारच होती. नोकरीतील एकाच चाकोरीवद्ध कामाचा कंटाळा आला होता. नोकरी व घर या साचेवंद रहाटगाडग्यातून दूर निवांत जावं, असं वाटू लागलं. त्यात कष्ट, परिश्रम घेऊनही नाटकाला मिळालेल्या अपयशाची भर पडली. नि मग हे सगळे विचार मला सबनीसला फोन करण्यासाठी पुरेसे झाले.

सबनीसला भीत-भीतच फोन केला. कारण त्याचा स्वभाव जरा तिखट व परखड होता.

'नमस्कार, सबनीस, मी, एस्. आर्. कुलकर्णी वोलतोय्...'

'हं बोल, रे, काय काम काढलंस?'

'अरे, तुमचा ग्रूप ह्या वेळेस एव्हरेस्ट बेसला जाणार आहे, असं कळलं, म्हणून मी फोन केलाय्..'

'बरं मग?' तिकडून सवनीस.

'माझी इच्छा आहे तुमच्यावरोबर येण्याची...'

थोडा वेळ पलीकडून शांतता.

मला वाटलं, त्यानं रिसीव्हर ठेवला. नशीब माझं, की त्यानं तो रिसीव्हर खाडकन खाली फेकला नाही.

मी रिसीव्हर खाली ठेवणार, तेवढ्यात पलीकडून आवाज आला.

'असं कर, संध्याकाळी रास्ता पेठला रिक्रिएशन हॉलमध्ये भेट, तेव्हा सविस्तर बोलू.'

बोंवला, सविस्तर बोलू, म्हणजे हा माझ्यासमोर सरळ आरसाच धरणार. माझा शेक्सपीअरचा हॅम्लेट व्हायला लागला.

'टु बी ऑर नॉट टु बी'? करावं? का न करावं?

दिवसभर नुसता विचार आणि विचार. काय बोलायचं? काय सांगायचं? मला ट्रेकिंगचा काहीच अनुभव नसल्यामुळं सबनीस मला येण्यासाठी हो म्हणेल का? उत्सुकता उगीचच ताणली जात होती. डोक्यातील या विषयामुळं इतर कुठल्याच कामात लक्ष लागत नव्हतं.

संध्याकाळी रास्ता पेठ गाठलं. सबनीस बॅडमिंटन खेळण्यात दंग होता. तोपर्यंत माझं मन बॅडमिंटनच्या शटलप्रमाणे इकडून तिकडे, तिकडून इकडे फटके खाऊ लागलं...... मला शटलविषयी सहानुभूती वाटू लागली.

समजा, तो हो म्हणाला, नि आपल्याला शक्य नाही झालं, तर!

नि समजा, तो नाही म्हणाला, तर मनातली इच्छा तशीच राहणार.

'काय, रे, आँ ? ट्रेकिंगला यायचंय् ?' सबनीसनं अचानक विचारलं, तसं माझं शटल् खाडकन थांबलं.

त्यांचा खेळ थांवलाय्, हे माझ्या क्षणभरानं लक्षात आलं.

'हो.... म्हणजे तसा विचार आहे.' मी द्विधा विचारात.

'काय, रे, एस्. आर्., चेष्टा वाटली काय ? आँ. आधी कधी गेलाय्स का ?...'

'नाही, रे, पहिल्यांदाच धाडस करणार आहे आणि नि तेही तू वरोवर आहेस, म्हणून!'

मी त्याच्यावर दाखवलेला विश्वास त्याला सुखावून गेला.

'हे... हे... असं नाही चालायचं...' माझ्या ढेरीकडे वोट दाखवत तो म्हणाला, 'ही... ढेरी, वजन कमी केलं पाहिजे. दर रविवारी सिंहगड चढलंच पाहिजे, आम्ही सगळे जातो. जमेल का हे सगळं ? नीट समजून घे. एव्हरेस्ट वेसला जायचं, म्हणजे ट्रिप नाहीये. शारीरिक, मानसिक तयारी पाहिजे. फक्त दोन महिने राहिलेत. एखाद्या रविवारी सिंहगड चुकला, तरी तुला न्यायचं, का नाही, याचा विचार करावा लागेल. काय ?' सबनीसनं खडसावून विचारलं.

मी मनाचा हिय्या केला आणि आत्मविश्वासानं खाडकन म्हणालो,

'हो, जमेल ना. येईन मी सिंहगडला..'

रामदासांचा श्लोक व त्याच्यावरील टिपणी डोक्यात घणाघणा घाव घालत होती.

***मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि नासोन जातें।***
***कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते।।***

'मग ह्या रविवारी ये. पहाटे पाच वाजून दहा मिनिटांनी स्वारगेटवरून सिंहगड गाडी आहे. नटराज हॉटेलसमोरून सुटते. हंटर शूज् नसतील, तर विकत घे. घरी सॅक असेल, तर त्यात स्वेटर, पाणी वगैरे घेऊन ये.'

रविवारसाठी मध्ये तीन-चार दिवस होते. एका संध्याकाळी बाजारात जाऊन दीडशे रुपयांचे हंटर शूज् घेऊन घरी आलो. घरी आल्यावरोवर ते वेगळ्याच प्रकारचे बूट बघून सौ. नं विचारलं,

'अहो, हे काय ? हे कसले बूट ?'

मग मी तिला माझा एव्हरेस्ट बेस कॅम्पला जाण्याचा विचार सांगितला व त्याची प्रॅक्टिस म्हणून दर रविवारी सिंहगडला जायचं व डोंगर, पहाड चढण्यासाठी हंटर शूज् चांगले असतात, म्हणून मला ते आणायला सांगितले आहेत, असा खुलासा केला.

'अहो, सांगितलं कुणी तुम्हांला हे? त्या हिमालयात जाण्यासाठी कुणी भरीस घातलं?'

'कुणीही नाही. हा माझा मीच निर्णय घेतला आहे. नि हिमालयात जाणारा नेहमीचाच ग्रूप आहे, म्हणून त्यांच्याबरोबर जायचं आहे.' मी शांतपणे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

मग घरात तीन-चार दिवस उलट सुलट विचार सुरू झाले.

'इतक्या अडचणींत व सर्वांना चिंतेत टाकून जाण्याचं काही नडलंय् का?' - सौ. चं मत.

'अण्णा आम्हांला कुठंच ट्रिपला नेत नाहीत. स्वतः एकटेच जातात.' हे मुलांचं म्हणणं.

त्यांची प्रतिक्रिया स्वाभाविकच होती. कारण मागच्या वर्षीही पोखरा-दार्जिलिंगला मी एकटाच गेलो होतो नि या वेळीही एकटाच जाणार आहे.

'हे बघा', मी सगळ्यांना समजावू लागलो, 'एक तर हा प्रवास खडतर व पूर्ण थंड हवामानातला, मला चालण्याची, सतत ओझं उचलण्याची प्रॅक्टिस नसली, तरी या संकटांना तोंड देण्यासाठी माझ्या मनाची पूर्ण तयारी झालेली आहे. तुम्हांला उन्हाळयातही रगाशिवाय झोप येत नाही. अंघोळीला गरम पाणीच तुम्हांला हवं असतं. तेव्हा तिथल्या बर्फाच्या थंडीत तुम्ही काय करणार? मुख्य म्हणजे, तुम्हांला जीवनात पुढं अशी संधी मिळू शकणार आहे. माझं तसं नाहीये. आयुष्यात अशी संधी एकदाच मिळते व ती आत्ता मला मिळते आहे. तेव्हा तुम्ही सर्वांनीच याचा नीट विचार करा व मला आलेल्या संधीपासून दूर खेचू नका.'

'पण, अण्णा, तुम्ही इतक्या धोक्याच्या रस्त्यावरून जाणार, तेव्हा आम्हांला इथं कसं बरं वाटेल?' ताई.

'हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पण मुळात आम्ही सगळेच संसारी. तेव्हा धोका वाटला, तर आम्ही पुढं जाऊच कशाला? तुम्ही आपल्या प्रेमापोटी हे सर्व विचार डोक्यात आणता आहात. वास्तविक आम्ही कुठलाही धोका पत्करणार नाही आहोत. धोका काय, कुठंही – घरबसल्याही होऊ शकतो. तेव्हा तुम्ही त्याची काळजी सोडा. मलाही तुमच्याबद्दल प्रेम आहेच ना? मग मी ते कसं परत मिळेल, हेच पाहणार ना?'

हळूहळू सर्वांना माझा मुद्दा, विचार पटायला लागला, तसं घर शांत होऊ लागलं.

मी आपला अगदी लहान मुलाच्या उत्सुकतेनं रविवार उजाडण्याची वाट पाहत होतो. गेली पंधरा वर्षं पुणे परिसरात असून सुद्धा मी अजून सिंहगड पाहिला नव्हता. नसरापूरला असताना वीज मंडळातील इंजिनीअर या नात्यानं गावाच्या विद्युतीकरणाच्या सर्व्हेच्या निमित्तानं कोंढणपूर मार्गे कल्याणपर्यंत गेलो होतो. पण सिंहगड चढणं वगैरे भानगडी कधी माझ्या मनातच आल्या नाहीत. पण आज तोच सिंहगड ट्रेकिंगचा मुख्य विषय होऊन बसल्यामुळं या विषयात पास होणं आवश्यकच होतं. गेला आठवडाभर सारखा सिंहगडचा जप, ध्यानी मनी सिंहगडच, त्यामुळं स्वप्नातही सिंहगडच.

पहाटे चारच्या गजरानं दचकून जागा झालो. आळस झटकून उठलो. प्रातर्विधी आटोपून सॅक घेतली. पाण्याची बाटली, स्वेटर सॅकमध्ये टाकले. हंटर शूज् घातले नि स्वारगेट गाठलं. तोपर्यंत पहाटेचे पाच वाजले होते. हॉटेल नटराजसमोर सिंहगड व खानापूर दोन गाड्या उभ्या होत्या. सिंहगड गाडी फुल्ल. गाडीत चढून बघितलं. सबनीस, मोरे ओळखीचं कुणीच नव्हतं. त्यामुळं बसमध्ये बसलोच नाही. गाडी निघून गेली. मी स्टॉपवरच बाकी मंडळींची वाट पाहत बसलो.

साडे सातपर्यंत कुणीही आलं नाही. तेव्हा आठला सरळ घर गाठलं.

'इतक्या लवकर आलात! कसा वाटला सिंहगड?' सौ.

'छान!' आधीच वैतागलो होतो.

माझ्या वैतागाकडे बघून वैजू गालातल्या गालांत मिस्किल हसल्यासारखी वाटली. हा सिंह गड न पाहताच परत आलेला दिसतोय्, हे तिनं ओळखलं असावं.

एक रविवार गेला.

सोमवारी अकरा वाजता खराळवाडी केंद्राचा फोन खणखणला. ऑपरेटरनं माझा फोन आहे, म्हणून सांगितलं.

'हॅलो, मी एस्. आर्...'

'काय, रे गधड्या, काल का आला नाहीस?' पलीकडून सबनीस!

मी हादरलोच. त्याला रविवारच्या सकाळची सर्व माहिती दिली.

'झोपेत होता काय, रे? आँ, आम्ही सर्व पुढच्या खानापूर गाडीत होतो.' वगैरे वगैरे.

सिंहगडनं चकवा दिला होता.

मग त्यानंतर पूर्ण आठवडा चर्चेतच गेला.

कोण कोण येणार आहे, याची अंतिम यादी तयार व्हायची होती. सबनीस,

जगदाळे, मोरे, काका देशपांडे, भालेराव, बिरनाळे, कोण्णूर, चव्हाण, नाईक व निकम ही नावं आधीच IMF ला मंजुरीसाठी पाठवली होती. (Indian mountaineering Foundation) या IMF चं ऑफिस दिल्लीला. ट्रेकिंगबाबतीत या ऑफिसची मंजुरी घेतल्यानंतर, ट्रेकिंगमध्ये अडचणी आल्यास त्यांचं निवारण करण्याची जबावदारी त्यांच्यावर जाते व आपण काय ॲक्टीव्हिटीज् करत आहोत, याची माहितीही त्यांच्या ऑफिसला संकलित होत असते. विशेषत:, परदेशातील ट्रेकिंगसाठी या परवानगीची आवश्यकता असतेच असते.

मी माझी इच्छा त्यानंतर प्रकट केली होती. त्यामुळं माझं नाव असण्याचा प्रश्नच नव्हता. आठवड्याच्या शेवटी शेवटी काही घरगुती कारणांमुळं निकम व नाईक यांनी बेस कॅम्पला येण्याविषयी असमर्थता दाखविली. त्यांऐवजी माझं व मानसिंग शिंदे यांची नावं मंजुरीसाठी पाठवण्यात आली.

एक रविवार सिंहगडबाबत वाया गेल्यामुळं मी स्वत:ही जरा वैतागलोच होतो. इथल्या इथं आपल्याला सिंहगड चढणं सुद्धा जमवता येऊ नये, याचा खेद वाटला. त्यामुळं येत्या रविवारी कोणी भेटलं नाही, तरी सिंहगड चढायचाच, असा निश्चय केला!

परत एकदा रविवारचे पहाटेचे चार वाजले. थंडी बऱ्यापैकी होती. परत सर्व जामानिमा करून स्वारगेट गाठलं. सिंहगड गाडीत बसलो. गाडीत सबनीस, मोरे, जगदाळे, जगताप, ही ओळखीची मंडळी असल्यामुळं हायसं वाटलं. गाडी सिंहगडकडे निघाली. गाडी गच्च भरली होती. तरीही मधेमधे स्टॉपवर अजूनही काही उत्साही तरुण, वृद्ध, युवती येतच होत्या. मनोमन मी सर्वांचं खरोखरच कौतुक केलं. मनाशी विचार केला. या लोकांनाच जीवनात सुखी राहण्याचं रहस्य समजलंय्! नाही तर आम्ही दररोज सकाळपासून रात्री झोपेपर्यंत घाण्याच्या बैलासारखी झापडं लावून आपल्या चकरा मारतोय्! तोच तोच नीरस चोथा चर्वण करतोय्.

गार मंद वारा येत होता. सुखद रोमांच उभे राहत होते.

सिंहगड, त्यावरील टी. व्ही. टॉवर दिसू लागला होता.

गाडी मधेच थांबली. एक गृहस्थ उठले आणि आवाहन करू लागले :

'माझं नाव वाडेकर ...'

'बरं... पुढं...' एक जण किरकिरला.

सर्व बस हास्यकल्लोळात बुडाली.

वाडेकर सर्वांनाच ठाऊक होते. दर रविवारी सिंहगडला जाणाऱ्या वारकऱ्यांची त्यांनी दिंडीच तयार केली होती. 'सिंहगडचे वारकरी' हेच त्यांचं नाव.

'पुढील रविवारी तानाजी मालुसऱ्यांची जयंती आहे. सिंहगडावर साडे सात ते साडे आठ कार्यक्रम आहे. तेव्हा नेहमीप्रमाणे सिंहगड चढून लगेच उतरायचा नाही

आहे... वेळ काढायचा. कार्यक्रमात सहभागी व्हायचं. तो यशस्वी करायचा, ही सर्वांना नम्र विनंती.'

ड्रायव्हरला गाडी सुरू करण्याविषयी सूचना देऊन ते आपल्या जागेवर जाऊन बसले.

'तानाजी'च्या उल्लेखानं मात्र मी शहारलो. या क्षणापर्यंत सिंहगड एकदा चढणं व उतरणं या एका ट्रिपला साजेशा विचारात मी होतो. तो विचार एकदम कुठल्या कुठं फेकला गेला.

इतिहासात वाचलेला तानाजीचा रणसंग्राम डोळयांसमोरून सरकू लागला. आपल्या राज्याच्या कर्तव्यासाठी मुलाचा विवाह असतानाही शत्रूशी प्राणपणानं लढणारा व स्वराज्यासाठी प्राणही देणारा आठवला, की आपण क्षुल्लक जीव पालापाचोळयासारखे उडून जातो. काम, जबाबदाऱ्या टाळण्यासाठी क्षुल्लक निमित्ताची आम्ही वाट पाहत असतो.

गाडीनं पायथा गाठला होता. दर रविवारी किंवा नेहमी जाणारे पटापट सिंहगडाच्या रस्त्यावरून चालूही लागले. मी सिंहगडकडे त्याची उंची किती आहे, हे आजमावण्यासाठी वर पाहिलं. सहा वाजले, तरी अजूनही अंधार असल्यामुळं सिंहगडच्या टॉवरवरील लाईटिंगशिवाय काही दिसू शकलं नाही. काही-जणांजवळ बॅटऱ्या होत्या. त्यांच्या उजेडात आम्ही वाटचाल करू लागलो. डोळेही अंधाराला सरावले होते व थोडं फटफटूही लागलं होतं. त्यामुळं सिंहगड व त्याचा परिसर दिसू लागला होता. हंटरशूज्ची सवय नव्हती. त्यामुळं पायांच्या मागच्या बाजूस जरा जाचत होतं. कदाचित चढावर पाऊल कसं टाकावं, हे नीट जमत नसल्यामुळंही तसं होत असेल. छोटे-मोठे दगडधोंडे असलेली वाट अधूनमधून होती. वाट अवघड नसली, तरी चढाची होती. त्यामुळं कष्टमय वाटू लागली होती. श्वासोच्छ्वासाचा वेग वाढला होता व चालण्याची गती मात्र मंद झाली होती. बसमधून आलेले बहुतेकजण बरेच पुढं गेले होते.

पहाटेचं मंगल व शांत वातावरण, त्यामुळं थोड्या जास्त उत्साहानंच पहिला टप्पा पार केला होता.

किशोर सांगत होता,

'काही घाई करायची नाही, ही काही स्पर्धा नाही. शेवट गाठायचा, एवढंच!'

पहिल्या टप्प्यानंतर मात्र एक एक चढ जिवावर येऊ लागला. प्रत्येक वळण झालं, की हाश्श- हुश्श, थांबणं. सहाला सिंहगड चढण्यास सुरुवात केली होती. सात वाजले, तेव्हा अर्धापाऊण गड संपला होता आणि क्षमतेची इतिश्री होण्याच्या बेतात होती.

तेवढ्यात एक पन्नाशीचे गृहस्थ सिंहगड उतरताना भेटले. त्यांनी सिंहगड

चढण्यास आमच्याबरोबर सुरुवात केली होती. मला बरं वाटलं. म्हटलं, सिंहगड चढणं कठीण, म्हणून हे अर्ध्यातूनच परत निघाले असावेत. आपण तर आज पूर्ण सिंहगड चढणार आहोत.

मी नवीन, म्हणून किशोर माझ्या मागेच होता. त्यानं माहिती दिली.

'आत्ता जे गृहस्थ उतरताहेत, ते आपल्या एका सिंहगड चढण्याच्या वेळात दोनदा सिंहगड चढून उतरतात.'

माझी बुद्धी गुंग होण्याच्या बेतातच. परत एकदा खुजा होऊन पुढचं वळण चढायला लागलो. सिंहगड चढता-चढता पावलांबरोबर माझा निश्चयही जरा डळमळीत होऊ लागला होता. इथं या दोन हजार फुटांवर माझी ही अवस्था, मग तिथं वीस हजार फुटांवर काय होणार? बरं, तिथं अजून बर्फातून चालणं, थंडीच्या कडाक्याची भर, मिळेल ते खाणं या अशा प्रचंड अडचणीत जाण्यापेक्षा ते हिमालयावर जाणंच नको! इथं सुखाची झोप सोडून, तिथं जाऊन धोका पत्करण्यात काय अर्थ आहे! आपली शारीरिक क्षमता तर आता दिसतच होती.

विचारातच वरचं टोक गाठलं होतं.

साडेसात वाजता मजल - दरमजल करता-करता कसंतरी वरचं टोक गाठलं. बाकीची मंडळी चाळीस-पंचेचाळीस मिनिटांतच वर पोचली होती.

नंतरचा एक तासभर चांगलाच गेला. कारण विश्रांती. भजी, चहा, सवनीसनं आणलेली शंकरपाळी यांचा फडशा पाडून साडेआठला उतरण्यास सुरुवात केली. साडे अकराला घरी आलो.

सर्व काळजीत, मागच्या वेळेस सिंहगडावर जाऊन आडे आठला येणारा हा गृहस्थ आज साडे अकरा झाले, तरी आला नाही.

घरी आल्या–आल्या सरबत्ती. वैजू मिस्किलपणे विचारीत होती,

'आधी सांगायचं नाही, इतका वेळ लागेल, म्हणून, मागच्या वेळेस पटकन् आलात...'

मी तिच्याकडं पाहिलं.

तसं तिनं 'काय? बोला की!' अशा अर्थानं राणा भीमदेवी थाटात हातवारे करून विचारणा केली.

मग मला सांगावं लागलं,

'बाई, ग! मागच्या वेळेस मी फक्त स्टॉपवरून परतलो होतो. पण आज प्रत्यक्षात सिंहगडावरून!'

दुपारी जेवण झालं नि नंतर सहज म्हणून पहुडलो, तर संध्याकाळी साडेपाच वाजताच उठलो. पायांच्या पोटऱ्या थोड्या सणसण करीत होत्या. पायरी उतरताना पायाचे स्नायू ताणले जायचे नि त्यामुळं जरा जपूनच चालावं लागत होतं.

सोमवारी सकाळी मात्र चालण्यास नि पायऱ्या चढउतार करताना भलताच त्रास होऊ लागला होता. ऑफिसात जावं, की नाही, हा विचार करत-करतच ऑफिसला गेलो. मग मात्र मित्रमंडळींत सिंहगडचा अनुभव सांगू लागलो, अगदी दोन इंच छाती फुगवून!

सिंहगडावर चढता-चढता पावलांबरोबर माझा निश्चय डळमळत होता; पण यानंतर पूर्ण आठवडा मात्र एकदम नवीन एनर्जी मिळाल्यासारखा गेला. अजूनही मावळ्यांचा जोम, उत्साह सिंहगड परिसरात फिरत असावा, नि सिंहगड चढणाऱ्याला त्याचा परिसासारखा स्पर्श करीत असावा. त्यामुळं माझा एव्हरेस्ट बेसला जाण्याचा निश्चय आणखी पक्का झाला.

आज तिसरा रविवार उजाडला. आज मात्र सिंहगड चढण्यास मी एक तास दहा मिनिटं घेतली. काका देशपांडे बरोबर असल्यामुळं मी फार लवकर आलो, असं वाटलं. त्या वेळेस मी चाळीस, तर काका साठीतले, हे सोयिस्कररीत्या विसरलो.

गडावर आज तानाजी जयंती अगदी उत्साहात साजरी करण्यात आली. तानाजी जयंतीच्या निमित्तानं तात्या सुरूडकरचा सलग सत्तावीस वर्षं सिंहगड चढण्याचा उपक्रम अखंड करत असल्यामुळं अनौपचारिक सत्कारही करण्यात येणार होता. पण तो बहाद्दर प्रसिद्धीपासून लांबच राहिला. सिंहगडावर आला होता, पण लगेच निघूनही गेला.

आज बेस कॅम्पला येणाऱ्या आणखी दोघांच्या ओळखी झाल्या. एक डॉ. भालेराव, तर दुसरे बिरनाळे! खडकी कँटोन्मेंटमध्ये सिव्हिल इंजिनीअर!

तीन रविवार गेले होते. मधल्या काळात माझ्या व मानसिंग शिंदेच्या नावासहित Indian Mountaineering Foundation कडून मंजुरी आली होती. सबनीसनं ट्रेकचा पूर्ण अभ्यास केलाच होता. सबनीसचा चुलतभाऊ पराग सबनीस मागील वर्षी हा ट्रेक करून आला होता. त्याच्याकडून जवळजवळ बरीचशी माहिती सबनीसनं मिळवली होती.

अखेर ट्रेकचा कालावधी निश्चित झाला. १७ एप्रिल ते १५ मे, ९४.

सबनीसनं एक छापील रूपरेषाच प्रत्येकाला दिली. त्याचबरोबर कुठल्या कुठल्या वस्तू घ्यायच्या, त्याची यादी.

मग खरोखर सर्वच कामाला लागले. रेल्वे, विमान, जाण्या-येण्याच्या रिझर्व्हेशनच्या बाबतीत हालचाली सुरू झाल्या. रोज सर्वांनी संध्याकाळी रिक्रिएशन

हॉलला येऊन भेटायचं ठरलं व त्याप्रमाणे आम्ही एकत्र जमू लागलो.

चवथा रविवार उजाडला. आज सिंहगडला खानापूरमार्गे जायचं होतं. खानापूरहून पायथ्यापर्यंत पाच-सहा कि. मी. चालणं व नंतर गड चढणं. नवीन मार्ग असल्यामुळं उत्साह होता व आता थोडीशी शारीरिक क्षमताही वाढली होती. पण एके ठिकाणी मात्र, उगाच या मार्गानं आलो, असं वाटू लागलं. गडाचा चढण्याचा शेवटचा टप्पा आला नि वाट एकदम बंद.

मी चक्रावलो.

'काय झालं, एस्. आर्.? चल ना पुढं...' बिरनाळे गालांत मिस्किल हसले.

'अरे, रस्ताच नाही, तर कसं जाणार?' मी म्हटलं, तसे सगळेच हसायला लागले.

'हा समोर कडा आहे ना, तो चढायचा...'

बिरनाळे कडा दाखवीत असताना मी हबकलोच होतो.

तानाजीसारख्यानंही घोरपडीचा आधार घेतला नि मला मात्र विदाऊट घोरपड! हा अन्याय आहे.

माझ्यातला नेता जागा झाला.

आमच्यापैकी प्रत्येक पटपट तो कडा चढून वर जाऊन बसला. मग सगळ्यांनी मिळून मला कडा चढायला सांगितलं.

पहिला गेला, त्याप्रमाणे हातपाय व्यवस्थित खाचेमध्ये ठेवून मी चढायला लागलो. माझ्या अंगावर शहारे आले. एके ठिकाणी दोन्ही हात दोन खाचांमध्ये व दोन्ही पाय खाली छोट्या छोट्या आधारांवर! कड्याचा स्पर्श शरीराला नखशिखांत होत होता.

त्याच वेळेस बिरनाळे खालून ओरडला,

'ए एस्. आर, मागे बघ.'

मी मागं बघितलं नि डोळे गरगर फिरायलाच लागले.

एवढी खोल दरी, नाजूक आधारावर मी उभा, आधार सुटला, तर?

मी लटपटू लागलो.

माझा परत खाली उतरण्याचा विचार बिरनाळेला कळला, की काय, कुणास ठाऊक?

तो म्हणाला,

'इथून खाली उतरणं हे चढण्यापेक्षा जास्त अवघड आहे. तेव्हा तू पुढं चल.'

क्षणभर त्या बिरनाळेला मोठमोठ्या झुबकेदार मिशा फुटून तो मला शेलारमामासारखा वाटू लागला.

–आणि शेलारमामाचे शब्द आठवू लागले,

'भ्याडांनो, दुश्मनाला पाठ दाखवताय्! इथं तुमचा बाप मरून पडलाय्. परतीचे

सगळे दोर कापून टाकलेत. आता लढा, नाही तर मरा.'

मला लढण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं.

मी कसाबसा वरती पोचलो नि थांबलो, तर बिरनाळे मागेच उभा.

'इथं थांबायचं नाही, पटकन ही चढण चढायची नि मग थांबायचं.'

मी हाश्शहुश्श करीत तीही चढण पार केली नि ब्रह्मांड आठवत मटकन् खालीच बसलो. मग मी व तो कडा हा सर्वांच्या चर्चेचा एक विषयच झाला.

मधला आठवडा तयारीसाठी! तयारी सुरू झाली. प्रत्येकानं आपापल्या गरजेच्या वस्तू जमवायला सुरुवात केली होती. मला तर ट्रेकिंग हा विषयच नवीन असल्यामुळं ट्रेकिंगसूटपासून जमवायचं होतं. जगदाळेनं ड्राय फ्रूट्सच्या पॅकेट्स करण्याची जबाबदारी घेतली. डिंक लाडू, गुळाच्या पोळया घरून करून आणायच्या. तर काही पदार्थ कँटीनमध्ये ऑर्डर देऊन घ्यायचे. ट्रेकच्या दृष्टीनं एक एक पाऊल पुढं पडू लागलं होतं. एक महिना खास किरकोळ रजेचे अर्ज भरले गेले. बारा हजार फुटांच्या वर जर तुम्ही ट्रेकिंगला जात असाल, तर त्यासाठी स्पेशल एक महिना किरकोळ रजेची तरतूद सरकारनं केली आहे. Indian Mountaineering Foundation ची मंजुरी मिळाली, की ही रजा मंजूर होते. आमचं वीज मंडळाच्या कोल्हापूर झोनचे स्पोर्ट्स ऑफिसर श्री. चाटे मंजुरीच्या शिफारशीसाठी मुद्दाम आले होते. रेकमेंडेशन देताना व मंजुरी देताना आमचे पुण्याचे वीज मंडळाचे मुख्य अभियंता श्री. मालनी यांनी आम्हां- सर्वांना शुभेच्छा दिल्या.

आता येणाऱ्या शनिवारी सर्वांनी संध्याकाळी सिंहगडला मुक्कामाला जायचं ठरलं. पण कोल्हापूरहून कोण्णूर व चव्हाण यांची येण्याबद्दलची अनिश्चितता नि रविवारच्या ३ एप्रिल,९४ रोजी तांत्रिक युनियनच्या अधिवेशनामुळं शनिवारचा मुक्काम तर नाहीच; पण रविवारीही सिंहगडला मी जाऊ शकलो नाही. पण त्याची भरपाई मी मंगळवारी सिंहगडला जाऊन काढली. मंगळवारी गर्दी मात्र नव्हती.

मधल्या दिवसांत तयारी पूर्णत्वाकडे चालू झाली होती. रिझर्व्हेशन्स मिळाली होती. फक्त रिटर्न रिझर्व्हेशन्सला अवधी असल्यामुळं मिळाली नव्हती. सबनीस, काका देशपांडे, मोरे एक्झिक्यूटिव्ह इंजिनीअर व मी इथं फीदरकोट, रेनकोट, शूज् विकत घेण्याच्या दृष्टीनं पिंपरी, भोसरी परिसर हिंडलो. पण पैशाचं गणित न जमल्यामुळं त्या सर्व वस्तू काठमांडूत भाड्यानं घ्यायचं ठरलं.

एव्हाना मी एव्हरेस्ट बेस कॅम्पला जाणार, हे सर्वश्रुत झालं होतं. मित्रमंडळींतही उलट-सुलट प्रतिक्रिया सुरू झाल्या होत्या. दूरवर जाणं म्हणजे कुठल्या तरी प्रेक्षणीय वा धार्मिक स्थळांना भेट देणं असा मर्यादित अर्थच प्रत्येकाच्या डोक्यात असल्यामुळं

माझ्या हिमालयात जाण्याच्या विचाराचं सर्वांना नवल वाटत होतं. कोणी 'फँटास्टिक डिसिजन', तर कोणी 'का धोक्यात जीव घालतोस, रे?' वगैरे.

वीज मंडळ, मंडळाची कामं, एकमेकांची उणीदुणी यांतून वेगळा काही विचार करण्यास कुणी तयारच नव्हतं. झापडं लावलेल्या बैलासारखं, न थांवता घाणा फिरवणारं जीवन होतं; पण त्यातून थोडासा विरंगुळा म्हणून सुद्धा वेगळी कल्पना कुणी डोक्यात घेत नव्हतं. त्यामुळं माझ्या ट्रेकिंगच्या निर्णयावर मित्रमंडळींचे अभिप्राय सुरू झाले होते.

पण याचा अर्थ मी समजलो होतो. आपण शारीरिक फिटनेसूकडे चाललो आहेत.

मित्रांना काय उत्तर देणार? कारण वजन कमी करण्यासाठी मी काही करतच नव्हतो. रामदासांच्या वचनावर मात्र मी विश्वासानं भिस्त ठेवली होती.

***मनी धरावें तें होतों विघ्न अवघेंचि नासोन जातें।***

***कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते॥***

'अरे एस्. आर्, इतका बारीक कसा झालास?'

'एस्. आर्, तू डाएटिंग करतोस, की काय?'

'हिमालयात जायचं, म्हणून वजन कमी करू लागला, वाटतं!'

'एस् आर., आजकाल स्लिम दिसू लागलास का?'

सहाव्या रविवारी मात्र आम्ही सिंहगड-पायथ्याला न उतरता अलीकडेच उतरलो. जेथून गडावर गाड्या नेण्यासाठी रस्ता आहे, तिथं त्या रस्त्यानं आम्ही पायी सिंहगड गाठला. आदल्या दिवशी पौर्णिमा असल्यामुळं बऱ्याचजणांनी कात्रज-सिंहगड असा ट्रेक आखला होता. ती मंडळी आम्हांला परतताना भेटत होती.

अशा प्रकारे सहा रविवार संपले होते. आता राहिले होते फक्त पंधरा दिवस नि मध्ये एक रविवार! धाकट्या भावाचं लग्न कधीच ठरलं होतं; पण त्याचा साखरपुडा रविवारी करण्याचं वडिलांनी अचानक ठरवलं नि मग हाती होता तो रविवारही हातचा निघून गेला.

मुलांच्या परीक्षा संपल्या होत्या. सुट्टी लागताच ती गावी गेली. घरात सौ., धाकटा भाऊ व मी.

जसजशी १७ एप्रिल जवळ येत होती, तसतसं घरातलं वातावरण तंग होऊ लागलं. सौ. ला वाटलं, की हे बहुतेक जाणार नाहीत. ऐनवेळेस रद्द होईल, वगैरे; पण जसजशी माझी जाण्याची निश्चिती होऊ लागली, तशी मग तिनंही कंबर कसली व तयारी पूर्ण करण्याच्या दृष्टीनं वाटचाल चालू केली– डिंक लाडू, मूगलाडू, चटणी, लोणची करण्याच्या दृष्टीनं. इतर नेण्याचं सामान घरी जमा होऊ लागलं.

एके दिवशी बेस कॅम्पला तीनदा जाऊन आलेले छायाचित्रकार घेऊन श्री. चोरटे यांच्याकडे आम्ही जमलो. त्यांच्याकडून रूटची पूर्ण माहिती करून घेतली. सबनीस, बिरनाळे, जगदाळे व मी असे चौघेच होतो.

त्यांनी काठमांडू येथील श्री. आहुजा यांच्या हॉटेलचा पत्ता व चिठ्ठी दिली. तिथं ट्रेकसाठी उपयोगी साहित्य मिळण्यास अडचण येणार नाही, असं सांगितलं. चोरट्यांच्या शुभेच्छा घेऊन कर्वे रोडवरील एका हॉटेलात चहा-पाणी घेतलं. तर तिथं तीन वेगवेगळया बातम्या कळल्या. एक काका देशपांडे भाचीचं व मुलाचं लग्न ठरल्यामुळं येणार नव्हते, तर बिरनाळे स्वतःच सांगत होता, की घरगुती अपरिहार्य अडचणीमुळं तो येऊ शकत नाही, म्हणून! दोघेजण नमनालाच गळाले होते.

आम्ही सर्वांनी बिरनाळेची खूप समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण तो काही तयार होईना! तिसरी बातमी म्हणजे मोरेंचे चुलते वारले होते व ते गावी गेले होते. त्यांच्याकडून काहीच निरोप आलेला नव्हता. प्रयाण दोन-तीन दिवसांवर आलेलं व अचानक अशा घटना घडल्यामुळं आम्ही चिंतेतच पडलो होतो.

१५ एप्रिलला म्हणजे शुक्रवारी मोरे यांचं येण्याचं निश्चित कळलं. म्हणजे आता बेस कॅम्पला आम्ही आठजण निघणार, हे चित्र स्पष्ट झालं. सबनीस, जगदाळे, मानसिंग शिंदे, अशोक मोरे, डॉ. भालेराव, दीपक कोण्णूर, राम चव्हाण व अस्मादिक! मी जरी या आठजणांमध्ये नवीन असलो, तरी बाकीचे सातजण या ट्रेकशी संबंधितच होते. त्यात आम्ही सातजण वीज मंडळातच कामाला होतो. फक्त डॉ. भालेराव बाहेरचे होते. पण ट्रेकिंगमुळं सबनीस, जगदाळे, मोरे यांच्या संपर्कात आले होते.

आज मी दिवसभर बाजारातच फिरत होतो. आवश्यक वस्तू खरेदी करणं एवढंच काम, औषधं, कपडे, टी-शर्टस्, सॉक्स, हातमोजे– एक ना दोन, भाराभर वस्तू. एकही न टळणारी, खरेदी जवळजवळ दोन हजार रुपयांपर्यंत झाली होती, व प्रवासाचा खर्च आठ हजार रुपयांपर्यंत जाईल, असा सबनीसनं अंदाज काढला होता. म्हणजे बेस कॅम्प खर्च दहा हजार रुपयांपर्यंत जाणार, असं चिन्ह दिसू लागलं.

शनिवार संध्याकाळपर्यंत घरात डिंक लाडू, मूगलाडू, चटणी, लोणची तयार झाली होती. सौ. मात्र लाडूऐवजी मूग गिळून गप्प झाली होती. त्यात 'एक सुंदर हिमस्वप्न' हे पुराणिक यांचं पुस्तक मी या ट्रेकिंग संदर्भात घरी आणलं होतं. ते सौ. नं पूर्ण वाचून काढलं होतं नि त्यातले धोके तिच्या डोक्यात बसले होते.

एका वेगळया वाटेवर जायचं, म्हणून मनातून मलाही धाकधूक होतीच. कारण पुढं काय वाढून ठेवलं आहे, हे कोणीच सांगू शकणार नव्हतं.

माणसाचं मन किती विचित्र असतं, नाही? सारखं रूटीन वर्क म्हणून कंटाळा आलेला. तो घालवायचा, तर नवीन काही तरी केलंच पाहिजे. नवीन काही करायचं म्हटलं, की त्यातले फायदे-तोटे, धोके, वेळेचा व्यय, वगैरे वगैरे सगळया गोष्टींचा विचार

करावयास मन सुरुवात करतं. जमेल, की नाही? यश मिळेल, की नाही? अशा नकारार्थी विचारातूनच माणूस कार्य सुरू करतो. नकारार्थी सुरुवात सकारापर्यंत नेणं अवघडच. पण आपली महाराष्ट्रियन प्रवृत्ती सहसा अशीच. साहजिकच माझ्याही डोक्यात असेच विचार अधूनमधून डोकवायचे. पण मला तर इथं स्वतःवरच आश्वासक असा प्रयोग करावयाचा होता. तेव्हा असले विरोधी विचार मी झटकन बाजूला फेकायचो.

ट्रेकिंगला, एव्हरेस्ट बेस कॅम्पला जाताना, आमच्याबरोबर अनुभवी मंडळी होती. त्यांच्यावर माझा विश्वास तर होताच; माझीही इच्छाशक्ती जबरदस्त होती. धोके असतील, तर त्यास सामोरे जाण्यास मनाची तयारी मी केली होती. त्यामुळं सौ. ला सावकाश धीर देत होतो.

रविवार १७ एप्रिल, ९४. आज संध्याकाळी ५=४० ला झेलमनं प्रयाण! सकाळपासूनच सर्व सामान व्यवस्थित आल्याची व एकत्रित ठेवण्याची काळजी घेऊ लागलो. सौ. वैजूनं गुळाच्या पोळयांचं काम हाती घेतलं होतं. तोपर्यंत मी मंगळवारातला चोरबाजार गाठला. काल सॅकची कॅम्पमध्ये चौकशी केली, तर एक हजार रुपयांपासून पुढं तिच्या किमती! म्हटलं, यानंतर आपण परत गेलो, तरच त्या सॅकचा उपयोग, नाही तर मग सॅक घरात पडून राहणार! मग जरा कमी किमतीत व एका ट्रेकला उपयोगी पडली, तरी पुरे, म्हणून चोरबाजार डोक्यात आला. इथं खूपशा वस्तू स्वस्त मिळतात. फक्त गॅरंटी नसते. एक जीन पँट व सॅक खरेदी केली. दुपारी सगळं सामान सॅक व एका मोठ्या सूटकेसमध्ये भरण्यात यशस्वी झालो. हे सर्व करीत असताना सौ. वैजूच्या डोळयाला डोळा न भिडेल, याची मी काळजी घेत होतो. कारण तिच्या डोळयांत गंगा-यमुना उगमक्षणाची वाट पाहतच उभ्या होत्या. काम करता-करता तिच्या काळजीयुक्त सूचना चालू होत्या :

'फोनची व्यवस्था असेल, तर दररोज फोन करा...'

'उगाचच नसता धोका पत्करू नका.'

'तुम्हांला परत पाहीपर्यंत मला काही चैन पडणार नाही.'

'तुम्ही या वर्षाचं पंचांगातील भविष्य वाचलंत ना! मग जरा जपूनच.'

११ एप्रिलला गुढीपाडवा! नवीन वर्षाची सुरुवात नवीन पंचांगाच्या पूजनानं! त्यामुळं ९ एप्रिलला घरात नवीन वर्षाचं पंचांग आलं. सौ. ची व कन्येची दोघींचीही रास मकर! वर्षभराचं पंचांगातलं भविष्य पूर्ण संकटग्रस्त दिलं होतं. राशीला साडेसाती असल्यानं नवीन वर्षात एकही महिना चांगला जाणारच नाहीये.

१४ एप्रिलचं मेषसंक्रमण गृहसौख्य बिघडविणारं. घरातील विचित्र घटना धावपळ करायला लावतील वगैरे, माझी निघण्याची तारीख १७ एप्रिल. त्यामुळं हे

भविष्य तर अजून भेडसावू लागलं नाही, तरच नवल. मग सौ. वैजूची समजूत घालता-घालता मीही त्या भविष्याचा आतल्या आत विचार करू लागलो. त्या भविष्याला माझ्या निर्णयाच्या आसपासही मी फिरकू देणार नव्हतो. पण शंकेची पाल मात्र उगीचच मनाच्या भिंतीवर चुकचुकत होती.

'तुम्हांला नंदनवन पाहण्याची संधी मिळाली आहे. सगळयाचं इत्थंभूत वर्णन मात्र मला सांगितलं पाहिजे.'

'मुलांचे परीक्षेचे निकाल बरे-वाईट लागले, तर मी एकटी काय, हो, निर्णय घेणार ?'

ट्रेकच्या काळातच मुलांचे रिझल्ट लागणार होते. मुलांनी अभ्यासही व्यवस्थित केला होता. पण काळजी कुणाला कुठं नेऊ शकते, हे सांगता येत नाही.

दुपारी साडेचारपर्यंत या सर्व गप्पागोष्टी, सूचना व आवराआवरीत वेळ गेला. पावणेपाचला आम्ही सर्वजण घरातून निघालो. सौ.वैजू व भाऊ दोघेही निरोप देण्यासाठी माझ्याबरोवर स्टेशनवर निघाले होते. पाच वाजता पुणे स्टेशनवर पोहोचलो.

आज सकाळीच चोरवाजारातून आणलेल्या सॅकनं रिक्षातच मान टाकली होती. भरपूर सामानामुळं, का त्या सॅकच्या क्वालिटीमुळं हे मात्र समजलं नाही. स्वस्तातली वस्तू; पण आता परत सॅक घ्यावी लागणारच, म्हणजे महागातच पडली. प्लॅटफॉर्म नं. ५ वर झेलम उभी होती. सबनीस, जगदाळे, मोरे, कोण्णूर, चव्हाण, भालेराव नुकतेच आलेले होते. मिसेस् सवनीस, मोरे, जगदाळे, भालेराव ह्या त्यांच्या सर्व कुटुंबीयांसहित निरोप देण्यास आले होते. सौ. वैजूस त्या कुटुंबांत सोडलं व आम्ही मानसिंग शिंदेची वाट बघत गप्पा मारू लागलो. मानसिंग शिंदे मात्र अजून यावयाचा होता. साठे कंपनीनं दिलेला बिस्किटांचा डबा सांभाळत तो धावत- पळत साडेपाचला आला.

नातेवाईक, क्रीडाप्रेमी यांनी निरोप देण्यासाठी केलेली गर्दी पाहून मन भारावून गेलं. नाट्यक्षेत्रापासून सगळीकडे साथ देणारा रवी सांभारे त्याची पत्नी व नाजूक कन्या रसिका, तर विनधास्त व्यक्तिमत्त्वाचे एम्.जी. शिंदे, खेळकर व्यक्तिमत्त्वाचे श्रीकांत वावर, नौशाद, सौंदत्ती, बाबा कुंभार ही सर्व मित्रमंडळी आमच्या वीज मंडळात काम करणारी, तर सिंहगड वारकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून आलेले वाडेकर, संधी असून सुद्धा या ट्रेकला न येऊ शकणारा विरनाळे–सगळयांनी पुष्पगुच्छ देऊन 'शुभास्ते पन्थानः' म्हणून आम्हां सर्वांना शुभेच्छा दिल्या.

खरोखरच किती हृद्य प्रसंग! आज जगाची वाटचाल अशा दिशेनं चालू आहे, की भाऊ भावाला विचारीत नाही, की मुलगा बापाला. अशा परिस्थितीत कुणाचा कुणाशीही नातेसंबंध नसताना एका वेगळयाच प्रेमधाग्यांनी बांधलेली माणसं एकत्र येतात काय ? नि एकमेकांना प्रेमाचे संदेश, शुभेच्छा देतात काय ?

मी आधीच थोडासा हळवा. त्यात असा प्रसंग.

हृदयात चलबिचल सुरू झाली. दूर काही अंतरावर वैजू उभी. तिच्याकडे

पाहावं, की नाही ? तिच्याशी बोलावं, की नाही ? काहीच सुचत नव्हतं. चोरट्या नजरेनं तिच्याकडे पाहिलं. तीही माझी नजर चुकवत असावी. सर्व गर्दीकडं अलिप्ततेनं पाहत होते. डोळे मात्र मूर्तिमंत काळजीनं भरले होते.

प्रेम करण्यासाठी देवानं स्त्रीचं मन द्यावं, असं म्हणतात, ते काही खोटं नाही. कितीही अपराध करा, आई असेल, तर पदराखाली घेईल. पत्नी असेल, तर पांघरूण घालेल. पण वाऱ्यावर नाही सोडणार. आपला सहचर आज निघाला आहे, तो अशा ठिकाणी, की जिथं धोक्याची शक्यता आहे. मरणाला जिंकणारा गारठा आहे, प्रदेश अज्ञात आहे. क्षणाक्षणाला बदलणाऱ्या वातावरणास टक्कर देण्यास तो चालला आहे. कदाचित.....

कदाचित काहीही होऊ शकेल. परत तो आपल्याला आहे तसा तरी दिसेल का ? या नि अशा सर्व वाईट विचारांचा कल्लोळ तिच्या मनात निश्चितच उसळला असणार.

मला मिळालेला पुष्पगुच्छ तिच्या हातात दिला. क्षणभर तिच्याकडे पाहत म्हटलं,

'माझी काळजी करू नकोस, स्वतःची, मुलांची काळजी घे.'

अश्रुभरल्या डोळयांनी माझ्या डोळयांत पाहत ती म्हणाली,

'नीट जा, स्वतःला जपा, ह्या क्षणापासूनच मी वाट पाहतेय्.'

कसे असतात नाही हे प्रसंग. निःशब्द. एकमेकांशी शब्दांशिवाय बोलायचं. मनात बोलण्यासाठी एवढं असतं, की ते व्यक्त करावयास शब्दच नसतात व दोघेही अबोलपणे बोलून सर्व समजून घेतात.

गाडी सुटण्याच्या काही क्षण आधी माझा मावसभाऊ मंगेश व त्याची पत्नी माधुरी निरोप देण्यास आली. तेवढ्यात गाडी हलली. दारात उभा राहून हात उंचावून सर्वांचा निरोप घेत होतो. सगे-मित्र-गर्दी, स्टेशन हळूहळू मागे पडू लागलं.

आम्ही निघालो होतो... आम्हांला अज्ञात असलेल्या दिशेकडे.

आमची दिशा एकच– एव्हरेस्ट बेस कॅम्प– सागरमाथ्याचा पायथा.

जड अंतःकरणानं आणि संमिश्र भावनांनी झटकन डब्यात शिरलो व खिशातला रुमाल डोळयांना लावला.

भिन्न स्वभावांचे, वेगवेगळया भागांत राहणारे. एकमेकांची पुरती ओळखही नसलेले आठजण आज एका उद्देशानं, एका दिशेनं निघाले होते. दीपक कोण्णूर व राम चव्हाण कोल्हापुरात राहणारे. या दोघांना मी काल प्रथमच पाहिलेलं. अशोक मोरे वरिष्ठ अधिकारपदावरचे. त्यामुळं त्यांचीही ओळख तशी दूर अंतरावरूनच व तीही गेल्या एक महिन्यातली. डॉ. मुकुंद भालेराव हे दोन-तीन वेळा सिंहगड चढताना भेटले, एवढंच. मानसिंग ऊर्फ मामा शिंदेंचा परिचय सुद्धा आत्ता आत्ताच झालेला. एक-दोन

भेटींत एकमेकांच्या आवडीनिवडी, स्वभाव कसे कळणार? एक महिना बरोबर काढावयाचा, म्हणजे एकमेकांना एकमेकांची ओळख होणं गरजेचं नव्हे, तर आवश्यकच आहे नि त्यामुळं प्रत्येक जण एकमेकांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करणार होता आणि हे साहजिकच होतं. कारण आजपासून एक महिना एकमेकांशिवाय आम्हांला कोण होतं?

आपआपलं सामान बर्थवर व्यवस्थित लावण्यास प्रत्येकानं सुरुवात केली होती. प्रत्येक जण हळूहळू रिलॅक्स्ड मूडमध्ये येऊ लागला होता. एका अवघड प्रवासाचं प्रस्थान अश्रुमय निरोपांनी झाल्यामुळं सगळेच गंभीर मूडमध्ये होते.

'काय, रे, मामा, स्टेशनवर यावयास एवढा उशीर? साल्या, गाडी सुटली असती, म्हणजे?' सबनीस शिंदेंना विचारीत होता.

'अरे, एकतर रविवार असल्यामुळं साठेवाल्यांनी तो बिस्किटचा डबा दुसऱ्याच्या ताब्यात दिलेला! ती माहिती काढून, त्यांच्या घरून आणता-आणता एवढा वेळ गेला...' मामा शिंदे.

'अरे गधड्या, हे कालच करायचं! ऐनवेळेस अशा गोष्टी सर्वांनाच काळजीत टाकतात.'

एकमेकांचे हालहवाल विचारणं सुरू झालं.

गप्पागोष्टी चालू असताना दीपक मधेच म्हणाला

'सबन्या, जेवण करून घेऊ, यार! जाम भूक लागलीय्...'

'दीपक , आपण नगर स्टेशन सोडल्यानंतर जेवू या. अजून अर्ध्या तासातच नगर येईल. नगरला बरेच नातेवाईक आहेत माझे. त्यांना आपण या गाडीनं जाणार आहोत, हे कळवलं आहे.' मी दीपकला म्हटलं.

'वा, वा, वा! म्हणजे अजून घरची शिदोरी मिळणार तर आपल्याला. ठीक आहे, नगरनंतर जेवू या.' सबनीस.

'शिदोरी तर मिळणारच, पण सदिच्छासुद्धा मिळणार, बरं का...'

'सबनीस, नगरला माझे भाऊ, मेव्हणे येणार आहेत, आपल्याला शुभेच्छा द्यायला!' मी सबनीसला म्हणालो.

'व्हेरी गुड, शुभेच्छांची आपल्याला जरुरी आहेच.'

मी नगरचा राहणारा. त्यामुळं नगरला रात्री नऊ पाचला गाडी स्टेशनवर थांबल्यावर माझ्या नातेवाइकांनी आम्हां सर्वांचं स्वागत केलं व सर्वांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. भाऊ, मेव्हणे, मुलं– सगळे एकदम भेटल्यामुळं पाच-दहा मिनिटं अगदी घरी आल्यासारखं वाटलं.

सगळ्यांच्या एकमेकांशी ओळखी करून देण्यातच दहा मिनिटं गेली.

गाडीला सिग्नल मिळाला होता. गाडी हलली, तसा सर्वांचा प्रेमाचा निरोप

घेतला.

आता मात्र पोटातले कावळे भुकेची जाणीव करून देऊ लागले. सगळयांचे जेवणाचे डबे सुटू लागले. दोन दोन दिवसांचा जेवणाचा डबा आणायचा, अशा सूचना सर्वांना दिल्याच होत्या. मग सगळयांच्या घरच्या आठवणी काढीत चवीचवीनं सहभोजन सुरू झालं.

जेवणानंतर सबनीसनं हिशेबाला हात घातला.

कुणी किती पैसे दिले? कुणी किती आणले? वगैरे वगैरे.

सबनीसचा हिशेबाच्या बाबतीतला चटपटीतपणा पाहून कौतुक वाटलं. नाही तर मी! हिशेब म्हटला, की आळस भरलाच अंगात. आपण वायफळ खर्च करत नाही ना? मग हिशेब कशाला पाहिजे? हे डोक्यात अगदी पक्कं बसलेलं मन असल्यामुळं कशाचाही जमाखर्च, हिशेब यांचं माझं कधी सूत जमलंच नाही. एकत्रित रकमेचा आकडा पाहून सबनीस समाधानी दिसला.

एकेकजण आता आपआपला बर्थ गाठू लागला होता.

बर्थवर पडलो होतो; पण झोप काही लागत नव्हती. एरव्हीच रेल्वेच्या प्रवासात, का, कुणास ठाऊक, पण मला झोप म्हणावी तशी लागत नाही. नि आज तर एका वेगळया उद्दिष्टाचं प्रचंड ओझं घेऊन मी प्रवास सुरू केला होता. गाडीच्या हेलकाव्याचा नि खडखडाटाचा न्हिदम विचारांनाही चालना देत होता.

मी खरोखरच हिमालयाकडे निघालोय्, यावर माझा मलाच विश्वास वाटत नव्हता. दोन महिन्यांपूर्वी एखाद्या भविष्यवेत्त्यानं खात्रीनं जरी सांगितलं असतं, की अजून दोन महिन्यांनी तुम्ही दूरच्या अज्ञात प्रवासाला निघणार आहात, तर त्यावर कोणीही विश्वास ठेवला नसता. पण हिमालयाबद्दलची प्रचंड ओढ व उत्सुकता मला त्या दिशेनं खेचून नेत होती. लोहचुंबकानं लोखंडाला घ्यावं, तसा हिमालय मला आकर्षून घेत होता. हिमालयाची वर्णनं वाचली होती निरनिराळया कथा-कादंबऱ्यांतून. हिमालयाची उत्तुंगता मनात ठसत होती. काव्यातील अजोड शब्दाशब्दांतून. मन पाखरासारखं त्या कल्पनेतून भिरभिरायचं, पण समाधान मात्र मिळत नव्हतं. कवी-लेखकांच्या प्रतिभेला आवाहन देणारा हिमालय, ऋषी-मुनींनी तपःसाधनेसाठी, एकांतासाठी ज्याला जवळ केलं, गिर्यारोहकांना सतत आव्हान देणारा तो हिमालय आहे तरी कसा, याचं कायम मनात प्रश्नचिन्ह असायचं. पुराणकथांतून तर वाचलं होतं, की हिमालयातल्या कैलास शिखरावर साक्षात शंकरांनी वास्तव्य केलेलं. जगातील उच्चतम शिखर असलेला एव्हरेस्ट हा ज्याचा एक भाग आहे, असा हिमालय हा माझ्यापुढं गूढ बनून राहिला होता. हे गूढ उकलायचं, तर त्याच्या कुशीतच जायला

हवं. नि हीच जबरदस्त इच्छा एव्हरेस्ट बेस कॅम्पच्या ट्रेकिंगसाठी मला कारणीभूत ठरली. आता एव्हरेस्ट मात्र दूर नाही, याची मला खात्री वाटू लागली.

रात्री अकराच्या सुमारास आम्ही मनमाड ओलांडलं होतं. नंतर मात्र विचाराच्या नादात डोळा केव्हा लागला, ते कळलंच नाही. सकाळ 'ताजा चाय' या कर्णकर्कश आरोळीनं उजाडली. गाडी खांडवा स्टेशनवर उभी होती.

'उठा, एस्.आर्., किशोरकुमारच्या गावात आलो आहोत आपण.' डॉ. भालेराव डायरी लिहिता-लिहिता मला माहिती देत होते.

'चला जाता हूँ किसीकी धुनमें'

'मैं हूं झूम झूम झूमरू ...'

'जिंदगीके सफरमें गुजर जाते हैं जो मकाम, वो फिर नहीं आते...'

डॉक्टर माहिती देत असताना अशा अनेक गाण्यांची सुरावट मनःपटलावर तरंगून गेली. त्या बेसूर चहावाल्याला हे बहुतेक माहीत नसावं, की स्वतःच्या रसाळ सुरांनी गानप्रेमींना वेड लावणारा किशोरकुमार खांडव्याचा राहणारा आहे, म्हणून एकएकजण हळूहळू उठत आळस देऊ लागला होता. आजचा दिवस आमचा गाडीतच जाणार होता. झेलमनं आम्ही झाँसीपर्यंतच जाणार होतो आणि झाँसीला आम्ही पोहोचणार होतो, ते दुपारी तीनच्या सुमारास.

साडे दहाच्या सुमारास भोपाळ शहराच्या खुणा दिसू लागल्या. दहा पंचावन्न ला गाडी भोपाळ स्टेशनमध्ये शिरली.

प्रत्येक गावाचं एक वेगवेगळं वैशिष्ट्य असतं. तसं भोपाळचं वैशिष्ट्य काही वर्षांपूर्वी ठरून गेलं होतं. युनियन कार्बाईड फॅक्टरीतल्या वायुगळतीनं भोपाळच्या काही भागांची केलेली वाताहत कुणीही विसरू शकणार नव्हतं. दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्बनं झालेली जपानची वाताहत आज पन्नास वर्षं झाली, तरी तेथील जनता विसरू शकली नाही. तशीच ही भोपाळमधील घटना. मालकांची बेपर्वाई, मॅनेजमेंटचा निष्काळजीपणा व त्यावर राजकारणाचं स्वार्थी पांघरूण यांमुळं सामान्य जनता कशी देशोधडीला लागते, त्याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे युनियन कार्बाईड व भोपाळ.

सर्वजण आता एकमेकांशी खुल्या दिलानं बोलू लागले होते. चेष्टा- मस्करी चालू झाल्या होत्या. किशोरनं पत्त्याचे कॅट्स बाहेर काढले. मी व राम चव्हाण सोडून सगळे रमीच्या डावात गुंगू लागले. आम्ही दोघांनी समोरासमोरच्या खिडक्या गाठल्या. खिडकीत बसून प्रत्येकाची ढब बघत होतो. गप्पागोष्टींतून प्रत्येकाची जुजबी माहिती मिळाली होती.

'तुम्ही नाही खेळत रमी?' राम मला विचारत होता.

'नाही, मला काही एवढी आवड नाही... अजून महिनाभर घालवायचाच आहे.

नि प्रवासात निरीक्षण करण्याचा मला छंद आहे.'

माझं उत्तर ऐकून तो हरखला.

'आमच्या कोल्हापूरला सुद्धा मी एकटा असल्यामुळं पत्त्याचा आग्रह होतो; पण मला नाही जमत.'

रामनं वाढवलेली छोटेखानी दाढी व वाक्याच्या शेवटी एक डोळा कळत नकळत बारीक करण्याची त्याची लकब त्याला शोभून दिसायची.

कोल्हापूरला वीज मंडळाच्या संगणक विभागात काम करणारा राम अविवाहित आहे, हे गप्पांच्या ओघात कळलं. तसा एकंदरीत तो मितभाषी वाटला. गिर्यारोहणाची आवड खूप. त्यामुळं कोल्हापूरजवळचे छोटे छोटे ट्रेक नेहमी केलेला. त्याला जोडीदार दीपक कोण्णूर मिळाला. त्याच्या शेजारी रमीची पानं जुळवत होता. दोघेही कोल्हापूरहून आल्यामुळं दोघांचंही उठणं, वसणं बरोबरच असायचं. बर्थही शेजारी शेजारीच.

'रांडेच्या जोकर्सची नुसती गर्दी झालीय्, पण प्युअर सीक्वेन्स् काही होईना. अरे, राम, बघ तरी.'

कोल्हापूरच्या बोलण्याचा ठसका दीपकच्या बोलण्यात दिसायचा.

दीपक सुद्धा कोल्हापूरलाच वीज मंडळाच्या संगणक विभागात एक अभियंता म्हणून होता. 'रोझा'तील अरविंदासारखे मोठे बोलके डोळे. बोलताना इंग्रजी वाक्य पेरण्याची सवय. समोरच्यावर प्रभाव पडेल, असं व्यक्तिमत्त्व. कोल्हापूर व कोकण भागांत बऱ्याच ठिकाणी रामबरोबर ट्रेकिंग केलेला. पण इतक्या मोठ्या ट्रेकला मात्र प्रथमच निघालेला.

दीपकच्या शेजारी बसले होते डॉ. मुकुंद भालेराव. त्यांच्या साध्या राहणीवरून आणि खळखळ बोलण्यावरून हा गृहस्थ डॉक्टर आहे, नि तोही पुण्याचा, यावर कोणी विश्वासच ठेवला नसता. माझ्या ट्रेकिंगला जाण्याच्या निर्णयात डॉक्टर या शब्दास पन्नास टक्के श्रेय आहे. तशी माझी डॉक्टरांची ओळख झाली सिंहगडावर एक महिन्यापूर्वी. पण ट्रेकिंगला जाणाऱ्या ग्रूपमध्ये एक डॉक्टरही आहे, हेच माझ्यासारख्या नवख्यास पुरेसं होतं. या ग्रूपमध्ये कोणी डॉक्टर नसतं तर कोण, कितपत तयार झालं असतं, याबद्दल मला शंकाच आहे. निदान मी तरी मागं पाय घेतला असता. ग्रूपमधल्या डॉक्टरनं कुठली डिग्री घेतली किंवा नाही, याबद्दल मला विशेष महत्त्वच नव्हतं. डॉक्टर आहे ना! मग बस्स. मी माझ्या ट्रेकिंगमधील तब्येतीच्या दृष्टीनं एकदम निर्धास्त झालो होतो.

डॉक्टरांनी उतारीचं पान टाकलं नि लगेच शेजारी असलेली डायरी घेतली व त्याच्यावर नोंद सुरू केली.

पुण्यात बसल्यापासून डॉक्टरांनी डायरी लिहावयास सुरुवात केली आहे. बारीक सारीक तपशिलांसहित नोंद करण्याची त्यांची सवय आहे.

मी उगाचच स्वतःशी हसलो. उद्यापासून रोज डायरी लिहायची, असा मी रोज

निश्चय करतो; पण तो 'उद्या' अजून आलेलाच नाही.

'काय, डॉक्टर, कोणी कोठली उतारी केली, ते लिहिता, की काय, डायरीत ?' मामा शिंदेनं डॉक्टरांच्या डायरीच्या चेष्टेचा सूर लावला.

'अरे, मामा, कर, चेष्टा कर माझ्या डायरीची! पण आधी उतारी कर!' डॉक्टरांचा सल्ला!

मामा म्हणजे मानसिंग शिंदे. डॉक्टरांच्या पलीकडे बसला होता. वीज मंडळात रास्ता पेठ इथं अनुरेखक. तशी ओळख वरवरचीच होती. ट्रेकिंगबाबत मात्र त्याच्याबद्दल माहिती नव्हतं. नेहमी हसतमुख चेहरा, हे मामाचं वैशिष्ट्य. गोऱ्यापान चेहऱ्यावर काळया काड्यांचा चश्मा उठून दिसत होता.

'ए मामा, उगाच चेष्टा करू नकोस डॉक्टरांच्या डायरीची! अरे, व्हॅली ऑफ फ्लॉवरच्या वेळेस त्यांची डायरी म्हणजे आमचे सार्वजनिक वाचनाची पारायणं व्हायची, माहितीये ?'

मोरेंना वाक्याच्या शेवटी 'माहितीये' म्हणण्याची सवय!

मोरे माझ्या बाकावर थेट पलीकडे बसले होते. अशोक मोरे, वीज मंडळाच्या पुणे संगणक विभागात कार्यकारी अभियंता. शांत स्वभाव, बोलणं कमीच. आपल्या पदाची झूल संगणक विभागात सोडूनच आलेले होते. त्यामुळं खेळकरपणा, मोकळेपणा सहज दिसत होता. दोन- तीन ट्रेकिंगचा अनुभव पाठीशी होता. कोल्हापूर व पुणे दोन्ही ठिकाणी संगणक विभागात काम केल्यामुळं सर्वांचेच परिचित.

मोरेंच्या अलीकडे बसला होता किशोर जगदाळे. अति उत्साही. कोणी त्याला किशोर म्हणायचे, तर कुणी जग्गु, जग्गुभाई– जगदाळे आडनावावरून! ट्रेकिंग व कामगार कल्याण केंद्राच्या सहलीमुळं सर्वांना माहीत असलेला. मानस सरोवर ट्रेकिंग पूर्ण केलेला .अति उत्साहामुळं कधी कधी चंचलही वाटायचा. सिंहगडावर जातानाच त्यानं जे मला चढण्याचे धडे दिले होते, त्यांवरूनच त्याचा अनुभव लक्षात आला होता. किशोरही पुणे संगणक विभागातच काम करीत होता.

किशोरच्या अलीकडे म्हणजे माझ्याजवळच बसला आहे चंद्रशेखर सबनीस. परखड व फटकन बोलणारा; पण कोकणातील नारळासारखा आतून प्रेमळ, मी त्याला ओळखू लागलो, तेव्हापासून आठवतं, ती त्याची स्पोर्ट्सबद्दलची ओढ. सध्या पुणे रिक्रिएशन क्लबचा अध्यक्ष. वीज मंडळाच्या स्पर्धा चालू आहेत नि सबनीस नाही, असं होणारच नाही. त्याचं फटकन बोलणं सुद्धा आपल्या हितासाठीच असतं, हे एकदा समजलं, की तो फार जवळचा वाटतो. तर असा हा सबनीस आमच्या ह्या ग्रूपचा नायक म्हणून भूमिका बजावणार होता. सध्या सबनीस वीज मंडळाच्या कोथरूड विभागात अभियंता म्हणून काम करीत होता.

विचारांचा रोख फिरत-फिरत माझ्यावर स्थिर झाला होता. माझं सूर्यकान्त हे नाव बहुतेक कुणालाच माहीत नव्हतं. कुलकर्णी, जोशी, देशपांडे या नावाचे असंख्य

असल्यामुळं त्यांना आद्याक्षरांनीच ओळखणं हा जवळ जवळ नियमच झाला आहे. तसा मी 'एस्. आर्.' या नावानं ओळखीचा. माझ्याबद्दल जेवढं सांगावं, तेवढं जास्तच होणार आहे. ट्रेकिंगच्या बाबतीत शून्यच, म्हणजे ना शिक्षण घेतलेलं, ना कुठं ट्रेकिंग केलेलं. स्पोर्टशी संबंधही यथातथाच. वीज मंडळाच्या नाटक-स्पर्धांतून छोट्या-मोठ्या काही भूमिका केल्यामुळं काहीजणांना परिचित. आमच्या आठजणांत फक्त सबनीस व जगदाळेच मला ओळखत होते. एक विद्यार्थी म्हणून इतर सातजणांकडे गुरू या भावनेनंच बघत होतो. एव्हरेस्ट बेस कॅम्प गाठण्यास या लोकांच्या अनुभवांची शिदोरीच मला उपयोगी पडणार होती.

पाऊण वाजता गाडीनं बीना स्टेशन सोडलं, तसे झाँसीचे वेध सुरू झाले. वीस-पंचवीस मिनिटांत पत्त्यांचा डाव गुंडाळला गेला. सामानाची बांधाबांध सुरू झाली. पावणे तीनच्या सुमारास गाडी झाँसी स्टेशनवर थांबली. झाँसीहून गोरखपूरला जाणारी ट्रेन रात्री साडेआठला– म्हणजे मधे तब्बल पाच-साडेपाच तासांचा अवधी होता. त्या वेळात झाँसी पाहावी, अशी टूम निघाली. पण सामान ठेवायचं कुठं, हा प्रश्नच होता. कारण क्लोकरूममध्ये सामान ठेवायचं, तर सॅक वगैरे असल्यामुळं लॉक शक्यच नव्हतं. मग वेटिंगरूममधीलच एका कर्मचाऱ्याला सामानावर लक्ष ठेवण्यास सांगितलं. वेटिंगरूममधून फ्रेश होऊन आम्ही बाहेर पडलो. आठजणांसाठी दोन रिक्षा केल्या व निघालो.

प्रथम झाँसीचा किल्ला.

ऐतिहासिक स्थळांचं एक वैशिष्ट्य असावं. तुम्ही त्या वास्तूकडं जसजसे पुढं जाऊ लागता, तसतसं तुमचं मन भूतकाळातील त्या मंतरलेल्या क्षणांकडे मागं सरकू लागतं. निदान माझ्या बाबतीत तरी नेहमीच असं घडतं.

किल्ला दिसू लागला होता. थोड्याशा उंचीच्या डोंगरावरील भुईकोट किल्ला. चहूबाजूंनी दगडांची भक्कम तटबंदी, किल्ल्याभोवतीचे खोल खंदक, शत्रूवर मारा करण्यासाठी केलेले झरोके– जंग्या, पळून जाण्यासाठी व फसवण्यासाठी खणलेली मोठीमोठी भुयारं, सुरुंग, किल्ल्यात राहणारांसाठी पाणी मिळावं, यासाठी केलेली व्यवस्था, हे सर्व पाहिलं, की त्या वेळचं वास्तुशास्त्र किती प्रगत होतं, हे लक्षात येतं. हे सर्व पाहता-पाहता एका उंच तटबंदीवर आलो होतो. तिथं पाटी होती :

'यहीं से राणी लक्ष्मीबाई ने घोडे पे सवार हो कर कूद लगायी थी।'

मन सुन्न झालं. लहानपणी पाठ केलेल्या कवितेच्या ओळी आठवल्या.

***'रे हिंदबांधवा, थांब या स्थळी, अश्रू दोन ढाळी***
***ती पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाँसीवाली'***

काही मैलांवर जाऊन मावळलेल्या त्या देशप्रेमी ज्योतीनं या तटावरूनच उड्डाण केलं होतं. स्वार्थासाठी स्वतःच्याच बांधवांना चिरडणारे आम्ही भारतीय अशा पवित्र

ठिकाणी दोन अश्रू ढाळण्याच्याही लायकीचे राहिलेलो नाहीत, हे त्या आशावादी कवीला कुणी तरी जाऊन सांगितलं पाहिजे.

आपल्या राज्यासाठी मुलाचं लग्न बाजूला ठेवून, चढणं अशक्य आहे, अशा कड्यावरून गड चढणारा तानाजी काय किंवा स्वातंत्र्यासाठी मुलाला पाठीशी घेऊन जिथून उतरताच येणार नाही, अशा तटावरून घोडं फेकून शत्रूवर प्रहार करणारी राणी लक्ष्मीबाई काय, ह्या व्यक्ती खरोखरच ह्या भारतामध्ये जन्माला आल्या होत्या? राणी लक्ष्मीबाईनं जाणून बुजून मृत्यूच्या सरणावर घेतलेली उडी आम्ही करंटे वाया घालवीत आहोत. या विचारानं मन विषण्ण झालं.

सुस्कारा टाकून पुढं निघालो. दुसरं काही पाहण्यात मन रमणार नव्हतं. झाँसीच्या बाजारच्या रस्त्यातून–की जिथं जेमतेम दोन रिक्षा जाऊ शकतील, वाट काढीत-काढीत किशोरचे तेथील एक मित्र प्रकाश वैद्य यांच्याकडे गेलो. महाराष्ट्रियन, पण तिथं रेल्वे डिपार्टमेंटमध्ये नोकरीला. त्यांच्याकडे प्रथम चहा झाला व नंतर कुरमुरीत वेफर्स, कुरड्या आल्या. आम्ही बराच वेळ ते नाकारण्याचा प्रयत्न केला, तर त्यांनी त्यांच्या एका सरदार मित्राचं म्हणणं आम्हांला सांगितलं. त्याला फक्त चहा आवडायचा नाही. तो म्हणायचा,

'क्या, यार? सिर्फ नंगी चाय! उसको कुछ कपडा-वापडा होना!'

तर असं हे दिलखुलास स्वागत आम्हां पुणेकरांनाच चांगलंच भावलं.

झाँसीमध्ये बैठी घरं फार. दोन-तीन मजली इमारती. चार मजली इमारती नाहीत, म्हटलं, तरी चालेल. नक्षीदार सिमेंटच्या कोरीव खिडक्या, गॅलरीत, गच्चीतही अशीच नक्षीदार खिडक्यांची जाळी. पुणे- मुंबईत सहसा अशी बांधकामं नाही दिसत. इथं जागा भरपूर असल्यामुळं प्रत्येक खोली कशी प्रशस्त.

साडेआठच्या गोरखपूर गाडीचे वेध लागले होते.

वैद्यांचे आभार मानून साडेसातपर्यंत स्टेशन गाठलं.

आम्हांला पुण्यास झाँसी-गोरखपूर प्रवासासाठी साबरमती एक्सप्रेसच्या वेटिंग लिस्टवर आठ रिझर्व्हेशन्स मिळाली होती. ती फक्त कन्फर्म करणं एवढंच बाकी होतं. पुढं आलेल्या किशोरनं मात्र वेगळीच माहिती आणली. कन्फर्मेशनच्या चौकशीसाठी तो गेल्यानंतर आज येणारी साबरमती एक्सप्रेस गोरखपूरकडे जाणारच नव्हती. ती फैजाबाद- अयोध्येकडे जाणार होती. त्यामुळं आम्ही सर्वच संभ्रमात पडलो. कारण या माहितीला झाँसी स्टेशनवरील इतर अधिकाऱ्यांनीही दुजोरा दिला. जर गाडी गोरखपूरला जातच नाही, तर मग या गाडीचं गोरखपूरपर्यंतचं आरक्षण कसं दिलं? नि तेही कॉम्प्यूटराईजड् सिस्टिममधून? मनात शंका तशीच राहिली.

आता गोरखपूरसाठी कुठं उतरायचं, कुठून दुसरी गाडी पकडायची वगैरे चौकशी सुरू केली. तेवढ्यात साबरमती एक्सप्रेस स्टेशनमध्ये दाखल झाली. आम्ही आधीच गोंधळलेलो, त्यात आता धावपळीची भर. बरं, वेटिंग लिस्ट रिझर्व्हेशनचं

कन्फर्मेशन कुठल्या सूचना-फलकावरही लावलं नव्हतं, की कोणी टी. सी. सांगत नव्हता वेटिंग लिस्टचं कन्फर्मेशन एस्-२या बोगीतच येतं, असं कळल्यावर आधी एस्-२ मध्ये बसायचं व नंतर काय ते बघायचं, असे आम्ही ठरवलं व एस्-२ बोगी गाठली. दोन दिवसांनी रामनवमी असल्यामुळं गाडीला खच्चून गर्दी, रिझर्व्हेशन नसलेलीच जास्त, प्रकाश वैद्य व त्यांच्या मुली आम्हांला निरोप देण्यास आल्या होत्या. ते तिथंच रेल्वे आस्थापना विभागात काम करीत असल्यामुळं ते आमच्या रिझर्व्हेशनबाबत माहिती घेण्यास धावपळ करीत होते. त्यांच्या ओळखीमुळं आमची रिझर्व्हेशन्स एस्-२ मध्येच कन्फर्म झाल्याचं दोन दिवस आधीच समजल्याचं कळलं. म्हणजे स्टेशन स्टाफ, टी. सी. या सर्वांनी गाडी सुटेपर्यंत आम्हांला अंधारातच ठेवलं होतं. प्रवाशांकडून पैसे काढण्यासाठी ही सर्व यंत्रणा सरकारी खर्चानं राजरोस राबते आहे, हे विदारक सत्य आम्ही अनुभवलं.

आपआपल्या बर्थवर सामान लावताना कळलं, की ही गाडी गोरखपूरलाच जाणार आहे. फैजाबादचे डबे बाजूला काढणार होते. अजून एक आश्चर्याचा धक्का. म्हणजे आम्हांला आमच्या रिझर्व्हेशनप्रमाणे गाडी, वेळ, ठिकाण सर्व बरोबरच होतं, फक्त आपल्याकडे दिलेल्या कामाची पूर्ण माहिती न घेता व आपल्याकडच्या अपुऱ्या माहितीनं अज्ञानानं दुसऱ्याला चुकीचा मार्ग दाखवणं याचा सरकारी नमुना चांगलाच अनुभवावयास मिळाला नि यामुळं आमच्यासारखे सुशिक्षितही पार गोंधळून गेले होते. आता एवढं महाभारत झाल्यावर तुम्हांला सुशिक्षित कोण म्हणणार, हो!

या सर्व गडबडीत किशोरनं खास मित्राकडून आणलेल्या एका मोठ्या वॉटरबॅगमधील ग्लास झाँसीतच वेटिंगरूममध्येच राहिला होता. वेटिंगरूममध्ये हातपाय धुण्यासाठी आम्ही तो बाथरूममध्ये घेतला होता.

रात्री साडे अकरा-बाराला टी.सी.नं जाग केलं. त्याला आठ जणांचं एकत्र रिझर्व्हेशन असल्याचं सांगितलं व सवनीसकडे बोट दाखवलं. आता मधेच झोप उडाल्यानं परत डोळा लागेना. टी. सी. ची गंमत पाहू लागलो. त्याची नजर रामभक्तांवर पडली. प्रवासी अगदी गयावया करून सांगत होते, माफी मागत होते.

कलसे तिकीट निकाले हैं, साब, लेकिन गाडी नहीं मिली...

राम के दर्शनके लिए जा रहा हूँ। कलसे परेशान हूँ, साब।

इस बार छोड दो, साब। फिर ऐसी गलती नहीं होगी।

प्रत्येकाची कारणं वेगळी. टी. सी. ला चुका करणारीच माणसं हवी होती. जंगलात गवत खाता-खाता हरणाचा एखादा बछडा मागं राहावा व त्याच्यावर श्वापदानं झेप घ्यावी, तसा तो टी. सी. एकेकाला पकडत होता. पन्नास-पंचाहत्तर, शंभर रुपये काढत होता. ना दया, ना माया, ना स्वतःच्या कामाबद्दल आस्था. आपलं खातं प्रवाशांना तिकीट देऊनही जागा देऊ शकत नाही वा सुलभ प्रवास घडवू शकत नाही, याचा ना खेद, ना खंत. व्यवस्थित मार्ग दाखवायचा सोडून, ह्या गरीब प्रवाशांकडून

त्यांची असेल नसेल ती पुंजी स्वतःच्या गंगाजळीत टाकण्याची ना लाज, ना लज्जा.

परमेश्वरानं माणसाला घडवताना नेमकं कोणतं रसायन वापरलं असेल, कुणास ठाऊक ? पण अशी दुसऱ्याच्या मानेवर सुरी ठेवून स्वतःची घरं भरणारी, दुसऱ्याच्या पैशानं सूट, सफारी सारख्या कपड्यांत शहाजोगपणे मिरवणारी हरामखोर जात मात्र आपल्या भारतात सर्वत्र आढळतेच. मग त्यांच्या तावडीतून श्रीरामाच्या दर्शनास जाणारे भाविकही सुटत नाहीत.

पहाटे साडेपाचला जाग आली, तर गाडी लखनौ स्टेशनवर थांबलेली. अयोध्येला जाणारे प्रवासी इथंच उतरल्यामुळं गाडी बरीच रिकामी झाली होती. पहाटेचा गार वारा सुरू झाला होता. झोप अजून डोळ्यांवरच होती. सर्व सामान व्यवस्थित आहे, की नाही, यासाठी सामानावर एक नजर टाकली व पुन्हा झोपेच्या अधीन झालो.

जाग आली, त्या वेळेस गाडी बाराबंकी इथं थांबली होती. गोरखपूरकडे जाणारे डबे ठेवून बाकीच्या बोगी काढण्याच्या कामास जवळजवळ एक तास घेतला. तोपर्यंत आम्ही आमचं नाष्टापाणी उरकून घेतलं. प्रवासात असल्यामुळं आंघोळीचा प्रश्नच नव्हता. आता आमची एक्सप्रेस गाडी फक्त सात डब्यांची झाली होती. सगळे ऐसपैस बसले होते. रमीची पानं पिसू लागली होती. डॉक्टरांनी सकाळी सकाळीच डायरी लिहिण्यास सुरुवात केली होती. उत्तर प्रदेशचा सपाट भाग झपाझप मागे पडत चालला होता. घरून करून आणलेल्या शिदोऱ्या संपुष्टात आल्या होत्या व वरवरच्या नाष्ट्यानं पोटही भरल्यासारखं वाटेना. तेव्हा गोरखपूर आलं, की पहिल्यांदा जेवण घेण्याचं ठरवलं. साडे अकराच्या सुमाराला गाडी गोरखपूर स्टेशनला थांबली. स्टेशनबाहेर पडलो नि तेथील बकालपणा जास्तच अंगावर आला. गोरखपूर म्हणजे भारतीय हद्दीतलं उत्तरप्रदेशमधलं एक जिल्ह्याचं ठिकाण, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, विहार या राज्यांत प्रवेश केला, की सामान्य जनतेचं राहणीमान किती खालावलेलं आहे, हे जाणवू लागतं. बकाल वस्ती, गलिच्छपणा, गरिबीमुळं राहणीतील अजागळपणा, वाहतुकीतील बेशिस्त, घाम फुटेपर्यंत ओढणारे सायकल रिक्षावाले... प्रत्येक गोष्ट न् गोष्ट अंगावर काटा आणते.

स्टेशनबाहेर पडल्यानंतर समोरच असलेलं मारवाडी पवित्र भोजनालय गाठलं. अकरा रुपयांत भरपेट जेवण. सबनीस व दीपक दोघंही सुनौलीच्या बसच्या चौकशीसाठी गेले, तर त्यांनी एक एजंटच बरोबर आणला. तो म्हणत होता. इथून थेट काठमांडू रुपये अडीचशे. थेट काठमांडू बस असल्यामुळं सबनीसही हो म्हणाला असावा. मी याआधी दोनदा काठमांडूला गेलेलो असल्यामुळं भारतीय हद्द ते काठमांडू जास्तीत जास्त पन्नास-साठ रुपये बसचं तिकीट असल्याचं मी सबनीसला बाजूला घेऊन सांगितलं. त्यामुळं थेट बसचे विचार त्यानं डोक्यातून काढून टाकले. तेवढ्यात सुनौलीसाठी अजून एक खाजगी बस आली. आम्ही लगेच त्या बसमध्ये शिरलो.

आपल्या हातातलं गिऱ्हाईक जातं आहे, हे पाहून तो पहिला एजंट व सुनौली गाडीचा मालक यांच्यांत जोरात खडाजंगीला सुरुवात झाली. आम्ही आपले नुसते मजा बघत होतो.

शेवटी कशी तरी गाडी निघाली दुपारचा दीड वाजला होता. सुनौलीपर्यंत तिकीट होतं रुपये बावीस. छोटी लक्झरी होती. त्यामुळं वेग भरधाव होता संध्याकाळी पाचपर्यंत आम्ही सुनौलीत उतरलो. सुनौली भारतीय हद्दीत, तर त्यालाच जोडून नेपाळ हद्दीत भहिरवा हे गाव. भारत- नेपाळ सीमा पार करावयाची, म्हणजे भारतातले दोन व नेपाळमधले दोन अशा चार चेक पोस्ट्सवर सामान दाखवत–दाखवत जायचं.

सीमा ओलांडण्याचे सर्व सोपस्कार आटोपून संध्याकाळी साडेपाचला काठमांडू बसमध्ये बसलो. डोंगराळ प्रदेश सुरू झाला, तसा हवेत गारवा वाढू लागला. काठमांडूला जाण्याची माझी ही तिसरी वेळ. पहिल्यांदा आई, वडील कुटुंबासहित गेलो होतो, तर दुसऱ्या वेळेस मित्रांबरोबर एकटाच व त्याच वेळेचं मत्स्यपुच्छ व दार्जिलिंगचं कांचनगंगा– दर्शन आज माझ्या तिसऱ्या फेरीचं कारण बनलं होतं.

रात्री साडेनऊला नारायणगड इथं जेवण घेतलं व बस पुढं निघाली. दिवसभराचा शिणवटा, नुकतंच जेवण झालेलं नि त्यात गार वाऱ्याच्या झुळुका अंगावर येऊ लागल्यावर डोळा केव्हा लागला, हे कळलंच नाही.

मधेच जाग आली. पाहतो, तर बस रोडच्या कडेला थांबलेली. ड्रायव्हर चहासाठी उतरला असेल, असं समजून आळोखेपिळोखे देऊन सीटवरच बसलो. तो खालून डॉक्टर भालेराव बोलवत होते.

'एस्. आर्, या खाली. तासभर तरी निश्चिंती आहे.'

ड्रायव्हर दीड, दोन तास तरी विश्रांती घेणार, असं दिसत होतं. रात्रीचे दोन वाजले होते. मोरे, सबनीस सोडून सगळेच खाली उतरलो होतो. शेजारीच एका छोटेखानी घरवजा हॉटेलात चहाची ऑर्डर दिली. हॉटेलमधील ललना नुकतीच झोपेतून उठून बाहेर आली होती. तिनं मोठ्या चुल्हाणात लाकडं आत सारली व जाळ केला. तिला चहा करण्यास बराच वेळ लागणार नि आम्हांलाही वेळ काढायचाच होता. मग एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या सुरू झाल्या.

प्रवाशांच्या गर्दीमुळं पूर्ण नेपाळ देशामधील घर ना घर हॉटेलच बनलं आहे, असं म्हटलं, तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. आपल्याला हे पावलो-पावली अनुभवास येतं. वाहतुकीच्या सोयीसाठी सर्व घरं जवळजवळ रस्त्याच्या कडेलाच व पर्यटकांची वर्दळ सतत असल्यामुळं घरासमोर दोन टेबलं, बाकडं टाकलं व नित्योपयोगी अशा चार-दोन वस्तू विक्रीस ठेवल्या, की झालं हॉटेलं. नेपाळमध्ये शेतीचं उत्पन्न तसं बेताचंच. उद्योगधंदेही कमीच. त्यामुळं रोजगारही कमी नि मग हॉटेलिंगशिवाय पर्याय नाही. निदान रोजचा खर्च तरी बाहेर पडू शकतो.

एव्हाना गरमागरम चहाचा पेला हातात आला होता. किशोरनं त्या थोड्या

जागेतही त्या ललनेसहित सर्वांचा फोटो घेण्याचा प्रयत्न केला. नेपाळमध्ये हॉटेल्स चालविण्यात स्त्रियाच बहुतांशी दिसून येतात. स्त्री-आकर्षण विश्वामित्राला सुटलं नाही, तिथं सामान्य टूरिस्ट किस झाडकी पत्ती. स्त्री म्हणजे फक्त भोगवस्तू, असंच पुरुषांना वाटतं व या वृत्तीतून समाजास बाहेर काढण्याचा महिला संघटनांचे जागतिक पातळीवरही प्रयत्न चालूच आहेत. पण त्या लावत असलेल्या रोपट्यास स्त्रियाच स्वतःच्या प्रदर्शनानं वाढू देत नाहीत, हे एक अजून विदारक सत्य! नेपाळ सरकारचं कुठलंही बंधन नसल्यामुळं सर्रासं मिळणारी लिकर हे अजून एक आकर्षण. ह्या आकर्षणाला आमच्यांतला दीपक तेवढा आहारी जायचा, पण तेवढाच व तेही मर्यादित प्रमाणात!

त्या टपरीमधील ललनेकडे बघत किशोरला काय वाटलं, कुणास ठाऊक; त्यानं परत चहाची ऑर्डर दिली. परत वेळकाढू गप्पा सुरू झाल्या. किशोर, डॉक्टर भालेराव यांच्याकडे त्यांच्या पूर्वीच्या ट्रेक्सचे अनुभव खूपच होते. आम्ही अनुभवही मन लावून ऐकत होतो. कारण हेच अनुभव ट्रेक काळातही उपयोगी पडणार होते. थोड्या वेळानं कमी साखरेचा चहा परत आला. जवळ जवळ दोन तास आम्ही तिथं काढले होते. मग परत गाडीत येऊन बसलो. एव्हाना ड्रायव्हरचीही विश्रांती झाली होती. तो फ्रेश होऊन ड्रायव्हिंगला बसला. आता आम्हांला झोप लागणं शक्यच नव्हतं. पहाटेचे चार वाजले होते. थोड्याच वेळात फटफटू लागलं होतं.

गाडी पहाटे पहाटे सहाला काठमांडूत शिरली.

काठमांडूत आता नवं भव्य स्टँड बांधलेला दिसत होता. गेल्या वेळेस आलो होतो, त्या वेळेस जुन्या स्टँडवरच, रत्नापार्क भागातच आम्ही उतरलो होतो. स्टँडवर उतरल्यावरोबर हॉटेल्सच्या एजंट्सनी भोवती एकच गिल्ला केला. प्रत्येकजण आपल्या हॉटेल्सच्या वैशिष्ट्यांसहित आम्हांला चिकटला होता. मामा शिंदेचा अगरवाल नावाचा मित्र इथंच स्थायिक झाला होता. स्टँडवर उतरल्याबरोबर सबनीसनं शिंदेला त्याला बोलवण्यासाठी फोन करण्यास पिटाळलं होतं. शिंदे फोन करून आल्यानंतर अगरवाल येईपर्यंत आमचा चहाचा एक हप्ता झाला होता. अगरवाल आल्यानंतर त्याच्या ओळखीनं एक हॉटेल बुक केलं. ग्रँड हॉटेल. काठमांडूच्या राजमैदानासमोर असलेल्या रत्नापार्क भागातच हे हॉटेल होतं. दोन टॅक्सी करून सामान व आम्ही हॉटेलमध्ये एकदाचे विसावलो. साठ तासांचा सलग प्रवासाचा शीण सगळ्यांनाच आला होता. थोडी विश्रांती घ्यायचं मनात आलं, तेवढ्यात सबनीसचा आदेश निघाला.

'ए, लवकर आटपा, रे. ट्रेकिंग मटीरियल पाहायचं आहे.'

थोड्याशा नाराजीनंच आवराआवर सुरू केली. विश्रांतीची गरज होतं; पण ट्रेकिंग मटीरियल पाहणंही आवश्यकच होतं. त्यावर तर पुढचा ट्रेक-प्रोग्रॅम अवलंबून होता.

आज रामनवमी, रावणासारखा दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठी झालेला

साक्षात परमेश्वरी अवताराचा दिवस. नेपाळ हे जगातील एकमेव हिंदुराष्ट्र. त्यामुळं रामनवमीच्या उत्सवाचा उत्साह सगळीकडेच दिसत होता. फ्रेश होऊन आम्ही सगळेच सकाळी दहाच्या सुमारास बाहेर पडलो.

प्रत्येक शहराचा चेहरामोहरा साधारणतः एकच असतो. पण काठमांडू हे शहर मात्र वेगळाच चेहरा घेऊन बसलेलं वाटतं. रस्त्यावरची शिस्तशीर एकेरी वाहतूक, चौकाचौकांत असलेल्या मोठमोठ्या कमानी, रस्ते ओलांडण्यासाठी केलेले पूल, वाहतूक-नियंत्रणात दक्ष असलेले पोलीस, शहराच्या मध्यभागी राजे लोकांच्या कार्यक्रम- सभांसाठी राखून ठेवलेलं मैदान, पाहुण्यांच्या स्वागतासाठी चौकाचौकांतून झेंडे, पताका, लावण्यासाठी कायमस्वरूपी केलेली व्यवस्था, साध्या टपालपेट्या सुद्धा बाकदार नि आकर्षक. पादचारी चालणार, ते फूटपाथवरूनच व रस्ताही क्रॉस करणार, ते झेब्रा लाईनवरूनच नि पादचारी झेब्रा क्रॉसवरून जात असताना कुठलीही गाडी पुण्याच्या रिक्षेसारखी पुढं घुसण्याचा प्रयत्न करणार नाही. ती थांबेल व पादचाऱ्यानं रस्ता ओलांडल्यानंतर हलेल. त्यामुळं काठमांडूत फिरताना आपल्याला हा वेगळेपणा जाणवतोच.

आज बहुतांशी दुकानं बंदच दिसत होती. मी सबनीसला म्हटलं,

'मी येतो पशुपतिनाथला जाऊन. दुपारी सुपरमार्केटजवळ येतो.'

त्यांनीही लगेच परवानगी दिली. पण तेवढ्यात डॉक्टर म्हणाले,

'एस्. आर्., आपण उद्याच जाऊ ना. आज विश्रांती घेऊ.'

शेवटी उद्या सकाळी आठलाच दर्शनाला जायचं ठरवलं.

त्यानंतर सगळ्यांनाच सपाटून भुका लागल्या होत्या. एका मारवाडी खानावळीत यथेच्छ भोजन करून आम्ही लॉजवर परत आलो.

आज दिवसभर विश्रांतीशिवाय काही कामच केलं नाही.

कर्णकर्कश हॉर्न्समुळं पहाटे पाचलाच जाग आली. काल दिवस-रात्र विश्रांती मिळाल्यामुळं फ्रेश वाटत होतं. डॉक्टर माझ्या आधीच उठलेले दिसत होते. त्यांची डायरी-नोंद चालू होती.

'गुड मॉर्निंग, एस्. आर्., मग आज एकदम फ्रेश ना!'

'डॉक्टर, आपण पशुपतीला लवकर जाऊन येऊ या.'

हळूहळू एक एकजण आळस देत देत उठू लागले होते. मग सर्वांनीच आवरण्यास सुरुवात केली.

सकाळी आठ वाजता आम्ही पशुपतिनाथकडे जाणाऱ्या लोकल बसमध्ये होतो. आणखी दोन दिवसांनी आम्ही इथून विमानानं निघणार होतो, त्याच्या आत म्हणजे आज व उद्या आम्हांला बरीच कामं उरकायची होती. विमानतळावर रिपोर्टिंग, नेपाळ

टूरिझम डिपार्टमेंटकडून एव्हरेस्टसाठीची प्रवेश फी- माफी, ट्रेकिंग मटीरिअल वगैरे बरीच कामं आज करावयाची होती.

गाडी गौशाला इथं थांबली, तसे आम्ही उतरलो.

पशुपतिनाथ हे शंकरभक्तांचं खास आकर्षण. भारतातील बारा ज्योतिर्लिंग-यात्रेनंतर पशुपतीचं दर्शन घेतल्याशिवाय ती यात्रा पूर्ण होत नाही, असं म्हणतात. मंदिराच्या प्रवेशद्वारावर स्पष्ट सूचना होती. फक्त हिंदुधर्मीयांनाच प्रवेश. मंदिराचा कळस पॅगोडा पद्धतीचा, चारही बाजूंना चांदीच्या पत्र्याचे दरवाजे. समोर पितळी पत्र्यांनी आच्छादित भव्य नंदी. एका बाजूला नेपाळचे राजा, राणी महेंद्र यांच्या मूर्ती. मंदिराच्या चौथऱ्याभोवती पितळी दिव्यांची कड. शिवरात्र, कर्पूरपौर्णिमेच्या रात्री सर्व दिव्यांतून तेलवाती लावल्या जातात. मंदिराच्या परिसरातच भैरवनाथ, नवग्रह, गणेश यांची मंदिरं. भक्तजनांची दर्शनासाठीची गडबड, घोळक्यानं उडणाऱ्या कबुतरांची फडफड, तर एका कोपऱ्यात चाललेल्या भजनातला सप्तसुरांतला भक्तिरसानं भारलेला आर्तस्वर. त्यामुळं वातावरण एकदम पवित्र वाटत होतं. मंदिराच्या मागच्या बाजूला बागमती नदी व नदीच्या पलीकडील तीरावर महादेवाची छोटी छोटी मंदिरं. अगदी एका रांगेत. त्याही मागे पार्वतीमंदिरास जाण्यासाठी रस्ता.

पार्वती मंदिराकडे जाताना बागमती नदी ओलांडावी लागते. नदी ओलांडताना नुकतेच देहावसान झालेलं कलेवर तीरावर अंत्यविधीसाठी ठेवलेलं दिसत होतं व त्याच्या पलीकडे नुकतीच अग्नी दिलेली एक चिताही धडधडत होती. म्हणजे जे गंगेच्या बाबतीत आपल्या भारतात, तसंच इथंही, हवा, पाणी, प्रदूषण कितीही झालं, तरी आम्ही आमच्या अंधश्रद्धा सोडणार नाही. श्रद्धा एखाद्या तत्त्वावर असू शकते. एखाद्या उत्तुंग व्यक्तित्वावर असते, पण आपण श्रद्धेकडून अंधश्रद्धेकडे इतके झुकत गेलो की, अंधश्रद्धा हीच खरी श्रद्धा, असं समजू लागतो. आपल्या अनुभवांच्या कानशीवर घासून पारखून घेतली जाते, ती श्रद्धा व पूर्वापार चालत आहे व सद्यःस्थितीत ज्याचा सुतरामही फायदा स्वतःस वा समाजास उपयोगी पडत नाही, झाला तर तोटाच, अशा प्रकारचं आचरण म्हणजे अंधश्रद्धा!

एक परदेशी टोळी या सर्व प्रकाराचं टी. व्ही. चित्रण करीत होती. गुरांच्या पाठीवरील जखमांवर कावळे, गिधाडं टोच्या मारणारच.

पार्वतीमंदिरही असंच मोठं. मंदिराच्या भिंतीच्या चारही कोपऱ्यांतून चार प्रचंड पितळी नाग अभिषेकाच्या कलशाभोवती आलेले. समोर सूर्यनारायण, नेपाळचे राजे व राणी महेंद्र, भैरवनाथ यांच्या मूर्ती. मुख्य मंदिरात पार्वतीची मात्र मूर्ती नाही. देवी इथं गुप्तरूपात आहे, असं म्हणतात. त्यामुळं ह्या मंदिराला गुह्येश्वरी मंदिर असंही म्हणतात. मंदिराच्या आवारात एक छोटा लग्नाचा सोहळाही चालू होता. आपल्याकडे आळंदी, पंढरपूरच्या मंदिरामध्ये होतो, तसा. पशुपतिनाथ व गुह्येश्वरी या दोनही मंदिरांच्या परिसरात वानरं भरपूर. हातात पिशवी दिसली, की ती तुमच्यावर तुटून

पडलीच, म्हणून समजा. इथं रुद्राक्ष, त्यांच्या माळा याची दुकानं भरपूर. रुद्राक्षांची माळ परत घरी जातानाच घ्यावी, असं ठरवलं होतं. रुद्राक्ष जवळ ठेवणं याला धार्मिक जसं कारण आहे, तसं वैज्ञानिक पण आहे. रुद्र म्हणजे शंकराचा तिसरा डोळा- की जो उघडल्यानंतर अमंगल असं सर्व भस्म करतं, असा समज. हे धार्मिक कारण, तर रुद्राक्ष धारण केल्यामुळं रक्तदाब, हृदयविकार अशा काही रोगांवर नियंत्रण राहतं, असा आयुर्वेदिक फायदा! त्यामुळं रुद्राक्षाला मागणी भरपूर व इथं काठमांडू-नेपाळमध्ये रुद्राक्षाची झाडं भरपूर! त्यामुळं अस्सल रुद्राक्ष इथं सहज मिळतात.

एव्हाना दहा वाजले होते. झटपट दर्शनं करून आम्ही काठमांडूतील बाजारपेठेकडे निघालो. येथील बाजारपेठ म्हणजे पर्यटकांचं अजून एक खास आकर्षण. इथं इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची रेलचेल. दुसऱ्या देशांतून भारतात अशा वस्तू आणताना टॅक्स भरावा लागतो. तरीही भारतीय पर्यटक मात्र ह्या वस्तू खरीदण्याच्या मोहातून सुटत नाही. ह्या वस्तू इथं स्वस्त वाटल्या, तरी सीमेवरून पलीकडे नेताना किती महाग होतात, हे लक्षात येतं. मागे ज्या वेळेस दोनदा मी इथं आलो होतो, त्या वेळेस परतताना ह्या वस्तू खरीदणाऱ्या प्रवाशांची उडालेली हबेलंडी मी प्रत्यक्ष बघितली होती. काहीही खरेदी न करणाऱ्यांकडूनही पैसे वसूल करणारे पोलीस कर्मचारी खरेदी करणारास सोडणार आहेत, की काय? पण हे सर्व माहीत असूनही खरेदी करणारे खरेदी करत असतात व सीमेवरील जाळयात अलगद अडकत असतात.

मार्केटमधून जाताना निरनिराळया वस्तूंची चौकशी करत-करतच आम्ही फिरत होतो. किशोर तर भाज्यांचेही बाजारभाव विचारत होता. त्याची विचारण्याची स्टाईल व टिपिकल हिंदी उच्चार त्यामुळं करमणूक होत होती. पुण्यातून येताना सबनीसनं येथील राज हॉटेलचे मालक नितिन आहुजा यांच्याकडे देण्यासाठी एक ओळखपत्र आणलं होतं. आम्ही पत्ता विचारत- विचारत राज हॉटेलला जाऊन पोचलो. नितिन आहुजांनी स्वागत केलं. पण आम्ही दुसऱ्या हॉटेलला उतरल्यामुळं थोडे नाराजही झाले. पण त्यांनी ट्रेकिंगच्या सामानासाठी त्यांच्या ओळखीच्या दोघांतिघांकडे फोनही केले व शेवटी हिमालयन टूरिस्ट क्लब या दुकानाचा पत्ता दिला.

येथील मार्केटमध्ये कुठली वस्तू कोणत्या भावात विकली जाईल व त्यात आपल्याला खोट किती बसली, हे निश्चित कुणीच सांगू शकणार नाही. प्रत्येक वस्तूंचे भाव दुपटीनं तरी निश्चितच सांगितले जातात.

खरेदीबाबत मी मात्र कानाला खडा लावला होता. मुख्य म्हणजे, ह्या वेळेचा उद्देशच भव्य असा होता. जगाचे उच्चतम बिंदू पाहण्याचं स्वप्न उराशी बाळगून मी निघालो होतो. आवश्यक तेवढ्याच वस्तू जवळ ठेवाव्यात, उगाच फापटपसारा वाढवण्यात अर्थच नव्हता; व कधी नव्हे ते धरूनही या वेळेस अशा कुठल्या वस्तू आणण्याचा थोडाही आग्रह झाला नव्हता. कारण त्यांनीही या प्रवासातील धोक्यांची कल्पना आली होती. एखादं उच्चतम मिळविण्यासाठी झालेली मनाची धारणा कुठल्याही

परिस्थितीत किरकोळ खरेदीसाठी मी खाली आणणार नव्हतो. बायको व मुलांचं, खरेदीसाठी कुठलाही आग्रह न धरल्याबद्दल मनोमन खरोखरच कौतुक वाटलं.

बोलण्याबोलण्यातून कळलं, की येथील मार्केटमध्ये नव्वद टक्के व्यापारी भारतीयच आहेत व त्या व्यापाऱ्यांची खंत अशी आहे की, त्यांच्याकडे खरेदी करणारे व फसणारे नव्वद टक्के भारतीयच असतात. निरनिराळया आकर्षक वस्तू गिऱ्हाइकांना आकर्षून घेत असतात व कोळयाच्या जाळयात अडकणाऱ्या किड्याप्रमाणे अडकत असतात. किड्यांना निदान बुद्धी नसते, त्यामुळं त्यांचं अडकणं स्वाभाविक आहे. पण माणूस? त्याला तरी विचारशक्ती आहे ना! आपलं भलंबुरं त्याला कळतं ना! मग ह्या खरेदीच्या क्षणिक लाभाच्या भासात तो अडकतो कसा! तो शिक्षित आहे, शिक्षणानं त्याला प्रगल्भता आली आहे, तो विचारानं परिपक्व झाला आहे. या सर्व शिक्षणाचा उपयोग घरातील मानसिक अवस्था उंच नेण्यासाठी करण्याऐवजी क्षणिक भोग्यवस्तू जमवण्यासाठी, आर्थिक मान उंचावण्यासाठी करतो व त्यातच फिरत राहतो. मग विचार पडतो : बुद्धी नाही, म्हणून अडकणारा किडा लहान? की बुद्धी असूनही मोहजालात अडकणारा मानव लहान?

जाऊ देत, विचार करून काय मिळणार आहे, त्यापेक्षा इथं काय काय आहे, ते तरी पाहून घ्यावं. असं मनाला समजावून पुढं चालू लागलो.

निरनिराळया बॅग्ज्, कपडे, स्वेटर्स, चपल्स्, शूज्, गॉगल्स, स्टेशनरी, मोत्यांच्या माळा, घड्याळं, कॅमेरे, फ्रीज– एक ना दोन, वाट्टेल ती वस्तू इथं मिळू शकते. तीन मजली सुपरमार्केटमधील सरकत्या जिन्यासारखी लोकांची खरेदी आपोआप वर सरकत असते व खिसा मात्र रिकामा होत असतो!

आम्हांला सांगितलेलं दुकान बोथा थॅमेल या भागात होतं. बोथा थॅमेल म्हणजे मार्केटमधला एक भाग. इथं ट्रेकिंग, माऊंटेनीअरिंगच्या वस्तू विकत वा भाड्यानं मिळणारी बरीच दुकानं. ट्रेकिंग व माऊंटेनीअरिंगसाठी नेपाळ व हिमालय म्हणजे एक आव्हानच. नि ट्रेकिंगचं थ्रिल अनुभवण्यासाठी असंख्य पर्यटकही येत असतात.

आम्ही आहुजा यांच्या ओळखीनं एक दुकान गाठलं होतं. एच्. हॉरिझॉन हे त्याचं नाव. आवश्यक असलेल्या व आम्हांला न घेता आलेल्या किमती वस्तू भाड्यानं घेणं अपरिहार्यच होतं. थंडीसाठी फीदर कोट, हा कोट पावसात खराब होऊ नये, म्हणून रेनकोट, झोपण्यासाठी स्लीपिंग मॅट व स्लीपिंग बॅग्ज्. बर्फात वापरला येतील, असे शूज्, सॅक्स. प्रत्येकानं आपआपल्या फिटिंगप्रमाणे सर्व वस्तू घेतल्या. दोन-अडीच तास आम्हांला त्यासाठी घालवावे लागले. बिरनाळेसाठी एक सॅक घ्यायची होती. ती विकतच घेतली. तीच सॅक मी ट्रेकसाठी वापरणार होतो. डॉक्टरांनी रेनी सूट व शूज्, तर सबनीसनंही शूज् खरेदी केले.

खरेदीव्यतिरिक्त भाड्यानं घ्यावयाचं सर्व मटीरियल बुक करून एका बाजूला ठेवण्यात आलं. आम्ही काठमांडूहून परवा सकाळी निघणार होतो. त्यामुळं आज सामान

घेऊन एक दिवसाचं भाडं वाढलं असतं. सामान उद्या संध्याकाळी ताब्यात घेण्याचं ठरवलं. सामानाचं महत्त्वाचं काम पार पडल्यामुळं थोडी उसंत मिळताच पोटातील कावळ्यांनी कावकाव करायला सुरुवात केल्याचं लक्षात आलं. मग काय, कुणालाच खाण्याचा प्रस्ताव न अडवणं शक्यच नव्हतं. एका हॉटेलमध्ये यथेच्छ भोजन करून सर्वच लॉजकडे परतलो. संध्याकाळचे चार वाजत होते.

आता संध्याकाळी खाणं आणि फिरणं या शिवाय दुसरं काही कामच नव्हतं. घरून निघून चारच दिवस झाले होते. ट्रेकिंगसाठीचं मटीरिअल भाड्यानं घेणं एवढीच प्रगती या चार दिवसांत झालेली, त्यामुळं उद्दिष्टाकडं जाण्याचं समाधान पूर्ण मिळत नव्हतं. काही तरी अपूर्ण आहे, असंच वाटत होतं. काठमांडू पूर्वी दोनदा पाहिल्यामुळं मला नवीन असं काहीच वाटत नव्हतं. खाणं, पिणं हे सुद्धा जरा वेतासबातच करावं लागत होतं. कारण ट्रेकिंगसाठी तब्येत व्यवस्थितच हवी ना!

नगरला घरी आता चर्चा रंगत असतील! सुटीचे दिवस असल्यामुळं नुसता धुडगूस असणार! मी एकटाच नसल्याची जाणीव आई-वडील-बायको सर्वांना होत असणार! रिकाम्या मनात अहंकार घुमू लागला होता. माणूस एकटा असला की, असाच कल्पनेच्या विश्वात रमतो का? बहुतेक तसंच असावं, खोट्या, फसव्या कल्पना उराशी बाळगतच तो आयुष्य ओढत असतो.

सवनीसच्या खडसावणाऱ्या शब्दांनी मी खाडकन् भानावर आलो.

'साडेआठला मारवाडी भोजनालयात या,रे, जेवायला. नाही तर स्वतःच्या पैशानं खावं लागेल!'

सबनीसचा सज्जड दम प्रत्येकाला मिळाला होता.

मग प्रत्येकजण आपआपल्या मर्जीप्रमाणे बाहेर पडत होता.

मी व राम साडेसहाला लॉजच्या बाहेर पडलो. बाकीचे आधीच बाहेर पडले होते. रमत गमत समोरच्या रत्नापार्क मैदानाला वळसा घालत आम्ही निघालो. संध्याकाळच्या वेळेला परतीच्या ओढीचं वातावरण जाणवू लागलं होतं. विक्रेत्यांची आवराआवर, घरी परत जाण्यास गाड्या पकडण्यासाठी कामगारांची लगबग. आम्ही आपले निवांत फिरत–फिरत परत एकदा मार्केटच्या रस्त्याला लागलो. इथं बौद्ध धर्माचे उंच असे पॅगोडे आहेत. त्यांच्यावर दोन्ही बाजूंनी मोठमोठे उघडे डोळे चितारलेले. काठमांडूत खूप ठिकाणी हे डोळे चितारलेले दिसतात. जणू एखादी अनामिक शक्ती कायम तुमच्यावर लक्ष ठेवून आहे, असा सारखा भास व्हायचा. तुम्ही किती प्रामाणिकपणे जगताय्, त्यावर माझं लक्ष आहे, असं तर त्या शक्तीला सुचवायचं नसेल ना! काही असो, हे डोळे मात्र आपला सगळीकडे पाठलाग करावा, तसे असतातच.

आम्ही आठपर्यंत ठरलेल्या भोजनालयाजवळ आलो होतो. सर्वच इकडून तिकडून फिरून, काही खरेदी करून, साडे आठपर्यंत जमा झाले होते. मग सबनीसची जेवणाची ऑर्डर. जेवण पार पडलं. एव्हाना रात्रीचे दहा वाजत आले होते. दहानंतर

घरी फोन करावयाचा होता. किशोर व मी दोघेही शेजारच्याच आय्.एस्.डी. बूथवर गेलो. किशोरनं पुण्यास, तर मी नगरला फोन लावला.

मी काठमांडूपर्यंत व्यवस्थित आल्याचं बोललो. धाकटी बहीण रामनवमीच्या दिवशी प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झाल्याची शुभवार्ता भावानं कानांवर घातली.

चला, सुरुवात तर आनंददायी वार्तेनं झाली होती.

साडेदहापर्यंत लॉजवर आलो. डॉक्टर, राम, किशोर, दीपक यांनी घरी पत्र लिखाणासाठी सुरुवात केली होती व मग मीही पत्र घेतलं. कालच या जगात पदार्पण केलेल्या माझ्या अनामिक भाच्यास पत्र लिहू लागलो होतो.

'ए एस्. आर्, उद्या पत्रं वाचून दाखवायची नि मग पोस्ट करायची. अरे, कोण कसं लिखाण करतंय्, ते तरी समजेल.'

डॉक्टरांची सूचना सगळ्यांनीच मान्य केली. डॉक्टरांना तर लिखाणाची सवय होतीच; पण ते बाकीच्यांनाही प्रोत्साहित करीत होते.

रात्रीचे साडे अकरा वाजून गेले होते. सर्व परिसरात सामसूम झाली होती. डॉक्टरांनी नुकतंच त्यांचं लिखाण पूर्ण करून पलंगावर निद्रेची आराधना सुरू केली होती. माझंही पत्र-लेखन संपलं होतं. पलीकडच्या खोलीतून किशोरच्या घोरण्याला आमच्या खोलीतून मोरे तसाच तोडीस तोड जबाब देत होते. दोघांच्या जुगलबंदीच्या लयीत मी कधी डोळे मिटले, ते समजलंच नाही.

'गुड मॉर्निंग, एस्. आर्...' डॉ. भालेराव सकाळी सहाला मला उठवत होते.

तसा मी अर्धवट जागा झालोच होतो.

सगळेच हळूहळू उठताना दिसत होते. चहाची गरम गरम वाफ घ्राणेंद्रियापर्यंत पोहोचल्यामुळं उल्हसितपणा आला होता. शौचमुखमार्जन उरकून सगळे सामूहिक पत्रवाचनासाठी एकत्र आले होते.

डॉक्टरांनी प्रथम पत्रवाचन सुरू केलं. त्यांना लिखाणाची सवय असल्यामुळं ओघवतं वर्णन छानच वाटत होतं. मधेच एकदा त्यांचं 'मेधा' हे नाव आलं. तसे 'हॅ हॅ हॅ इथं डॉक्टर दिसतो, बरं का!' सबनीसनं लगेचा तीर मारला. दीपकचं इंग्रजी पत्रवाचन झालं. त्यानंतर मी माझं लेखन वाचण्यास सुरुवात केली. मी माझ्या भाच्यास पत्र लिहितोय्, की जो फक्त दोन दिवसांचा आहे, ही कल्पना सगळ्यांनाच आवडली. पत्रलिखाणही आवडलं. डॉक्टरांनी तर सूचना केली, की–

'एस्. आर्; तुझ्या पत्राच्या आठ झेरॉक्स काढ आणि सगळ्यांना दे. चांगलंच लिहिलंय् पत्र. तू तर छुपा रुस्तम निघालास!' वगैरे वगैरे.

मग एकदा परत चहाचा हप्ता झाला. मग सबनीस आजच्या कार्यक्रमाची आखणी सांगू लागला.

'हे पाहा, आता तासाभरानं आपण सर्व इथंच खाली नाष्टा घेऊ. मग दीपक,

एस्. आर्., राम आणि मोरे पत्र पोस्ट करतील. एअर लाईन्सच्या ऑफिसात जाऊन उद्याचं करेक्ट डिपार्चर टाईम, रिपोर्टिंग केव्हा करायचं, याची चौकशी करतील. आम्ही बाकीचे नेपाळ टूरिस्ट डेव्हलमेंट ऑफिसात जाऊन प्रवेश-फी रद्द करून घेतो. टूरिस्ट डिपार्टमेंटकडून काही अधिक माहिती मिळते का, ते बघतो. दुपारी एक वाजता सगळयांनी नेहमीच्या भोजनालयात यायचं.'

थोड्या वेळात तयार होऊन सर्व लॉजच्या रेस्टॉरंटमध्ये नाष्टा घेत होतो. नाष्टा-चहा झाल्यावर दोन ग्रूप वेगवेगळया दिशेला निघाले. पोस्टामध्ये आंतरदेशीय पोस्ट करणं हे जरा दिव्यच ठरलं. कारण आंतरदेशीय पत्रास किती पैशाचे स्टँप लावल्यावर ते भारतात जाऊ शकेल, हे खात्रीशीररीत्या कुणीच सांगू शकलं नाही. पंचवीस पैशांपासून पाच रुपयांपर्यंत वेगवेगळी रक्कम वेगवेगळया ठिकाणी सांगत होते. आम्ही आपले पुणेकरच.पंचवीस पैशाचं तिकीट लावून सर्व पत्रं पोस्ट करून टाकली. तिथून एअर लाईन्सच्या ऑफिसात. दीपकचं इंग्रजी सगळीकडे फिरून माहिती घेऊन आलं. आम्ही आपली निरीक्षण-क्षमता अजमावीत बसलो. दुपारी एकपर्यंत सबनीस, किशोरही त्यांची कामं संपवून आले. मग सगळे भोजनाकडे वळले.

आज बोथा थॅमेलमधून भाड्यानं घेतलेलं ट्रेकिंग मटीरिअल ताब्यात घ्यायचं होतं.

जेवणानंतर सबनीस, दीपक, किशोर, राम चौघे तिकडे गेले. आम्ही चौघे लॉजवर परतलो.

तासाभरातच ट्रेकिंग मटीरियल घेऊन ही मंडळी आली, तसं प्रत्येकाचं सामान प्रत्येकाच्या ताब्यात देण्यात आलं. फक्त स्लीपिंग बॅग मात्र एकत्रच ठेवण्यात आल्या.

आज शारजात भारत-पाकिस्तान फायनल मॅच होती. लॉजच्या एकमेव टी. व्ही समोर मी, राम व दीपक बसलो होतो. भारतीय चमू जिंकेल, अशी काही चिन्हं दिसत नव्हती. तेवढ्यात सहा वाजता तेथील वीज खंडित झाली. लॉजच्या मालकानं सांगितलं, की आता साडेआठ पर्यंततरी लाईट येणार नाहीत. कारण समोरच्या मैदानावर कम्युनिस्ट पक्षाची सभा आहे. त्यासाठी सरकार जास्तीत जास्त अडथळे निर्माण करत आहेत. मला आश्चर्य वाटलं, की इतका सरळ सरळ अडथळा कसा आणू शकते? का झालेल्या परिस्थितीचा लॉजमालकानं त्याच्या मनाप्रमाणे लावलेला हा अर्थ आहे?

काही असो, अंधाराचं साम्राज्य पसरू लागलं होतं. उद्या सकाळी सातला आम्ही काठमांडू विमानतळावर हजर होणार होतो. प्रत्येकाचं साहित्य ज्याचं त्याला देण्यात आलेलंच होतं.

प्रत्येकानं जास्तीचे आणलेले पैसे सबनीसकडे जमा केले. ड्रायफ्रूट्सची पॅकेट्स देण्यात आली. वीस दिवसांसाठी वीस पॅकेट्स. प्रत्येकजण आपआपल्या सॅक्स् भरू लागला होता. जास्त आणलेल्या व पुढं न लागणाऱ्या वस्तू इथंच हॉटेलच्या लॉकअपमध्ये

ठेवायच्या होत्या. आवश्यक त्या वस्तू, खाण्याचं सामान, डिंकलाडू, मूगलाडू हे सर्व घेऊन वजन खूपच झालं होतं. उद्या सकाळपासून हे ओझं आमच्या पाठीवर राहणार. तीन दिवस काठमांडूच्या झगमगाटात कसे गेले, ते कळलंही नाही. उद्यापासून जेवण पाहिजे तसं मिळणार नाही. तेव्हा आज काय हादडायचं, ते हादडा, या सबनीसच्या आज्ञेनं अंधारातच लॉजच्या बाहेर पडलो.

उद्या काठमांडू सुटल्यानंतर तातडीनं संपर्क साधण्यासाठी काही सुविधा असतील का? याबद्दल जरा शंकाच होती. आज सकाळी टाकलेलं पत्र–अनामिक भाच्याच्या नावानं घरी मिळाल्यानंतर त्याचं स्वागत कसं होईल, त्या कल्पनेतच मी पहुडलो होतो. आज रात्री जेवणास जाताना भाड्यानं घेतलेले शूज् घातले होते. म्हटलं, चालता येतं, का काही त्रास होतो, हे पाहावं. बूट जरी जड असले, तरी चालण्याचा त्रास मात्र जाणवला नाही.

विमानाच्या प्रवासाची उत्सुकता मला तर होतीच; शिवाय आणखी एकदोघे सोडले, तर इतर सगळयांनाच होती. उद्याची झेप कशी असेल, याचं चित्र मनोमन रंगवीतच मी निद्रादेवीच्या स्वाधीन झालो.

सकाळी पाचला जाग येणं हे काठमांडूला आल्यापासून नित्याचंच झालं होतं, कारण हॉटेलसमोरच बस-टर्मिनस होतं. सकाळी साडेचारपासूनच कर्णकर्कश हॉर्न्स्, गाड्यांची घरघर सुरू व्हायची. त्यामुळं अपरिहार्यपणे जाग यायचीच. वाहतूक-व्यवस्था पूर्ण खाजगी असल्यामुळं स्पर्धेमुळं सर्व वाहतुकीत विस्कळीतपणा आलेला. काही दिवसांनी पुण्यातही अशाच कर्णकर्कश आवाजांनी पुणेकरांना जागं व्हावं लागेल. कारण प्रत्येक क्षेत्राचं खाजगीकरण करण्याची टूमच आजकाल निघाली आहे. महाराष्ट्रात एस्. टी. महामंडळाचा कारभार तसा चांगला असतानाही खाजगी प्रवासी वाहतुकीस परवानगी देण्यास सुरुवात झालीच आहे. त्यामुळं स्पर्धा एकदा वाढली, की बजबजपुरी झालीच!

थोडंसं आगेमागे जवळजवळ सारेच जण उठले होते. स्वच्छ स्नान केलं. कारण इथून पुढं स्नान बहुतेक परत इथं आल्यावरच.

सवयीप्रमाणे मनोमन-गणपती अथर्वशीर्ष चालू झालं होतं. सर्व आवरलं होतं. चहा झाला, तशी सॅक पाठीवर घेतली व बाहेर पडलो. सॅक पाठीवर घेताना पहिला हात अडकायचा, पण दुसरा हात मात्र त्रास द्यायचा. रामच्या मदतीनं सॅक घेतली व बाहेर पडलो.

पहाटेच्या साडेसहाच्या झुंजूमुंजू प्रकाशात आम्ही नेपाळच्या विमानतळावर पोहोचलो. ' त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमान सेवा'. नेपाळसारख्या हिंदुराष्ट्राला साजेसं असं नाव. फ्लाईटची वेळ होती साडेआठ, पण त्याआधी सामानाचं वजन, त्याचं चेकिंग याच्यासाठी रिपोटिंग टाईम सातचा दिला होता. सामानाचं वजन, चेकिंग झाल्यानंतर

भरपूर वेळ होता. मग वेटिंग रूममधेच इकडेतिकडे भटकणं. पोर्टरची नजर चुकवून काट्यावर माझं वजन बघितलं. काटा बहात्तर किलोवर थांबला. बाप, रे! सामानाचं वजन सरासरी सोळा किलो पडत होतं, म्हणजे बहात्तर अधिक सोळा, अठ्याऐंशी किलो आजपासून ओढायचं आहे. इथं विमान मार्गात सुद्धा खाजगी सेवा आहेत. डोमेस्टिक एअर लाईन, एव्हरेस्ट एअर लाईन, नेपाळ एअर लाईन, रॉयल नेपाळ एअर लाईन, नेकॉन एअर लाईन अशा बऱ्याच खाजगी सेवा कार्यरत आहेत. काठमांडूहून पोखरा पाचशे रुपयांत भारतीय चलनात जाता येतं, तर ज्यांना हिमालयाची शिखरं पाहण्याचा आनंद लुटायचा आहे, त्यांच्यासाठी खास माऊंटन फ्लाईट्स पण आहेत. दीडहजार रुपये (भारतीय चलन) भरले, की अर्ध्या तासाच्या वेळात एव्हरेस्टसह आजूबाजूच्या हिमशिखरांची दर्शनं घडवितात.

वेटिंगरूममधील काचेतून बाहेर बघत होतो. विमानाची घरघर, कर्मचाऱ्यांची लगबग बघून सहजच मागच्या वेळेची आठवण झाली. १९९० सालातील ऑगस्टमध्ये आमचं सर्व कुटुंब म्हणजे आई, वडील, आजोबा, आम्ही पती-पत्नी, आमची दोन मुलं–राणी व पपू असे आलो होतो. आम्ही आलो होतो यात्राकंपनीबरोबर; पण हवाईमार्गाचाही अनुभव घ्यावा, म्हणून काठमांडूहून परतताना वीरगंज–म्हणजे भारतीय हद्दीपर्यंत विमानानं जायचं ठरलं. विचार असा होता, की वरून तरी हिमालयाचं ओझरतं दर्शन होईल. काठमांडूहून वीरगंज म्हणजे विमानानं फक्त अर्धा तास. त्यामुळं बाकीचे सहयात्री आदल्या दिवशी काठमांडूहून रात्रीसेवा बसनं निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही विमानतळावर. आमच्या बॅग्जचं वजन झालं, चेकिंग झालं. आमच्या बॅगग्ज् विमानात गेल्याचंही वेटिंगरूमच्या काचेमधून– म्हणजे आता जसा मी बघतो आहे, तसा. आम्ही बघितलं. आता आम्हांला सोडणार, तेवढ्यात मेसेज आला, की वीरगंज भागात हवामान खराब आहे. फ्लाईट सोडू नये. फ्लाईटची वेळ पुढं ढकलली वगैरे नाहीच. विमानच एकदम रद्द. विमानात बसावयास मिळणार नाही, म्हणून सगळे नाराज झालेच; पण पपूनं मात्र फारच अकांडतांडव केलं. आमचे सहयात्री तर पुढं गेलेले. आम्ही त्यांना त्या दिवशी साडेदहाला वीरगंज इथं गाठणार होतो. पण सगळेच फसले. त्यांच्यांत नि आमच्यांत तब्बल चोवीस तासांचा फरक पडला. नि आम्हांला स्वखर्चानं नगर गाठावं लागलं. असा हा पहिलावहिला अनुभव घेतल्यामुळं मी धाकधुकीतच होतो.

आठचाळीसला अनाऊन्समेंट झाली. 'लुक्लाकडे जाणाऱ्या प्रवाशांनी कृपया विमानात आपआपल्या जागेवर बसून घ्यावं.' त्या छोट्या बावीस सीटर विमानात आम्ही आठ व बाकीचे पाच असे तेरा प्रवासी होते. बेल्ट कमरेला बांधण्याची सूचना आली. एअर होस्टेसनं चॉकलेट्स व कानांत दडे बसू नयेत, म्हणून कापसाचे बोळे दिले. विमानाची घरघर सुरू झाली. पंख्यानं गती घेतली. माझी तर उत्सुकता शिगेला पोचली होती. विमान धावपट्टीवरून धावू लागलं व क्षणात हवेत पिसासारखं उचललं

गेलं. चतुःशृंगीच्या यात्रेतील पाळण्यात बसल्यानंतर वरून खाली येतानाचं फीलिंग सर्रकन अंगावर चढलं. सरळ समोर जाऊन विमानानं डावीकडे अलगद वळण घेतलं नि डोळयांचं पातंही लववण्याचं काम शरीर विसरून गेलं. डाव्या बाजूस जणू संपूर्ण चांदीरुप्याचे मखमली गालिचे घातलेले डोंगरच्या डोंगर.

एकही डोंगर बर्फाशिवाय नाही. भविष्याचा वेध घेणाऱ्या ऋषिमुनींच्या डोक्यावरील पांढऱ्या शुभ्र जटांप्रमाणे इतस्ततः पसलेली ती प्रचंड डोंगर-कपाऱ्यांची रांग, प्रचंड दऱ्या, खोरे, रस्ते फारच छोटे वाटत होते. रस्ते तर अगदी रेघोट्या मारल्यासारखे. एखादी मुंगी वारुळात शिरावी, तसे खालच्या बसेस् गाड्या किर्र्र झाडीत शिरताना दिसत होत्या. अलीकडे किर्र्र झाडांची रांग, तर पलीकडे पांढऱ्या शुभ्र बर्फाचं आवरण. एखाद्या वृद्धानं हिरवा करवती काठाचा मखमली कद नेसून सामोरं यावं, तसा हिमालयाचा परिसर मी अनिमिष नेत्रांनी बघत होतो. इंग्रजी चित्रपटातील भव्यदिव्यता पडद्यावर पाहूनच माणूस हरखून जातो. इथं तर ती भव्यता आम्ही प्रत्यक्ष अनुभवत होतो. पंचवीस-तीस मिनिटं एकदम निःशब्दपणे सर्वजण तो सृष्टीचा करिश्मा बघत होते. बोलण्यासारखं काही नव्हतंच. हळूहळू विमान बर्फाच्छादित शिखरांच्या बाजूला मार्गक्रमण करत होतं. दोन उत्तुंग डोंगरांमधून विमान एका प्रचंड खोऱ्याकडे झेपावलं. आता आमच्या दोन्ही बाजूंना वृक्षराजींनी झाकलेले डोंगर होते. हे सौंदर्य पाहत असतानाच विमानाला खालून धक्का बसला. कल्पना करता येणार नाही, अशा ओबडधोबड धावपट्टीवरून विमान धावत होतं. एक छोटं वळण घेऊन विमान थांबलं देखील. रिस्टवॉच बघितलं. नऊ चाळीस तब्बल चाळीस मिनिटं श्वास रोखून पाहिलेला अनुभव मनात साठवतच उतरलो.

लुक्ला-समुद्रसपाटीवरून ९२०० फूट उंचावरील गाव. त्यामुळं विमानतळावर उतरल्यापासून बोचऱ्या वाऱ्याचा, थंडीचा कडाका जाणवू लागला होता. पण इथं पाऊल ठेवल्यापासून पाहत होतो, ते सृष्टि-सौंदर्य. गावाच्या मागच्या बाजूला बर्फानं नहात असलेली शिखरं शिरपेचाप्रमाणे लखलखत होती. शिरपेचातील कलाबतूचे धागे खाली लोंबावेत, तसे कुठं बर्फाचे वाहते ओघ खालच्या दिशेला सरकलेले दिसत होते. सपाट भागात व्यवस्थित केलेली शेती. तीन- चार प्रचंड डोंगरांच्या कुशीत वसलेलं हे गाव. सकाळच्या सूर्यकिरणांनी न्हाऊन निघत होतं. समोर खोलवर गावाला कूस देऊन दूधकुशी वाहत होती. थंडगार, आल्हादायक वारा अंगावर घेत आम्ही विमानतळावरून बाहेर पडलो.

इथं आम्हांला प्रथम पोर्टर्स ठरवायचे होते. डॉक्टर तर त्यांच्या सामानासाठी सुद्धा पोर्टर घेणार होते.

'अरे एस्. आर्, या वेळेस ऐश करायची. सगळ मनमुराद बघायचं, म्हणून ओझं जवळ ठेवायचंच नाही.'

पण आम्ही मात्र त्यांना 'पोर्टर घेऊ नका. नुसती पायपीट करण्यात काय

मजा?' वगैरे वगैरे सांगून त्यांचं सामान त्यांनाच घ्यायला लावण्यास भाग पाडलं.

किशोर व सबनीस पोर्टरसाठी चौकशी करीत होते. सोनम नावाचा एक एजंट मिळाला. त्याला प्रथम चांगलं हॉटेल दाखव, म्हणून सांगितलं. 'इंटरनॅशनल लॉज' अशा मोठ्या नावाच्या छोट्या लॉजवर नेलं.

लाकडी जिन्यानं पहिल्या मजल्यावर गेलो. तिथं मध्ये लाकडी मोठं टेबल! तीन बाजूंनी बसण्यासाठी लाकडी बेंचेस् भिंतीलाच लागून, भिंतीही सगळ्या लाकडाच्याच! मध्यभागातून एक शेगडीच्या धुराचं नळकांडं वर गेलेलं! थंडीमुळं शेगडी सतत पेटवत ठेवलेली! दुसऱ्या मजल्यावर छोट्या छोट्या रूम तयार केलल्या, त्यांत दोन दोन बेड, त्यांचं पार्टिशनही लाकडीच! अशा प्रकारची लॉजेस् जरा वेगळीच वाटत होती.

नाश्त्याची ऑर्डर दिली गेली.

मग सबनीस, किशोर व सोनम यांची सविस्तर चर्चा सुरू झाली. सबनीसनं आखलेला मार्ग, त्यासाठी लागणारे दिवस वगैरे सांगितल्यानंतर मग त्यानं दीडशे रुपये प्रत्येकी याप्रमाणे दोन पोर्टर्स ठरवून दिले. त्या पोर्टर्सना नेपाळीशिवाय दुसरी भाषाच येत नव्हती, त्यामुळं सोनम सबनीसनं आखलेला मार्ग व कसं जायचं, कुठं थांबायचं, हे सर्व नेपाळी भाषेत त्यांना सांगू लागला. तोपर्यंत ऑर्डरप्रमाणे नाश्ता आला होता. घरून आणलेले पदार्थ काढण्यात आले. गुळाच्या पोळ्या फक्त मीच आणल्या होत्या. ज्या पोळ्यांची पुरचुंडी सोडण्यात आली. त्या पोळीचा पहिला घास खाल्ला नि जी चव जिभेवर आली, ती कदापिही विसरणं शक्य नाही. वैजूनं म्हणजे सौ.नं खरोखरच पोळ्या फार सुंदर केल्या होत्या. पोळ्या करून आठवडा झाला, तरी चव मात्र खुमासदार.

'वैजू, जरा तू पुरणपोळी करून दे, ग...' माझे आजोबा ती. दादा वैजूस– सांगत होते.

नुकताच आमच्या लग्नाचा साखरपुडा झाला होता व एका सणानिमित्त वैजूस घरी बोलावलं होतं. पुरणपोळीचा बेत होता. पुरणपोळी व गुळाच्या पोळीची आमच्या घरात सर्वांनाच आवड! त्यात दादांना खूपच!

सौ. आई पुरणपोळ्या करीत होती. व सर्व पंगत बसली होती. वैजूची सौ. आईस इतर कामांत मदत चालू होती. तेवढ्यात दादांची ही ऑर्डर आली.

झालं! इन्स्टंट परीक्षाच ती! पुरणपोळी करणं म्हणजे कसबच!

आई, मी, वैजू– सर्वच आम्ही एकमेकांकडे पाहू लागलो.

'कर, वैजू, एक पुरणपोळी करून दे दादांना...' आई म्हणाली.

वैजूनंही मग कंबर कसली व सर्वच पुरणपोळ्या करून टाकल्या. त्या परीक्षेत वैजू शंभर टक्के उतरली होती.

मनातल्या मनात तिच्या पाककलेला धन्यवाद देत दुसऱ्या पोळीला हात घातला.

एव्हाना पोर्टर्स त्यांचं सामान आणण्यासाठी गेले होते. ते आमच्यानंतर इथून

निघणार होते. आमचा नाश्ता संपला, तशा प्रत्येकानं सॅक्स् पाठीवर बांधण्यास सुरुवात केली. मी माझी सॅक पाठीवर घेतली व बाहेर पडलो.

एव्हरेस्टच्या दिशेनं माझं, माझ्या आयुष्यातल्या पहिल्या ट्रेकिंगचं पहिलं पाऊल पडलं. क्षणभर मी हरखलो. मला जो आनंद झाला, तो तान्हुल्यास पहिलं पाऊल टाकल्यानंतर होणाऱ्या आनंदासारखाच असावा. कसाही असेल, पण आज मात्र मला खूप समाधान वाटतं आहे, की आपण केलेल्या निश्चयाकडे आपलं पहिलं पाऊल पडलं आहे. पहिल्या अर्ध्या तासाच्या चालण्यावरून लक्षात आलं, की सबनीस, किशोर, राम व दीपक हे भराभर चालणारे, तर डॉक्टर, मी व मोरे कासवगतीचे. चढ-उतार असले, तरी एकंदरीत टप्पा चढाचा नव्हता. ९२०० फुटांवरून आम्ही ८७०० फुटांवर फॅकदीम या गावी जाणार होतो. म्हणजे उतारच. प्रत्येकजण जमेल त्या गतीनं निघाला होता. मी तर घाई करणारच नव्हतो आणि मनात आलं, तर घाई करणं शक्यही नव्हतं. मला निसर्गातील सर्व डोळे भरून पाहायचं होतं. मनात साठवायचं होतं. कारण उर्वरित आयुष्यात परत अशी संधी मिळेल, न मिळेल. काही सांगता येत नाही.

पावलं पुढं पडताना सृष्टिनिरीक्षण चालूच होतं. प्रत्येक अँगल न् अँगल फोटो काढून चौकटीत टिपण्यासारखा. उजव्या बाजूला उंच डोंगरांची रांग, तर डावीकडे खोल दूधकुशी नदीचं पात्र. नदीच्या पलीकडेही डोंगरांच्या रांगा. डोंगरांना पूर्ण आच्छादणारी हिरवीकंच झाडी– नव्या नवरीनं हिरवीगार साडी नेसावी, तशी. वृक्षही आकाशाशी गप्पा मारणारे उंचच उंच, त्या वृक्षांच्या गर्दीतून वाट काढणारा अवखळ वारा, व तो अंगावरून गेला, की वाटणारा सुखद उल्हास. जणू काही प्रत्येकाची एकमेकाला साथ देण्याची स्पर्धाच चालू होती. स्वच्छ हवा कशी असू शकेल व मनाला कसा ताजेपणा देत असते, हे लक्षात येऊ लागलं होतं.

मध्ये एक प्रचंड शिळा लागली. तीवर लामा लिपीतील कोरीव प्रार्थना होती. शिळेच्या चहूबाजूंनी कापडाच्या उंच अशा पताका लाकडी सोटाला लावलेल्या होत्या. आपल्याकडे गुढी पाडव्याला गुढ्या उभारतात, तशा. फक्त यांचं कापड वरपासून खालपर्यंत असतं. त्या कापडावरही प्रार्थना लिहिल्या होत्या. पुढं जवळजवळ प्रत्येक घरापुढं अशा पताका आढळत होत्या. नुकतंच गुढीपाडव्यापासून नवीन वर्ष सुरू झाल्यामुळं त्या पताकांचं कापड नवीनच होतं. दगडी शिळांच्या डाव्या, उजव्या अशा दोन्ही बाजूंनी रस्ते असायचे.

इथं लोकांची घरं सर्व लाकडाचीच. इतर वस्तूंतही लाकडी वस्तूंवर जास्त भर. प्रत्येक घरात एक तरी सुतारकाम करणारा असतोच असतो. देवदार वगैरे वृक्षाचं उत्पन्न भरपूर असल्यामुळं लाकडाला तोटा नव्हता, किंबहुना संपूर्ण नेपाळमध्ये वीजवाहिनी– तारा, टेलिफोन तारांसाठी सुद्धा हेच लाकडांचे डांब वापरले जातात. इतर सामान आणायचं ठरवलं, तरी ते पाठीवरच वाहून आणणं. त्यामुळं उपलब्ध असलेल्या साहित्यातच घर बांधण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

ज्याच्याकडे थोडा जास्त पैसा आहे, तो जोकपे पाळून असतो. जोकपे म्हणजे आपल्याकडील बैलसारखा प्राणी. याच्या पाठीवरून सामानाची वाहतूक केली जाते. सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे सर्वांचे व्यवसाय मात्र टूरिस्टशी निगडित. गाईडस्, पोर्टर्स, जोकपेवरून वाहतूक, हॉटेलिंग अशा प्रकारचे सर्व व्यवसाय. आता हेच बघा ना, आम्ही जे पोर्टर्स केले होते, त्यांना प्रत्येकी दीडशे रुपये नेपाळी. त्यांतले शंभर रुपये जेवणातच जातात. कारण पन्नास-साठ किलो वजन सतत सहा-सात तास घेऊन चढाचा रस्ता चालायचा, म्हणजे खाणंही तसंच लागणार. म्हणंजे शिलकीला पडणार फक्त नेपाळी पन्नास रुपये. पण त्या पन्नास रुपयांसाठी कष्ट किती? येथील नेपाळी माणूस स्वभावानं तसा गरीबच! बुटकी मूर्ती, चपटं नाक व चेहऱ्यावर गाईसारखे करुण डोळे! कुणाला फसवावं, लुबाडावं, असं मनात नाहीच! तर ते भाव चेहऱ्यावर कसे येणार? जे मिळेल, त्यात समाधानी! ट्रेकिंग, पर्यटन धंद्यामुळं काहीशी जुजबी इंग्रजी, हिंदी भाषा अवगत केलेल्या, पण एकंदरीत त्यांच्या सर्व राहणीमानावरून कीव यावी, अशी परिस्थिती!

'नाम क्या है तुम्हारा?'

'रामबहादुर...'

'हिंदी आता है?' माझी मोडकी हिंदी.

'नहीं, थोडा थोडा समझता है...' असं म्हणून हिंदी बोलता येत नाही, अशी खूण केली.

वाट चालत असताना परतीच्या प्रवासातील काही ट्रेकर्स भेटत होते. जवळ आल्यावर 'हॅलो', 'बेस्ट लक', 'हाय...' आम्ही भारतीय आहोत, हे ओळखून काही 'नमस्ते'ही म्हणायचे व स्वागत करायचे. या साध्या शब्द-संवादांनी सर्व ट्रेकर्स एकमेकांचे बांधवच आहेत, अशी भावना आपोआपच मनात रुजू लागली. एव्हरेस्टकडे जाणाऱ्या गिर्यारोहकास या शब्दांनी मिळणारा दिलासाही आवश्यकच असतो. अधिक उत्साहानं तो पुढं पाऊल टाकत होता.

मला विशेष वाटलं, की या परदेशी लोकांनी भारतीय व नेपाळी यांचं नेमकं वैशिष्ट्य कसं उचललं?

'नमस्ते' हा संस्कृत शब्द एकमेकांना भेटल्यानंतर आदरानं नमस्कार करण्यासाठी प्रचलित झाला. आम्ही आताशा 'नमस्ते', 'रामराम' हे शब्द विसरूच लागलो आहोत. त्यांची जागा घेतली आहे 'हॅलो', 'हाय' वा गुड मॉर्निंग', 'गुड आफ्टरनून', 'गुड इव्हिनिंग' या शब्दांनी. आपण आपली संस्कृती सोडून दुसऱ्यांचं अनुकरण करण्यात तरबेज. अनुकरण करताना कळत–नकळत आपण एका चांगल्या संस्कृतीचा ऱ्हास करण्यातील अनेक कारणांतील एका कारणाचा भाग बनतो आहोत, हेही लक्षात येत नाही: फांदीच्या टोकाकडे बसून बुंध्याच्या बाजूला फांदी तोडत राहणं म्हणजे सर्वनाशच. असो. 'कालाय तस्मै नमः।'

आम्ही सुद्धा आता या स्वागताला प्रतिसाद देऊ लागलो होतो. नि पुढं पुढं तर आम्हीच प्रथम 'हॅलो', 'नमस्ते' वगैरे म्हणायला सुरुवात केली होती.

डोंगराळ भागामुळं तिकडची गावंही छोटीच. आतापर्यंतच्या दोन तासांच्या प्रवासात आम्हांला खार्लु व चाट ही दोन गावं लागली होती. गावं म्हणजे रस्त्याच्या इकडची तिकडची दोन-चार घरं, एवढंच. लुक्ला सोडून तब्बल दोन तास उलटले होते. म्हणजे मी चक्क दोन तास चालत होतो; पण भोवतालच्या वातावरणामुळं मला शीण मुळीच जाणवला नव्हता.

दुपारचे दोन वाजले होते. सर्वचजण माझ्यापुढं निघून गेले होते. मीही मग पाय उचलले. साधारणतः तीनच्या सुमारास आमचं आजचं मुक्कामाचं ठिकाण आलं— फॅकदीम.

'वेलकम टु फॅकदीम! नमस्ते'... लॉजच्या प्रवेशद्वारातून किशोर उत्साहात स्वागत करण्यास बाहेर आला.

पुढं छोटंसं अंगण. त्यामागे घरवजा लॉज. मधल्या छोट्या दारावर 'नमस्ते लॉज' अशी पाटी. आत शिरलं, की मधल्या मोकळया जागेभोवती राहण्यासाठी पाच-सहा खोल्या. डाव्या बाजूला स्वयंपाकघर.

मी माझी सॅक एका रूममधे टाकली व मधल्या मोकळया जागेवर दोरी बांधून, तीवर घामानं भिजलेले कपडे वाळत घालू लागलो.

नमस्ते लॉजच्या एकेका छोट्या खोलीमध्ये दोघादोघांनी राहण्याची व्यवस्था होती. मी व मोरे एका खोलीत होतो. दोरीवर कपडे टाकल्यानंतर मी खाटेवर आडवा झालो. चालत होतो, तोपर्यंत वाटलं नाही; पण विश्रांतीसाठी बसलो, तर पोटऱ्या बोलू लागल्या. म्हटलं एवढ्याच— अर्थात मला खूपच-चालीनं आपले पाय दुखू लागले आहेत, पुढं काय?

तेवढ्यात किशोरनं एक सांगितलं,

'एस्. आर्. असं खूप चालल्यानंतर पंचवीस-तीस जोर—बैठका मारायच्या. त्यामुळं पायांच्या नसा मोकळया होऊन ते दुखत नाहीत.'

त्याच्या सूचनेप्रमाणे जोर-बैठका काढावयाच्या, असं ठरवलं, तेवढ्यात किशोर म्हणाला,

'अरे, पण, एस्. आर्, डॉक्टर कुठं आहेत? तुम्ही बरोबरच होतात ना?'

मी म्हटलं,

'नाही, बुवा. लुक्लालाच डॉक्टर माझ्या खूप पुढं गेले होते.'

म्हणजे सर्वांत पुढं निघालेले डॉक्टर मात्र अजून पोहोचलेले नव्हते.

सगळेच चिंतेत होते.

डॉक्टर कोणाला कुठं दिसले? कुठं थांबले होते. पुढं निघाले, हे सगळयांना माहीत होतंच. पण त्यांना शेवटी कोणी पाहिलं, हे काही कुणी सांगू शकेना. मी मनात

म्हटलं, च्यायला, पहिल्याच दिवशी हे असं आक्रीत कसं झालं?

राम म्हणाला,

'मी त्यांना शिलालेखाची मोठी शिळा होती, तिथं पाहिलं.'

तर मामा शिंदे म्हणाला,

'याच्या मागच्या वस्तीपर्यंत आम्ही बरोबरच होतो: ते डायरीत गावाचं नाव लिहीत होते. पुढं मात्र दिसले नाहीत.'

सगळयांच्याच चेहऱ्यांवर काळजी पसरली.

रामनं तेवढ्यात एक शक्कल लढवली. किशोरकडून बायनॉक्यूलर घेतला व लॉजच्या समोरच्याच टेकडीवर जाऊन समोवार शोध घेऊ लागला.

'अरे, ते पाहा डॉक्टर!' राम मोठ्यानं ओरडला नि मग जोरजोरात हातवारे करून, शिट्टी वाजवून त्यांचं लक्ष वेधवू लागला.

त्याच्या प्रयत्नातला यश आलं, तसा तो खाली आला.

'डॉक्टर थेट गावचा पूल ओलांडून पुढं थांबले होते.' रामनं सगळयांना माहिती दिली.

डॉक्टरांचा तपास लागल्यावर सगळेच निश्चिंतपणे विश्रांतीसाठी सरसावले. मी किशोरच्या सूचनेप्रमाणे पंचवीस जोर-बैठका काढल्या. परिणाम जाणवला. खरोखरच पाय दुखतोय्, असं वाटलंच नाही.

तोपर्यंत डॉक्टर परतले होते. त्यांनी लॉजमध्ये पाऊल ठेवताच सर्वांनी त्यांचं जोरदार स्वागत केलं.

'काय, रे डॉक्टरा, चालण्याची फार खुमखमी आलीय् का? आँ? उद्या चालून दाखव. मग बघतो तुझ्याकडे!' सबनीस.

'अरे, मी म्हटलं, पलीकडच्या लॉजवर राहू, म्हणून मी वाट पाहत होतो.' डॉक्टरांचं स्पष्टीकरण.

'हॅ हॅ हॅ, अरे, वाट अलीकडे बघतात. पलीकडे नाही.'

सबनीसच्या हसण्यात सगळेच सामील झाले.

खरं म्हणजे, डॉक्टर उत्साहाच्या भरात चालत गेले होते. त्यांनी दिलेल्या पलीकडच्या लॉजचं कारण तसं तकलादूच होतं व जेव्हा आमच्यापैकी कोणी पाठीमागे दिसेना, तेव्हा ते पुलाच्या पलीकडे थांबले असावेत.

डॉक्टर व किशोर एका खोलीत होते. खोल्या म्हणजे लाकडी पार्टिशनमध्ये दोन बेड, एवढंच.

दीड, दोन तास विश्रांती घेऊन पाय मोकळे करण्यास बाहेर पडलो. लॉजच्या मागे नदी व तीपलीकडील डोंगरामागे एक बर्फाच्छादित शिखर डोकावत होतं. ढग जमा होऊ लागल्यामुळं त्या शिखराचा लपंडाव चालू होता. ढग बाजूला झाले, की

सूर्याची संध्याकाळची किरणं पडून ते शिखर झळाळून निघायचं. सृष्टिसौंदर्य तर आता नजर जाईल, तिथं होतंच. झाडी इतकी दाट होती, की डोंगराचा थोडाही भाग दिसत नव्हता– जणू थंडीची जाणीव होऊ नये, म्हणून हिरवी शालच अंगावर लपटलेली असावी. एका ठिकाणी चढावर तीन-चार नेपाळी मुलं खेळत होती. सर्व पाच वर्षांच्या आतलीच. खेळ म्हणजे डोंगर चढणं, उतरणं. ती दोन-अडीच वर्षांची मुलं इतकी झटपट वरती जायची व उतरताना अशा काही उड्या मारत यायची, की माझ्या हृदयाचा ठोका चुकत होता; पण त्यांची पावलं मात्र बरोबर पडायची. पाय घसरून पडणं वगैरे ही भीती नव्हतीच.

उंच डोंगर, कडे-कपाऱ्यांमुळं इथं अंधाराचं साम्राज्य मात्र लवकरच सुरू होतं. संध्याकाळचे सात म्हणजे ठार अंधारच.

थंडीचा जोर वाढला, तसे लॉजवर परतलो, तर रात्रीचं जेवण तयारच. वीज नसल्यामुळं अंधार पडण्याच्या आतच सर्व कामं उरकून घ्यावी लागतात. सातपर्यंत जेवणं झाली, पण त्यानंतर इतक्या लवकर झोपा येताहेत कुणाला? मेणबत्त्या लावून एके ठिकाणी ठिय्या पडला. थंडीचा कडाका सुरू झाल्यामुळं डोक्यापासून पायापर्यंत सर्व शरीर झाकावंच लागलं. दोन-दोन स्वेटर्स, हातमोजे, पायमोजे, माकडटोपी असा प्रत्येकाचाच जामानिमा झाला होता. गप्पागोष्टी, एकमेकांच्या फिरक्या घेणं सुरू झालं.

'हं, मग काय, एस्. आर्, च्यायला, मनातल्या मनात मला शिव्या देत असशील!' सबनीसची विचारणा.

'डॉक्टर, बेस कॅम्पला तुम्ही मात्र अलीकडे थांबायचं, बरं का! नाही तर आजच्याप्रमाणे तुम्ही एव्हरेस्टच्या पलीकडे थांबाल नि तुम्हांला पाहायला रामला एव्हरेस्टवर बॉयनाक्यूलर घेऊन जावं लागेल!' किशोर डॉक्टरची खिल्ली उडवत होता.

'एस्. आर्. मात्र नशीबवान, च्यायला, पहिल्याच ट्रेकसाठी एव्हरेस्ट! त्याच्या पायांचं तीर्थच घेतलं पाहिजे!' डॉक्टरांनी चेष्टेचा रोख माझ्याकडे सरकावला.

'नाही पण, डॉक्टर, तुम्ही पुढं कसे गेला?' मामा विचारत होता.

'अरे मामा, इथून थोडं पुढं गेलं, की झुलता पूल आहे. मी पुलावर थोडं पुढं गेल्यावर विचार आला, की पलीकडे एकच घर आहे. तुम्ही सर्व बहुतेक मागेच थांबणार, म्हणून परत माघारी फिरलो, तर मागून दोन-तीन जोकपे येत होते. आता पुढं जायचं नव्हतं व जोकपेमुळं मागं येणं संपलंच. तिथं थांबावं, तर जोकपे येणारच, त्यानं जर का मान हलवली, त्यापेक्षा तर्राट पुलाचं पुढचं टोक गाठलं. विचार करतच होतो, तर हा राम खाणाखुणा करताना दिसला.' डॉक्टरांचा सविस्तर खुलासा.

'च्यायला, सगळ्यांच्याच मागं एकएक जोकपा पाठलागावर ठेवतो, म्हणजे बेसकॅम्पपर्यंत काळजीच नाही.' सबनीसची योजना.

'उद्या नामचे बाजार.....' किशोर उद्याच्या प्रवासाबद्दल माहिती देत होता.

'सात तास प्रवास. सकाळी सातला बाहेर पडायचं, कुणाला काही शंका. त्रास

होतोय्? त्यानं लगेच उद्या माघारी लुक्ला. पैसे असतील, तर विमानानं काठमांडू गाठायचं. पैसे नसतील, तर पायी पायी पंधरा दिवसांत जाता येतं. आम्ही तोपर्यंत येतोच एव्हरेस्ट करून.' सबनीसचा सल्ला– त्याच्या स्टईलामधला.

मग सबनीसनं हिंदी गाण्यांना सुरुवात केली. प्रत्येक गाणं अर्थात कोरस होऊ लागलं.

बाहेर किर्रर अंधार. नदीच्या खळखळाटाचा आवाज मात्र घुमत होता व सबनीसच्या हेमंतकुमारच्या, तलत मेहमूदच्या आवाजातील गाणी. 'ए मेरे दिल, कहीं और चल,' सारखी जुन्या चालीची गाणी त्या वातावरणात खूपच गोड वाटत होती.

'रांडेच्या, काय, रे, ही थंडी?' मधेच दीपकचा कोल्हापुरी ठसका.

'गपगार निजूनशान पड की, रं? काय?' मोरेचं सातारी उत्तर.

हळूहळू सर्वांनाच थकल्यामुळं पेंग येऊ लागली होती. सर्व आपापल्या खोलीत गेले.

मोरेंचं घोरणं सुरू झालं होतं. मला स्लीपिंग बॅगमध्ये झोप येईल, की नाही, ही शंकाच होती. हातपाय हलवायला संधी नाहीच. मला तर अंगावर साधं पांघरूण सुद्धा नकोसं वाटतं, तिथं हा सर्व बाजूंनी बंद पिंजराच. एक मात्र खरं, थंडी जरीही जाणवत नव्हती. बाहेरच्या वातावरणाशी फक्त नाकाचाच संबंध.

आज हिमालयाच्या कुशीत झोपताना मन अत्यंत तृप्त व समाधानी होतं. मनातल्या निश्चित विचाराची फलश्रुती होण्याच्या दृष्टीनं इतक्या झटपट अशा घटना घडतील, यावर विश्वास बसत नव्हता. घरचा विरोध, शारीरिक अक्षमता वगैरेंवर निश्चयानं बाजी मारली होती. आयुष्यात मी हे प्रथमच अनुभवत होतो व स्वतःबद्दलची खात्री दृढ होऊ लागली होती. थंडीचा कडाका वाढू लागला होता. उजेडासाठी लावलेली मेणबत्ती मंदावू लागली होती. लवकरच निद्राधीन झालो.

पहाटे पाचला जाग आली, ती पक्ष्यांच्या नाजूक किलबिलाटानं. कालपर्यंत काठमांडूत कर्कश अशा गाड्यांच्या हॉर्नसनी जाग येत होती. त्या पार्श्वभूमीवर आजची उत्साही, मंगलदायक जाग म्हणजे ऱ्होंबा-सोंबा नृत्यानंतर एखाद्या नर्तकीच्या शास्त्रीय नृत्यातील संथ गतीचा पदन्यासच. स्लीपिंग बॅगमधून बाहेर पडलो. बाहेर स्वच्छ वातावरण. निरभ्र आकाश. लॉजच्या मागचं हिमशिखर जणू म्हणत होतं :

'येतोयस ना तू माझ्याकडे? मग चल, आवर झटपट!'

मुखमार्जन करण्यासाठीच थंडगार पाण्यात हात घालवत नव्हता. मग स्नान तर दूरच. प्रसन्न पहाटच ताजेपणाचं आवरण देत होती.

सर्वांनी आपआपल्या सॅक्स् आवरायला सुरुवात केली. चहा-बिस्किटं झाली. गरम पाण्याच्या बाटल्या भरून घेतल्या. जामानिमा पूर्ण झाला, तसं एकेकजण बाहेर पडू लागलो. दुसऱ्या टप्प्यासाठी नामचे बाजार–समुद्रसपाटी पासून ११३०० फूट उंच.



मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.
भू-प्रवास ८२४
२६६२४
७५।१।९८

फॅकदीम गाव ओलांडलं. गावाच्या बाजूची एक उतरण उतरलो नि सामोरा आला, तो एक झुलता पूल. काल डॉक्टरांनी सांगितलेला. नदीच्या ह्या तीराहून त्या तीरापर्यंत. मधे कुठलाही आधार नाही. पलीकडून दोन नेपाळी तरुण येत होते. ते ज्या वेगात चालत होते, त्याच वेगात त्यांनी तो पूल ओलांडला व माझ्याजवळून ते निघूनही गेले. म्हणजे पूल ओलांडणं सोपं आहे, हे पटलं नि ओलांडण्यासाठी पुलावर पाऊल टाकलं. माझ्यापुढं मोरे, डॉक्टर व सबनीस होते. बाकीचे पूल ओलांडून रस्ता चालूही लागले होते. मीही पुढं चालू लागलो.

पुलावर तीन-चार पावलं टाकली नि एकदम डगमगू लागलो. पुलाच्या बाजूला असलेल्या तारांचा आधार घ्यावा, म्हणून डावा हात तारेला धरला, तर पुलाची डावी बाजू थोडी खाली जाऊन उजवी बाजू वर आली. नाही म्हटलं, तरी धसका बसला होता. मग उजवा हात वर करून उजव्या बाजूच्या तारांचा आधार घ्यायला गेलो, तर उजवी बाजू खाली जाऊन पुलाची डावी बाजू वर आली. आता प्रत्यक्ष काय घडत होतं, तिकडे माझं लक्ष नव्हतं; पण असं घडत असावं, असं मनात मात्र वाटत होतं. पुलावरून जलद गतीनं जाणारी ती नेपाळी माणसं पाहिल्यावर सोपा वाटणारा तो पुलाचा रस्ता पाच- सहा पावलांतच कठीण वाटू लागला. आपण हा पूल पार करू शकू, याची खात्रीच वाटेना. डाव्या–उजव्या बाजूचा आधार घेत-घेत एक एक पाऊल टाकत होतो. पुलाचा जसजसा मध्यभाग येऊ लागला, तसतशा बाजूंच्या तारा खाली गेल्या होत्या, त्यांचा आधार घेण्यासाठी त्रेधातिरपीट उडाली होती व त्यामुळं पूल व नंतर पुलामुळं मी असे फारच डगमगू लागलो. निसर्गाचं विलोभनीय स्वरूप किती रौद्रही असू शकतं, ते अनुभवू लागलो होतो. घोंघावणारा वारा, पाण्याच्या खळखळाटाचा आवाज व त्या आवाजाचा घुमणारा प्रतिध्वनी, पुलाची उंची, पुलाला मधे कुठलाही आधार नाही, याची जाणीव; सर्व सर्वच भयानक होतं. एखाद्या हिचकॉकच्या चित्रपटातील भयानकता जाणवावी, तसा हा सर्व निसर्ग माझ्यावर आता तुटूनच पडणार, असं वाटू लागलं. अंगाला दरदरून घाम फुटला होता.

पाण्याच्या खळखळाटाचा आवाज मला मृत्यूच्या गळयातील घंट्यांसारखा ऐकू येत होता, तर समोरचा पूल हे मला माझं आयुष्य वाटत होतं. स्वतःच्या संसारातलं मोहाचं ओझं सॅकमध्ये भरून पाठीवर होतं. त्या पुलाला जसा मधे आधार नव्हता, तसाच मानवी जीवनालाही जन्मापासून मृत्यूपर्यंत आधार नसतोच. डाव्या–उजव्या बाजूच्या तारांचा–नातेवाइकांचा–तो आधार घेऊ पाहतो, तर तो तारांच्या–नातेबाइकांच्या-स्वभावामुळं डगमगू लागतो. या सगळयांचा आधार न घेता आयुष्य ओलांडायचंय्. थोडा जरी तोल गेला, पाऊल चुकलं, तर खाली मृत्यूचा जबडा आ वासून ग्रास घेण्यासाठी टपलेला आहेच.

या सगळया प्रतीकात्मक विचारातच मी पुलाचं दुसरं टोक गाठलं होतं. पूर्ण निःश्वास टाकला नि त्या पुलाकडे–आयुष्याकडे–मागे वळून अलिप्ततेनं पाहत राहिलो.

काही क्षणांतच निसर्गानं मानवी क्षुद्रतेचा, क्षणभंगुरतेचा केवढा जबरदस्त अनुभव दिला होता.

सवनीस पुढं जाऊन थांबला होता. त्यानं पुलावरची माझी तारांबळ पाहिली होती.

'असे पूल ओलांडताना बरोबर मधूनच चालायचं. कुठलाही आधार न घेता पायांत जास्त अंतर ठेवून चालायचं.' सवनीसनं तांत्रिक माहिती दिली.

वाटचाल पुढं चालू झाली होती. कधी नदीतून, तर कधी तीरावरून, कधी चढ, तर कधी उतार, हे आता नित्याचंच होतं.

काही अंतर चालून गेल्यावर एक छुमवा म्हणून गाव लागलं. सव्वानऊ झाले होते. कधी हा पुढं, तर कधी तो पुढं. कोणी विश्रांतीसाठी थांबला, की त्याच्या शेजारी दुसरा थांबलाच. घोटभर पाणी पिणं, ड्रायफ्रूटचे एक-दोन दाणे तोंडात टाकणं, की पुढं चालू लागणं.

मौंजे या गावात दहा वाजता आलो. तिथं सगळेच थांबले. चहापाणी घेऊन पुढं निघालो. थोड्याच वेळात जोरसल्ले येथील एव्हरेस्टच्या–सागरमाथ्याच्या–प्रवेशद्वाराशी आलो. इकडे एव्हरेस्टला सागरमाथा अशा समर्पक नावानं संबोधलं जातं. प्रवेशद्वारापाशीच एन्.एम्.ए.नं– नॅशनल माऊंटेनीअरिंग असोसिएशननं एक सूचना सर्व इच्छुक गिर्यारोहकांसाठी दिली होती.

'Do you have a valid climbing permit?

Illegal climbing is punishable by fine.'

नेपाळ सरकारची सागरमाथा नॅशनल पार्कची हद्द इथून सुरू होते. प्रवेश–फी रु. ६५०/- नेपाळी. पुण्याहूनच नेपाळ सरकारच्या पर्यटन खात्याकडे सवनीसनं पत्रव्यवहार केला होता. काठमांडूला आल्यानंतर किशोर व सवनीसनं त्या खात्याशी संपर्क साधून प्रवेश- फी माफ करून घेतलीच होती. त्यामुळं फक्त नाव –नोंदणी करून आम्ही प्रवेशद्वारात आत पाऊल टाकलं.

आम्ही सागरमाथ्याचा नव्हे, कल्पनेतल्या स्वर्गाच्याच दाराचा उंबरठा जणू ओलांडला आहे, असं वाटू लागलं. थेट समोर दिसत असलेलं नदीचं पात्र, पात्राच्या दोन्ही बाजूंनी कडे-कपारींच्या रांगा, त्यांवरील हिरवीगार वृक्षराई, लांबवर असलेली हिमशिखरं, निरभ्र आकाश, नितळ स्वच्छ पाणी हे सर्व एका दृष्टिक्षेपात दिसल्यानंतर त्याला स्वर्ग नाही म्हणायचं, तर काय म्हणायचं?

प्रवेशद्वारातून थोडं चालून गेल्यानंतर डाव्या हाताला एक चिरा बसवला आहे. त्यावर इंग्रजी मजकूर होता :

Memory of Samjit Rai, 1st April, 1993. May he rest in peace.

मन उदास झालं. क्षणभर तिथं थांबलो. कसा मृत्यू आला असेल या समजित रायला? कदाचित लॅंड-स्लायडिंगमध्ये तो सापडला असावा. कारणं वाट चालताना

बरंच लँडस्लायडिंग झालेलं दिसत होतं. नदीचं पात्र तसं खूपच खोल होतं. दरडीच्या दरडी उंचावरून थेट नदीच्या पात्रात येऊन कोसळलेल्या आढळतात. लँड -स्लायडिंग झालं, की पायवाटाही अपरिहार्यपणे बदलाव्याच लागतात.

परत एक झुलता पूल समोर आलाय्. हा पूल मात्र मी आता सहज व निर्भयपणे पार केला. पूल ओलांडण्याची कला जमली होती. मग बराच वेळ नदीच्या पात्रातूनच वाट. पात्रातील मोठमोठ्या दगडांतून वाट काढणं कठीण जात होतं. सध्या नदीला जास्त पाणी नाही, म्हणून ती वाट समजायची, एवढंच, कारण त्या कोरड्या पात्रातून तुम्ही कसेही जाऊ शकता. पुन्हा आलेला झुलता पूल पार करून पैलतीरावर आलो.

आता चढास सुरुवात झाली होती. म्हणजे आत्तापर्यंत चढ नव्हता, असं नाही; पण आत्तापर्यंत चढानंतर उतारही असायचा. इथून पुढं चढानंतर उतार नाहीच. चढानंतर चढ व त्यानंतरही चढच. फॅकदीममधून निघून साडेचार तास झाले होते. सूर्य तसा माथ्यावर येऊ लागला होता. चढाचं एक एक वळण जीवघेणं वाटत होतं. थंडी, वारा असूनही घामाच्या धारा सुरू झाल्या होत्या. स्वेटर्स, टोपी, हातमोजे काढून टाकावे लागले. मामा शिंदे, किशोर, राम बरेच पुढं गेले होते. मी, मोरे, डॉक्टर व दीपक मागे रेंगाळू लागलो होतो. आम्हांला पुढं ढकलण्यासाठी सवनीस आमच्या मागे होता. आमची संथ गती त्याला चीड आणीत होती.

'ए, चला, रे, पट्पट्. इथं काय मजा करायला आलात काय? आँ?'

आडवळणावर एखाद्या दगडाचा आधार घेऊन बसायला लागलो, की तो ओरडायचा,

'ए बसू नको, रे! असं पाचपाच मिनिटाला बसलात, तर नामचे कधी गाठायचं?'

पण आमची होणारी दमछाक त्याच्या घाईला जुमानत नव्हती.

शेवटी तोच वैतागून कधी तरी पुढं निघून गेला. आज जलदगतीचा व मोठमोठ्या गप्पा मारणारा दीपक मात्र का रेंगाळला, हे कळलं नाही.

एका वळणावर डॉक्टरांनी आम्हांला पटापटा बोलावून घेतलं. त्या वळणावरून समोर दिसत होता लांबवर असलेला एव्हरेस्ट– अर्थात सागरमाथा. ज्यासाठी हा ट्रेकिंगचा सर्व प्रपंच मांडला होता, त्याचं दर्शन स्वच्छ वातावरणामुळं ट्रेकिंगच्या दुसऱ्याच दिवशी असं अचानक झालं. एव्हरेस्टच्या शिखरामागून धुरासारखे ढगांचे पुंजके दिसत होते. एव्हरेस्ट पाहण्याच्या निमित्तानं पाच मिनिटं विश्रांती घेतली.

परत चढण चढावयास सुरुवात केली. आम्ही केलेले पोर्टर्स मागून येत होते. ते मौंजेलाच जेवणासाठी थांबले होते. त्यांचे चावल, बटाटे, तिखट- मीठ व एक-दोन भांडी–सगळं बरोबरच. तीन दगडं मांडून चूल करायची. भात, बटाटे शिजवायचे, की झालं. आम्हांला पाहून थांबले.

'क्या, रामबहादूर, और कितना है?' मी त्यांतील एकास विचारलं.

त्याच्याशी बोलण्यात चार-पाच मिनिटं विश्रांती मिळणार, एवढंच समाधान.

त्याला हिंदी बोलता येत नव्हतं, पण थोडं–फार खाणाखुणांवरून समजत होतं. तीन बोटं वर करून 'तीन घंटा' असं तो म्हणाला व त्याचबरोबर वाट जशी चढत जात होती, तसे त्यानं हातवारे करून दाखवले. त्याचा हात खालच्या दिशेला आलाच नाही. म्हणजे उतार नाहीच व अजून त्यांच्या सांगण्याप्रमाणे तीन तास असे जीवघेणे चढ चढायचे होते. तीन तास सुद्धा त्यांच्या चालीनं. आम्हांला निश्चितच जास्त वेळ लागणार होता.

मोरे सांगत होते,

'एस्. आर्., हे बघ, चढ चढताना वळणावर विश्रांती कशी घ्यायची, माहितीये?'

माझ्या नकारार्थी मानेकडे पाहून ते म्हणाले,

'बसायचं नाही, उभ्या उभ्याच दीर्घपणे श्वासोच्छ्वास करून विश्रांती घ्यायची. एकदम सरळ चढ चढला, की दमछाक होते, माहितीये? डावी, उजवी वळणं घेतच पुढं चढत राहायचं. त्यामुळं चढ तर चढला जातोच, पण दमणूकही होत नाही.'

'आणि बरं का, साहेब, उतरताना तर जास्त सांभाळून उतरावं लागतं.' दीपक उतरण्याबद्दल सांगू लागला. 'एस् आर्, अशीच डावी-उजवी वळणं घेत, पाय व्यवस्थित आधारांवर ठेवूनच उतरायचं. नाही तर घसरतंय् माणूस--- व आधार नाही मिळाला ना, की रांडीचा कोसळलाच बघ खाली!' दीपकनं कोल्हापुरात राहून कोल्हापुरी भाषा चांगलीच आत्मसात केली होती.

'अरे, त्याला काय सांगताय्? त्याला माहितीये सगळं... एस्सार असा उगाच पहिल्याच ट्रेकला एव्हरेस्ट निवडतो, म्हणजे, अरे! त्यातच आलं सगळं, आपल्या फिरक्या घेतोय्, चला.' डॉक्टरांनी मत नोंदवलं व पुढं पाऊल टाकलं.

त्या चढावरून मी, मोरे, दीपक व डॉक्टर चौघे ही कासवगतीनं चालत होतो. एखादा चढ गेल्यानंतर, पुढं निदान उतार नसला, तरी सपाटी तरी असेल, असं नुसतंच वाटायचं. कारण तो चढ जिवाच्या करारानं चढून पार करावा, तर त्याला लागून दुसरा चढ वाट पाहत उभा असे. दुपारचं रणरणतं ऊन, पाठीवरचं पंधरा किलोंचं वजन, अवघड वाट, घसा कोरडा पडू लागला होता. मधे एक छोटं हॉटेल लागलं. हॉटेलचं नाव एव्हरेस्ट व्ह्यू हॉटेल. पैसे असणारे सवनीस व किशोर दोघेही पुढं गेलेले. मग सर्वांच्या शिखातील पैसे मिळून दोन कप चहा आला. चौघेही त्याचा आस्वाद घेऊ लागलो.

एक-दोन परदेशी पर्यटक त्या छोट्या हॉटेलच्या खिडकीतून बायनॉक्यूलरनं काही तरी पाहत होते. सहज कुतूहल म्हणून मी खिडकीतून बघितलं, तर तेथून एव्हरेस्ट स्पष्टपणे दिसत होता. एव्हरेस्ट व्ह्यू हॉटेल हे नाव त्या हॉटेलला अगदी योग्य वाटत होतं. मग त्या पर्यटकांना विनंती करून त्यांच्याकडून बायनॉक्यूलर घेतला व

आळीपाळीनं सर्वांनीच एव्हरेस्ट दर्शन घेतलं.

बायनॉक्यूलर चांगलाच शक्तिमान होता. एव्हरेस्टच्या पायथ्याशी उभा राहून त्याचे गहिरे रंग न्याहाळावेत, इतका तो जवळून दिसत होता. दुर्बिणीतून एव्हरेस्ट जवळ दिसला, तरी तो पडद्यावरील चित्रासारखी त्याची भव्यता कळली होती, पण त्याच्या सान्निध्याचा अनुभव त्यात नव्हता. भिंतीवरील फळांच्या चित्रानं भूक थोडीच भागते? तसंच एव्हरेस्टचं दुर्बिणीतून दर्शन! पण अर्थात प्रत्येक वळणावर एव्हरेस्ट वेगळाच वाटत होता. एवढं मात्र खरं!

चहापान व एव्हरेस्ट दर्शन यांमुळं बरीच विश्रांती मिळाली होती. पुढं वाटचाल सुरू झाली. आता दीपक व मी आणि डॉक्टर व मोरे अशा जोड्या झाल्या, म्हणजे मी व दीपक दोन वळणं पुढं, एवढंच. तसे सर्वच थकले होते. पण मुक्काम गाठणं आवश्यक होतं. अंतर काटलंच पाहिजे. दीपकनं व मी ठरवलं– शंभर पावलं चाललं, की थांबायचं, त्याआधी नाही.

पावलं टाकायला व मोजायला सुरुवात केली. एक-दोन....वीस .....तीस.....पन्नास.....सत्तर.....पंचाहत्तर.... पावलं उचलत नव्हती. शहात्तर सत्त्याहत्तर - अठ्याहत्तर - आता कोसळून पडू, असं वाटू लागलं. पण शंभर पावलं टाकायची होती. ए-को-ण-ऐं- शी... ऐंशी.... छे. पुढं शक्यच नव्हतं. मटकन खालीच बसलो. दीपकही बसला होता. एकमेकांकडे पाहून हसू लागलो. थकव्यामुळं ते हसूही स्पष्ट होत नव्हतं. थोडा वेळ विश्रांतीनंतर दुसऱ्या वेळेसही तोच प्रकार. एका दमात शंभर पावलं टाकली जात नव्हती. नंतर नंतर अंगात थकवा इतका आला, की एका वेळेस पन्नास पावलं सुद्धा जड जाऊ लागली. मोरे व डॉक्टर मात्र फारच मागे पडले होते. ते निश्चितच जास्त थकले असावेत. नंतर आम्ही पाच मिनिटांनंतर थांबायचं ठरवलं, तर तीन मिनिटांतच आम्ही कुठं तरी दगडावर टेकलेलो असायचो. वरून खाली येणाऱ्या प्रत्येक ट्रेकरला विचारू लागलो,

'हाऊ मच लॉंग इज नामचे?'

'हाऊ मच डिस्टन्स इज रिमेनिंग?'

प्रत्येक जण एक तास म्हणायचा. अंतराला महत्त्व नव्हतं. चढ व तुमची क्षमता म्हणजे नामचेस किती वेळ लागेल, हे प्रत्येक जण सांगे.

शेवटी एका सपाटीवर दोन-तीन घरं दिसू लागली. चला, आलं एकदाचं नामचे, म्हणून सुस्कारा टाकला. त्या घराजवळ आल्यावर एकानं वरच्या दिशेनं बोट करून अजून अर्धा तास आहे, असं सांगितलं. घड्याळात पाहिलं. अडीच वाजले होते.

'हं चला, एस्. आर्. आता फक्त अर्धा तास...' मनाला समजावीत उठलो.

पुढचा अर्धा–पाऊण तास मी कसा चाललो, याची मला काही जाणीवच झाली नाही. पाय आपोआपच चढत होते. माझं शरीर आता कष्टाची जाणीव होण्याच्याही पलीकडे गेलेलं होतं.

कुठं तरी ग्रामीण भागात वाक्प्रचार ऐकला होता. मारलेल्या कोंबड्याला भाजा किंवा शिजवा, काय फरक पडतो?

आता एक चढण चढलं, की पाच मिनिटांत नामचे येणार, तेवढ्यात आम्ही केलेला पोर्टर समोरून आला. खाणाखुणा करून दीपकला व मला आमच्या सॅक त्याच्याकडे देण्यास सांगत होता. त्याला खाली बोट दाखवून न दिसणाऱ्या डॉक्टर व मोरेंकडे पाठवलं. त्यांना जास्त जरूर होती. आम्हांला झालेला उशीर पाहून आमचं सॅकचं ओझं घेण्यासाठी सबनीसनं त्याला पिटाळलं असावं.

नामचेचं पहिलं घर लागलं. घरासमोरच्या ओट्यावर आम्ही दोघेही सॅक टेकवून बसलो. शहर मोठं दिसत होतं. लॉज नेमकं कुठं आहे, हे माहीत नसल्यामुळं पोर्टरची वाट पाहू लागलो. पंधरा-वीस मिनिटांत मोरे व डॉक्टरांच्या सॅक घेऊन पोर्टर आला. त्याला लॉजचं विचारलं, तर त्यानं अजून उंच हात करून रस्ता दाखवला.

बोंबला! म्हणजे अजून चार-पाचशे फूट चढण पार करावी लागणार होती. मनोमन सबनीसला व किशोरला शिव्या देत होतो.

'च्यायला, रांडीच्यांना एवढं समजू नये, होय? एवढ्या चढानंतर निदान लॉज तरी खाली घ्यावं ना!' दीपकची चिडचिड. 'नि, म्हणे, आम्ही इतकं ट्रेकिंग केलं नि तितकं हे केलं.'

चिडचिड करून काय उपयोग? उठा, चला! दुसरा इलाज नाहीये. परत पंधरा-वीस मिनिटं चढ आणि चढ. एक एक पायरी चढायची, म्हणजे जीवघेणं वाटत होतं. लॉज कधी जवळ येईल, असं वाटतच नव्हतं. शेवटची पायरी. आलं एकदाचं लॉज.

'वेलकम टु नामचे बजार!' किशोर जोरात स्वागत करीत होता.

त्याला म्हटलं,

'वेलकम काय? 'वेळ' कम म्हण!' पाठीची सॅक केव्हा काढली नि केव्हा कुठं आडवा झालो, हे कळलंच नाही.

प्रत्येकाची अवस्था साधारणतः थोड्या– फार फरकानं अशीच होती. पण सांगायचं कुणी कुणाला? उत्कृष्ट मिळविण्यासाठी कष्ट घ्यावे लागणारच, याची सर्वांनाच जाणीव होती.

एक, दीड तासानंतर थंड झुळकीनं जाग आली. साडेचार वाजले असावेत. गरमागरम चहाचा पेला समोर आला होता.

गरम चहाचा स्वाद घेत सभोवार पाहू लागलो.

लॉज म्हणजे एक मोठ्ठा हॉल. दोन रांगांत प्रत्येकी पाच–असे दहा बेड. तीन बाजू लाकडी भिंतींनी बंद केलेल्या, तर चवथी काचेच्या तावदानानं. तीनही भिंतींवर असंख्य बुद्धमुद्रा. रंगवलेल्या तावदानातून कोंगदेची शिखरं खुणावत होती.

थंडगार झुळूक व गरम चहाची चव अंगात चैतन्य देऊन गेल्या. तसा बाहेर अंगणात आलो. घोड्याच्या नालाच्या आकारासारखं वसलेलं नामचे बजार हे शहर

बरोबर तीन उंच डोंगरांच्या कुशीत. समोर खोल दरी नि त्यापलीकडे कोंगदेची हिमशिखरं. फॅकदीमला लॉजच्या मागून जे शिखर डोकावत होतं, त्याचंच विशाल रूप आता समोर होतं. मागच्या बाजूला 'कुमुद कुंगरी' ची तीन शिखरं डोकावत होती. त्यांच्यावर पश्चिमेकडून सूर्याची मावळतीची किरणं पडली होती व त्यामुळं सोन्याच्या झळाळीसारखी ती दिसत होती. आतमध्ये दोघातिघांनी पत्रं लिहावयास घेतली होती. मग मी ही एक आंतरदेशीय घेतलं नि बाहेर येऊन अंगणात आरामशीर घरी पत्र लिहावयास सुरुवात केली.

पहिलं पत्र काठमांडूहून अनामिक भाच्याला गेलं होतं. त्यात काठमांडूपर्यंतचा प्रवास होता, तर आजच्या पत्रात काठमांडू. लुक्ला ते नामचे बजार असा प्रवास आहे.

पत्र लिहावयास लागलो, तसे तेथील तीन-चार नेपाळी कुतूहल म्हणून जवळ येऊन बसले. नेपाळी भाषेची लिपी देवनागरी व शब्दांचे उच्चार मराठीला जास्त जवळचे. मग त्या लोकांशी गप्पा सुरू केल्या. इथं आईला 'अम्मा' म्हणतात. शाळेला 'स्याल' म्हणतात. फक्त उच्चाराची पद्धत वेगळी असल्यामुळं एकमेकांची भाषा एकमेकांना कळत नाही.

पत्र संपलं. थंडीची तीव्रता वाढू लागली, तसा आत गेलो. राम चव्हाणला आज थोडी कसकस वाटू लागली होती. त्यामुळं आल्यापासून तो झोपूनच होता. डॉक्टरांनी त्यास गोळया दिल्या होत्या. तो आज जेवणारही नव्हता.

सात-साडेसातला बोलावलं गेलं. इथं संध्याकाळी ६ ते १० पर्यंत असे चार तास वीज असते. पण विद्युत्–दाब फारच कमी. मेणबत्त्यांसारखा उजेड पडायचा. आज मी व सबनीसनं न्यूडल्स् मागवली होती. त्यामुळं ती खाण्याकडे आमच्यासहित इतरांचंही लक्ष होतं. आपल्याकडील शेवयासारखा लांबच्या लांब प्रकार. तो तोंडात ओढताना मजा वाटायची. तेथील म्हातारीनं न्युडल्स् मात्र फारच चवदार केली होती. गंमत म्हणून तिला वय विचारलं, पण तिच्या ते लक्षात नव्हतं. ८०-८५ ची असावी.

जेवण झाल्यानंतर पत्त्यांचा डाव पडला. एकीकडे गाणी व एकीकडे पत्ते, गप्पा सुरू झाल्या. बाहेर थंडीमुळं जाणं नकोच वाटत होतं. मग हे सर्व बैठे करमणुकीचे प्रकार. आजच्या प्रवासात एकेकाचे झालेले हाल व त्याचे किस्सेही अधूनमधून यायचे. कोण कसा ढेपाळला ? कोणाची कशी तंतरली ? याचे प्रत्येक जण अनुभव सांगत होता. माझा झुलत्या पुलाचा अनुभव व माझं त्यावरील प्रतीक–पूल म्हणजे आयुष्य! पुलाचे कठडे म्हणजे नातेवाइकांचे स्वभाव! खोलवरील पाण्याचा खळखळाट म्हणजे मृत्यूचा जबडा! पाठीवरील सॅक म्हणजे संसाराचं अहंकाराचं ओझं! जे मी आज पत्रात लिहिलं होतं, ते वाचून दाखवलं. ते सगळयांनाच आवडलं.

'शेवटच्या टप्प्यानं आमचा घाम काढला, माहितीये ? डॉक्टर व मी... कोण मागे राहतंय्, त्याच्यासाठी स्पर्धा चालू होती आमची..' मोरे सांगत होते.' शेवटी तो रामबहादूर आला, आमच्या सॅक्स् घेतल्या, म्हणून आम्ही इथपर्यंत पोचलो तरी,

माहितीये ?'

'हॅ हॅ हॅ च्या मारी. एव्हरेस्टला जाताय् नव्हं का ? आँ ?' सबनीसची प्रतिक्रिया वेगळीच असायची.

राम चव्हाण तर आजारीच पडला होता. डॉक्टर, मोरे, दीपक व मी खूप थकलो होतो. उद्याचा मुक्काम इथंच होता. बदलणाऱ्या हवामानाशी मिळतं जुळतं होण्यासाठी हा निर्णय होता.

रात्री दहा-साडे दहापर्यंत जवळ जवळ सर्वच झोपले.

मला आज का, कोण जाणे, पण झोप लागेना. साहजिकच घरचे विचार घोंघावू लागले होते. त्यात नुकतंच घरी पत्र लिहिलं होतं. पत्रातून काही सर्व भावना व्यक्त होतातच, असं नाही. काठमांडूपर्यंत घरी फोनवरून संपर्क साधता येत होता. पण आता मात्र मनात असूनही तब्बल पंधरा दिवस संपर्क साधता येणार नव्हता. तिकडे ते काळजीत, इकडे मी. ३१ मे ला धाकट्या भावाचं लग्न होतं. मी निदान लग्नानंतर ह्या ट्रेकला जावं, असं सर्वांनाच घरी वाटत होतं, पण तसं जमू शकलं नाही.

आपण उगीचच ह्या अशा वेळेस सर्वांना काळजीत टाकलं. –एक मन

काळजी कसली ? आपण धोका तर ~~त्र~~ पत्करणारच नाही ना... ? –दुसरं मन.

समजा, आपलं इकडं काही वरंवाईट झालं, तर ? –पहिलं मन.

काय होणार ? असे कित्येक गेले. जगाचं काय अडलं ? –दुसरं मन

आपलं अस्तित्व नसेल, तर घरात काय उलथापालथ होईल, याचं चित्र मी रंगवू लागलो. रिकामं मन सैतानाचं घर, तशी स्थिती. आपल्यावाचून घराचं अडेल, घराची वाताहत होईल, असा अहंगंड माणसाला उगीचच असतो, नाही! माझा शब्द, मी कुणी तरी वेगळा आहे. या नि अशा विचारांनी माणसाच्या माणूसपणाचा बुरखा फाटला जातो. नि आत उरतो फक्त हिडीस असा अहंकार. आता इतक्या लांब येऊन ह्या प्रसन्न वातावरणातही माझा अहंकार जागा झालेला दिसला, तसा मी स्वतःशीच चमकलो, माझी मलाच शरम वाटू लागली.

लॉजची एक बाजू पूर्ण काचेची होती. बाहेर पडलेलं टिपूर चांदणं त्या काचेतून दिसत होतं. झोप लागतच नव्हती.

सावकाश लॉजच्या बाहेर पडलो. अंगणात दोन तंबू उभारलेले दिसले. अंगणाच्या आडोशाला चार-पाच याक बांधलेले होते. नीरव शांततेत त्यांच्या गळ्यांतील बारीक घंट्यांचा आवाज किणकिणत होता. आकाशात विलसणारा चतुर्दशीचा चंद्र समोर अस्ताव्यस्त पसरलेल्या कोंगदेवर किरणांची बरसात करत होता. बाजूला दोनं उंच शिखरं व मध्ये खोलगट भाग असा कोंगदे कान टवकारलेल्या पांढऱ्या शुभ्र सशासारखा दिसत होता.

***चौदहवींका चाँद हो या आफताब हो,***
***जो भी हो, तुम, खुदाकी कसम, लाजवाब हो।***

प्रेयसीसाठी म्हटलेल्या या रफीच्या गाण्यात मला प्रेयसीच्या जागी कोंगदेची पर्वतराशी दिसत होती. कविमनाला चंद्र का भुरळ घालतो, ते इथं समजू लागलं होतं. आम्ही त्रिपुरी पौर्णिमा, कोजागरी पौर्णिमा साजऱ्या करतो. विजेच्या भगभगत्या प्रकाशात, पण टिपूर चांदणं म्हणजे काय? चंद्राची शीतलता म्हणजे काय? याचा अनुभव मात्र मला आज मिळत होता. शहरातून तर आजकाल कोजागरी पौर्णिमेशिवाय चंद्राकडे कोणी बघत असेल, असं वाटत नाही... इतके आम्ही कृत्रिम अशा झगझगत्या प्रकाशात वावरत असतो. एखाद्या वेळेस संध्याकाळच्या वेळेस वीज गेली नि योगायोगानं त्या वेळेस चतुर्दशी वा पौर्णिमा असेल, तर मग त्या चंद्रप्रकाशाचं महत्त्व समजतं. पण एरवी मात्र आम्ही घाण्याचे झापड लावलेले बैलच! सुटीत आजोळी शेतात गेल्यावर मात्र चंद्रप्रकाशात वा पहाटेच्या शुक्रताऱ्याच्या उगवण्याबरोबर केलेली नांगरट अजून आठवते.

आम्ही घेतलेलं लॉज सर्वांत उंचावर असल्यामुळं नामचेमधील टिपूर चांदण्यात न्हाणारं प्रत्येक घर ना घर मला स्पष्ट दिसत होतं. विलोभनीय वाटत होतं. माझ्या श्वासोच्छ्वासाचा आवाजही त्या नीरव शांततेत नको वाटत होता. निःस्तब्ध समाधी लागल्यासारखं नामचे शहर शांत झोपलं होतं, तर ते दृश्य पाहता–पाहता निःशब्द समाधी लागली होती माझी.

*नीरवता ती तशीच, धुंद तेच चांदणे*
*छायांनी रेखियले चित्र तेच देखणे ॥*

सुधीर फडक्यांनी गायिलेल्या शांताबाई शेळक्यांच्या या ओळी आजपर्यंत मी नुसता गुणगुणतच होतो. पण समोरच्या कोंगदेची किनार व वातावरणातील निःशब्द शांतता त्याचा अर्थ मला उलगडून सांगत होती.

किती वेळ थांबलो होतो, कुणास ठाऊक? पण त्या दृश्यासमोरून आपण दूर होऊच नये, असं वाटत होतं. दुपारी सूर्यप्रकाशात चकाकणारी नि आता चंद्रप्रकाशात ओथंबून निघणारी कोंगदेची शिखरं, एकाच पर्वतराशीची दोन विभिन्न रूपं माणसाच्या दोन मुखवट्यांसारखी चंद्रमा मूळचाच शीतल, त्याहून त्याची किरणं शीतल व ती किरणं तप्त झालीत, की काय, असं वाटून थंडगार हिमराशीवरून परावर्तित होऊन माझ्यापर्यंत जणू शीतलतेचा शांततेचा, संदेशच घेऊन येत होती प्रथम निद्रेनं केलेला विरोध व नंतर मनात आलेले अहंकारी विचार सर्व सर्व शांत झाले होते. निर्विचार व निर्विकार मनानं शांतपणे मी झोपेच्या अधीन झालो.

रात्री उशिरा झोपलो असलो, तरी ज्या शांततेनं मी झोपलो होतो, त्यामुळं सकाळी पाचला जाग येऊनही मी ताजातवाना होतो. डॉक्टरांचं लॉजच्या काचेतून कोंगदें निरीक्षण चालू होतं व त्याचबरोबर डायरी लिखाणही.

मी झटकन उठलो व कॅमेरा घेऊन आधी बाहेर पडलो. सूर्योदयाची वेळ होती

व प्रथमच कोवळ्या सूर्यकिरणांत अवाढव्य अशा शिखरांचं जवळून दर्शन होणार होतं. राम चव्हाण माझ्या आधीच बाहेर पडलेला होता. तोही कॅमेरा घेऊन टपून होता. आमच्या मागील परिसर हळूहळू उजळू लागला होता. आमची नजर होती कोंगदेवर. डॉक्टर भालेरावही कॅमेरा सरसावून आले होते आणि तेवढ्यात तो चमत्कार साकारला. सूर्याची पहिली किरणं त्या हिमशिखरांवर पडली नि चांदीच्या पत्र्याला सोन्याची किनार बसवावी, तसा तो समोरचा परिसर दिसू लागला. डोळयांपुढं क्षणभर लखलखून दिव्यांची अतूट रांग पसरावी व त्या सोनेरी प्रकाशानं सर्वच आसमंत पिवळ्या धमक रंगात झळकावा, त्याप्रमाणे त्या कोवळ्या सूर्यकिरणांनी आपली कमाल दाखवली. फोटो आता काढू, का अजून काही क्षणांनी काढावा, याचा निर्णय घेता येईना. पाहतो, ते सुंदर, की पुढं अजून सुंदरता वाढेल? हे लक्षात येईना. सर्वांची स्थिती थोडी -फार अशीच भांबावलेली. त्याच स्थितीत फोटो घेतले. बराच वेळ त्या किमयेची मनात साठवण करत होतो.

आज आम्ही 'एव्हरेस्ट व्ह्यू' हॉटेलला जाऊन परत इथंच येणार होतो. त्यामुळं पाठीवर ओझं नाही नि म्हणून सर्वांनाच थोडंसं हायसं वाटलं. आम्ही राहत असलेल्या लॉजच्या मागच्या बाजूनंच रस्ता होता. रस्ता कसला? चढच. कालचा चढ अजून मनातून गेलेला नव्हता, तिथं हा आजच्या दिवसाचा पहिल्याच पावलापासून चढ सुरू झाला होता. कालचा चढ खूप बरा, अशी म्हणण्याची पाळी. म्हणजे काल आम्ही पाठीवर ओझं असूनही, कसे का होईना, चढ चढत होतो. पण आज ओझं नसतानाही चढ आम्हांला जड जाऊ लागला. घराच्या भिंती २५ अंश कलत्या केल्यावर जशा दिसतील, तसा चढ. हा चढ उतरताना काय त्रेधातिरपीट उडेल, या अंदाजानंच मला चढताना घाम फुटू लागला होता. नामचेची प्रत्येक गोष्ट चढावर– अगदी प्रातर्विधीला जायचं म्हटलं, तरी पाच-सहा पायऱ्या चढ आलाच.

राम चव्हाण थोडा आजारी असल्यामुळं आज आमच्याबरोबर नव्हता. आम्ही सातजणं व पोर्टरही एकच. तशी इकडे वाटेनं मुळातच वर्दळ कमी. आम्ही आता जात असलेल्या वाटेवर तर नाहीच म्हटलं, तरी चालेल. कारण रस्ता फारच चढाचा होता. दोघे- चौघे ट्रेकर्स भेटले, तेवढेच. नामचेच्या मागील पूर्ण चढानंतर थोडी सपाटी लागली. चढ चढण्यास आम्हांला लागले फक्त दोन तास. या उंचीवरून नामचे शहर सगळंच्या सगळं नजरेच्या टप्प्यात आलं होतं. सपाटीवरच एक हेलीपॅड होतं. खाजगी हेलीकॉप्टर्स उतरण्यासाठी. त्याचे सिग्नलचे रंगी-बेरंगी बलून वाऱ्याबरोबर फडफडताना लक्ष वेधून घेत होते. आजूबाजूला सुरूची उंचच उंच झाडं, मध्ये विस्तीर्ण मोकळं मैदान. सुंदरतेला एक आगळाच स्पर्श. आत्तापर्यंत सौंदर्याला शिस्त नव्हती; पण इथं सौंदर्याला शिस्तशीर वळण दिलं होतं. कुसूम-कुंगरूची शिखरं पूर्वेकडून डोकावत होती, तर कोंगदेची शिखरं पाठीशीच होती. आम्ही आता जवळ जवळ १२,७०० फूट उंचीवर होतो. आजूबाजूला खोल असलेल्या दऱ्यांतून विरळ धुकं वरवर तरंगताना दिसत होतं. वाऱ्याच्या जोरही

जाणवत होता.

हॉटेलची इमारत दिसू लागली होती. एवढ्या उंचावर फाईव्ह स्टार हॉटेल बांधणं म्हणजे चेष्टा नव्हती. मानवाच्या व्यवहारी मनाचं कौतुक मानावं, की कीव करावी? आता इतक्या बारा-तेरा हजार फूट उंचीवर पंचतारांकित हॉटेलची कोणी अपेक्षा करेल काय? इथलं वातावरण, बदलणारं हवामान, क्षणोक्षणी असलेला निसर्ग-प्रकोपाचा धोका प्रत्येक वस्तू खांद्यावरूनच वाहून आणणं ही अपरिहार्यता, एवढ्या सगळ्या कष्टांवर संकटावर मात करून इथं पंचतारांकित हॉटेल बांधलं, म्हणजे कौतुकास्पदच आहे! पण त्याचबरोबर दुसरंही जाणवतं की, मानवानं कितीही प्रयत्न केला, तरी तो निसर्गाच्या प्रकोपापुढं टक्कर देऊच शकत नाही, एका क्षणात होत्याचं नव्हतं करण्याची किमया निसर्ग वारंवार दाखवीतच असतो. हिरोशिमावरील बॉम्ब असो, ज्वालामुखीचा उद्रेक असो, भूकंप, वादळ, पूर वगैरे वगैरे काही असो, मानवनिर्मित एकही वस्तू या प्रकोपासमोर टिकाव धरू शकत नाही. मानव व मानवनिर्मिती अगदी क्षुद्र भासू लागते. महाराष्ट्रातील किल्लारी येथील भूकंप हे या निसर्गप्रकोपाचं अगदी ताज़ं उदाहरण. रात्री साडेबारा एकपर्यंत हसत खेळत असणारी किल्लारी अवघ्या दोन तासांनी पूर्ण भूमीच्या पोटात रिचवली गेली होती.

पण माणूस कितीही लहान असला, तरी तो या संकटांना टक्कर देत आपली कर्तृत्वाची उंची मात्र दाखवतच असतो.

इथल्या सर्व पायपिटीवरून मनात एक विचार यायचा, की ही सर्व लोकं इतक्या उंचीवर चढण्या-उतरण्याचा इतका त्रास असताना इथं राहतातच कशाला? सरळ जिथं सर्व सुविधा आहेत, तिथं जाऊन का राहत नाहीत? या प्रश्नाला मग मीच उत्तर देई, की ही सर्व प्रजा आपापली संस्कृती जपून आहे. अत्याधुनिक यंत्र- सुविधांनी ती पांगळी झालेली नाही. कष्ट पडले, तरी चालतील; पण आपलं मुळातलं वैभव सोडायचं नाही. प्रत्येकाला आपल्या मातृभूमीची, जन्मगावाची ओढ ही असतेच, वृक्ष कितीही वाढला, तरी मुळांशी असलेलं नातं थोडंच तोडलं जातं? नवजात अर्भकांनाही आपल्या आईचा श्वास, स्पर्श जाणवतो. तोच स्पर्श आपल्या मातृभूमीतील मातीतून आपल्याला जाणवत असतो. आपली भाषा, आपलं राहणीमान, आपली संस्कृती, आपला धर्म, की– जे टिकवण्यासाठी मानव प्रयत्नशील तर असतोच; पण आग्रही सुद्धा असतो. प्रसंगी प्राण गेले, तरी बेहत्तर आहे; पण हे टिकलं पाहिजे, अशा विचारांचा तो बनतो, तसं नसतं, तर आपला देश स्वतंत्र करण्यासाठी निर्माण झालेली हुतात्म्यांची मालिका कुठल्याच देशात उत्पन्न झाली नसती.

'एव्हरेस्ट व्ह्यू' हॉटेल जवळ आलं होतं. हॉटेल आलीशानच होतं. दर्शनी पंचवीस एक पायऱ्या चढून स्वागत- कक्षात आलो. आपल्या इथं कुठल्याही हॉटेलमध्ये गेल्यानंतर एक वेगळाच एकत्रित झालेला चमत्कारिक वास वा ट्यूनसूचे आवाज इथं नव्हते. स्वच्छ, नितळ हवा व तशीच नीरव शांतता. मखमली गालिच्यावरून हॉटेलच्या

मागच्या बाजूस आलो नि समोर जे दिसत होतं, त्यानं मी दिङ्मूढ होऊन पाहतच राहिलो. सृष्टीत एवढा मनोहारी आविष्कार असू शकतो, हे स्वप्नातही अनुभवलं नव्हतं. आमच्या भोवती वर्तुळाकार खुंबु खोरं पसरलं होतं. 'एव्हरेस्ट व्ह्यू' हॉटेल अगदी केंद्रबिंदूतच होतं. आम्ही हॉटेलच्या या स्पॉटवर येईपर्यंत आत्ता दिसणाऱ्या दृश्याची थोडी सुद्धा चाहूल न लागणं हे आणखी एक वैशिष्ट्य. ज्या कोणी हॉटेलसाठी हा स्पॉट निवडला, त्याला मनोमन सलाम ठोकला. भोवताली शुभ्रधवल बर्फाच्या राशींची शिखरं. शुभ्रता एवढी जबरदस्त प्रखर होती, की काळ्या गॉगलशिवाय त्या बर्फाकडे नजर टाकणं म्हणजे डोळे खराब करून घेणं झालं असतं. एकदम समोर लुत्से नुत्सेच्या मागून डोकावत होता राजा एव्हरेस्ट. उजव्या बाजूला एखाद्या गोरिलासारखा दिसणारा अबादलम होता, तर त्याला जोडून कुसुम-कुंगरूच्या शिखरांची रांग. त्याचं एक शिखर, तर दुधा-दह्याचा अभिषेक होणाऱ्या महादेवाच्या पिंडीसारखं. एव्हरेस्टच्या डाव्या बाजूला खुंबुत्से व पुढं पामेरीची हिमशिखरं व त्यांची रांग थेट हॉटेलच्या डाव्या बाजूनं मागे जाऊन कोंगदेला भिडली होती. आमच्या मागे सशाचे कान टवकारून कोंगदे होताच. शिखरापासून तळापर्यंत बर्फच बर्फ. चांदीचा, रुप्याचा वर्ख दिल्यासारखं चकाकत होतं. ताटाभोवती महिरपी रांगोळी काढावी, तसा त्या सर्व नगशिखरांमध्ये एव्हरेस्ट विराजमान झालेला. आकाश पूर्ण निरभ्र. सूर्यकिरण खुंबुखोऱ्यात अंगोपांगी वर्षाव करत होते. निळ्याभोर निरभ्र आकाशाच्या पार्श्वभूमीवर सृष्टीचा हा नजराणा डोळे दिपवून टाकत होता. दुर्बिणीतून तर त्या दृश्यातले मोहक बारकावेही दिसत होते. डोंगरावरील बर्फाची मऊशार गादीसारखी झालेली सपाटी, बर्फाच्या ओघळांनी घेतलेलं बाकदार वळण. कड्यावरून त्या ओघळातून टपटपणारं बर्फ. एव्हरेस्टवर तर मधेच एकदम चार-पाच काळे ठिपके दिसू लागले. दुर्बिणीतून पाहिल्यानंतर दिसू लागलं, की एव्हरेस्ट चढण्याचा प्रयत्न करणारे ते गिर्यारोहक आहेत. एका डोंगराच्या पायथ्याशी एक छोटं गाव दिसत होतं. डोंगराच्या कडेकडेनं कुठं कुठं पायवाटेनं जाणारे ट्रेकर्स दिसत होते. आपल्यालाही त्याच रस्त्यानं जायचं आहे, हे लक्षात आल्यावर अंगावर शहारेच यायचे. त्या सर्व विलोभनीय दृश्याला शब्दांतल्या उपमा अपुऱ्याच. पूर्ण खुंबु खोरं एकाच वेळेस पाहण्यासाठीचं हे एकमेव ठिकाण. हॉटेलचं भिंतीस एक वाईड डार्क सनग्लास लावलेली होती. समोरच्या पूर्ण परिसराचं प्रतिबिंब तीत सहजरीत्या व सुंदर दिसत होतं.

हॉटेलचा एक कप चहा नव्वद रुपयांना असल्यामुळं कोणी चहा घेण्याचं धारिष्ट केलं नाही. खुंबु खोऱ्याचं दृश्य कितीही वेळ पाहत बसलो असतो, तरी तृप्ती झाली नसती. मी हॉटेलच्या दर्शनी भागातील पायरीवर येऊन तेथून परिसर न्याहाळत होतो.

थोड्याच वेळात दीपक पटपट पायऱ्या उतरून आला व लगेच परतीच्या मार्गानं पुढं चालू लागला.

मला जरा खटकलं. हा असा न बोलता. न सांगता का चाललाय्? 'दीपक,

दीपक' म्हणून मी दोनदा हाकाही मारल्या, पण त्यानं काहीच प्रतिक्रिया दर्शवली नाही. त्याच्या चालीवरून तो चिडला असावा, असं वाटत होतं.

काही वेळात बाकीचे सर्वजण आले. तोपर्यंत पुढं गेलेला दीपक नजरेआड झाला होता.

'अरे एस्. आर्., दीपक दिसला का, रे?' किशोर विचारत होता.

'हा काय आत्ताच तो पुढं गेला, का? काय झालं?' माझी विचारणा.

'अरे, फोटो काढताना तो मधे आल्यामुळं सबनीसची व त्याची जरा वाचावाची झाली. तसं विशेष काही नाही.'

दीपक तसा पटकन चिडतो.

आम्ही सर्व परतीच्या मार्गाला लागलो.

वाटेतील एका उंच खडकावर दीपक बसला होता. एकाकी पडल्यासारखा.

त्याच्याजवळ गेलो, तर त्याच्या डोळयांत चक्क पाणी. मी त्याला खूप समजावलं, पण तो ऐकण्याच्या मनःस्थितीतच नव्हता. थोडा वेळ जाऊ देणं हाच त्यावर उपाय होता.

बाकीची मंडळी पुढं जाऊन हेलीपॅडच्या समोर असलेल्या उंच खडकाच्या सावलीत जाऊन बसली होती. दीपक काही ऐकेना, तसा त्याला सोडून मीही बाकीच्या मंडळींत येऊन बसलो. लाडू, बिस्किटं वगैरे खाण्यासाठी आणलेच होते. ते पदार्थ संपवण्याच्या कामी आम्ही लागलो.

थोड्याच वेळात दीपक येताना दिसला; पण तो आमच्याकडे न येता परस्पर नामचेच्या उताराला लागला. इकडे सबनीसही थोडासा रागातच होता. कुठं तरी हा विषय संपवणं आवश्यक होतं.

एव्हरेस्ट व्ह्यू' पासून दिसलेल्या दृश्यामुळं जवळजवळ सगळेच हरखून गेले होते. लुक्लाला उतरल्यापासून तीनही दिवस सृष्टिसौंदर्याचे अगदी अनोखे आविष्कार सामोरे आल्यामुळं मी तर भारावूनच गेलो होतो. धन्य होणं म्हणजे काय, याचा अनुभव येत होता.

माझ्या मनातला विषय डॉ. भालेरावांना कळला, की काय? समजलं नाही; पण बिस्किट तोंडात टाकून त्यांनी सुरुवात केली.

'सबनीस, मानलं, यार, तुम्हांला! काय बेस्ट ट्रेक आहे.'

'अरे डॉक्टरा, दोन वर्षं घासतोय यासाठी. काय काय केलं, हे सर्व जुळवण्यासाठी. हे माझं मला माहीत आणि हे टिकोजीराव. यांना काही कळतं का यातलं? पण ताठा किती?' सबनीस दीपकला सोडत नव्हता.

'नाही पण, सबनीस, आता आपल्याला आज भरपूर वेळ आहे. तेव्हा तू खरंच या ट्रेकची पार्श्वभूमी सांग.' माझा आग्रह.

‘बरं का, एस्. आर्. दोन वर्षांपूर्वी आम्ही– म्हणजे मी, सबनीस, काका देशपांडे, किशोर आम्ही सर्व हेमकुंड, ‘व्हॅली ऑफ फ्लॉवर’ या ट्रेकला गेलो होतो. तिथं या ट्रेकचा विषय निघाला.’ मोरे सांगत होते. ‘सहा हजार फूट उंचीवर काका देशपांडे सारखा वृद्ध माणूस सहज चढला, माहितीये? तिथं काकांनी एव्हरेस्ट बेस कॅम्पचा विषय डोक्यात घेतला. हेमकुंड ट्रेक व्यवस्थित पूर्ण झाल्यामुळं आम्हां सर्वांनाच स्वत:बद्दल खात्री पटली व मग आम्ही सर्वच या ट्रेकसाठी झपाटल्यासारखे सबनीसच्या मागे लागलो, माहितीये?’

‘पण, सबनीस, तू दोन वर्षं अभ्यास... म्हणजे नेमकं काय केलं? म्हणजे मला याबावतीत पूर्ण अज्ञान असल्यामुळं मी विचारतोय्.’ सबनीसला बोलतं करण्याचं काम माझं चालूच होतं.

‘मोरे म्हणतात, ते खरंय्, काकासारखा छप्पन वर्षांचा म्हातारा एवढा हेमकुंडसारखा ट्रेक पूर्ण करतोय्, कळल्यावर डोक्यात काही काही गोष्टी ट्रेकविषयी फिट बसल्या. टीम कशी असावी, लोकांचा स्टॅमिना, येणाऱ्या अडचणी यांबद्दल अनुभव मिळतच होता.’ सबनीस सांगू लागला, ‘काकांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प या ट्रेकचा विषय डोक्यात घातला नि त्याचा ध्यास लागल्यासारखा मी त्या ट्रेकच्या मागेच लागलो. समुद्रसपाटीपासून साडे एकोणीस हजार फुटांवर जाणं म्हणजे चेष्टा नाही. हे आधी मनोमन पूर्ण बिंबवलं. मी एकटाच नव्हे, तर माझ्याबरोबर सहकारी असणारच आहेत. त्यामुळं सर्वांचा व ट्रेकचा सर्वांगीण विचार करणं आवश्यक होतं.’ सबनीस खुलला होता. तो पुढं सांगू लागला, ‘ज्यानं हा ट्रेक पूर्ण केला आहे, त्याच्याकडून या ट्रेकची पूर्ण माहिती मिळवणं ही माझ्या दृष्टीनं पहिली बाब होती. चवकशी करताना असं दिसलं, की हा ट्रेक फार थोड्या लोकांनी केला आहे व तेही अशी सविस्तर माहिती देऊ शकले नाहीत. त्यानंतर सुदैवानं माझा चुलत भाऊ पराग हा मागच्याच वर्षी या ट्रेकसाठी आला होता. त्यामुळं मला माहिती फारच सुलभरीत्या व येणाऱ्या बारीकसारीक अडचणींसहित मिळाली. रूटवरची गावं, इथं मिळणाऱ्या सोयी, राहण्याची व्यवस्था, जेवणासाठी मिळणारे पदार्थ, येथील वातावरणातील फरक, प्रत्येक मुक्कामातील म्हणजे दररोज चालावयाचं अंतर व चढावयाचा चढ. असा बारीकसारीक तपशील मी त्याच्याकडून घेतला व त्यावर अभ्यास सुरू केला.

‘एव्हरेस्टला जाण्यासाठी दोन रूट आहेत. एक काठमांडू ते जेरी बसनं व नंतर जेरीपासून लुक्ला मार्गे एव्हरेस्ट बेस असा जवळ जवळ तीस दिवसांचा ट्रेक, तर दुसरा काठमांडू ते लुक्ला विमानानं व नंतर लुक्ला ते एव्हरेस्ट बेस असा सोळा दिवसांचा ट्रेक.’

‘पण मग तू विमानाचा महागडा प्रवास का निवडलास?’ मी विचारलं, ‘त्यापेक्षा आपण तीस दिवसांचा ट्रेक नसता का केला?

‘तू आता दोन दिवस चाललायस. दहा दिवसांनंतर तू मला हे सांग. तीस दिवस

दररोज चालायचं, म्हणजे काय चेष्टा वाटली का? बरं, दुसरा प्रश्न महागड्या प्रवासाचा. या दोन मार्गांची मी तुलना सुरू केली. जेरी ते एव्हरेस्ट बेस या मार्गातील पहिले पंधरा दिवस लुक्लापर्यंत डोंगरातून नुसते चढ–उतार आहेत व या पंधरा दिवसांतील दमणुकीमुळं पुढील महत्त्वाच्या ट्रेकवर त्याचा परिणाम होण्याचा संभव होता. दुसरा प्रश्न पंधरा दिवस राहण्याचा व जेवणाचा खर्च हा होणारच. मग हाच खर्च विमान–प्रवासात घालवून लुक्लापर्यंत येणं व सुटसुटीत ट्रेक पुरा करणं मला सोयिस्कर वाटलं व मी या मार्गावरील प्रवास कसा करायचा, वगैरेबाबत पूर्ण माहिती घेतली. आय्.एम्.एफ्.– इंडियन माऊंटेनीअरिंग फाऊण्डेशनकडून परवानगी मिळण्यासाठी पत्र–व्यवहार, नेपाळ टूरिझम खात्याशी पत्रव्यवहारात मला किशोरची व मोऱ्यांनी चांगलीच मदत केली. ट्रेकला येणारे सगळेच माझ्या माहितीतले होते. त्यांचा स्टॅमिनाही मला माहीत होता. फक्त हा एस्. आर्. च नवा होता. मी त्याला का घेतला, हा प्रश्नच आहे. पण त्याच्या सिंहगड प्रॅक्टिसनं मला खात्री झाली, की हा एव्हरेस्ट बेस ट्रेक पूर्ण करू शकेल. आम्ही जी नावं घेतली, त्यांत काका नि बिरनाळया तेवढे गळाले. मग फक्त रेल्वे, विमान जाण्या–येण्याचं रिझर्व्हेशन करण्याचं बाकी राहिले, ते गेल्या तीन महिन्यांपासून प्रवासाची डे टु डे आखणी करत होतो.'

सवनीसची माहिती होईपर्यंत सर्वांनी नाश्ता संपवला होता.

सवनीसनं कॉलेज– जीवनापासूनच स्पोर्ट्सची आवड जपली होती व त्याच अनुषंगानं शारीरिक फिटनेस्च्या दृष्टीनं ट्रेकिंगसारख्या ॲक्टिव्हिटीज्मध्येही तो रस घेत होता. ट्रेकिंगच्या दृष्टीनं जिथं जावयाचं, तेथील पूर्ण माहिती, ज्यांना न्यायचं, त्यांची शारीरिक क्षमता, मानसिक तयारी व या सर्वांची सांगड घालणं हा एक अभ्यासाचाच विषय आहे. कुठलंही हाती घेतलेलं कार्य व्यवस्थित यशस्वीपणे पार पाडण्यासाठी त्या कार्याला चहूंअंगांनी विचार करणं हे सवनीसचं वैशिष्ट्य या ट्रेकमध्ये दिसून येत होतं.

सवनीसच्या अभ्यासाचं मनोमन कौतुक करतच उठलो व नामचेच्या रस्त्याला लागलो. त्या चढावरून नामचेचं वर न् घर स्पष्ट दिसत होतं. एकीकडे मिलिटरीचा कॅंप होता, तर दुसऱ्या बाजूला तेथील मंदिरं! मधे शहर!

उतरताना आम्हांला चार-पाच पोर्टर लाकडी खांब वर आणताना दिसले. एकेकाच्या पाठीवर आठ-आठ लाकडं. उंची अंदाजे बारा फूट प्रत्येकी. आम्हांला जो चढ कुठलंही ओझं नसताना चढवत नव्हता, तो चढ ते एवढं ओझं घेऊन चढत होते.

त्यांच्या चिकाटीबद्दल कौतुक करावं, का त्यांच्या त्रासाबद्दल कीव करावी, या विचारातच उतरू लागलो.

नंतर म्यूझियम पाहण्यास गेलो. म्यूझियमची वेळ ८ ते ४ व दर शनिवार व सार्वजनिक सुट्ट्यांना म्यूझियम बंद असतं. त्यात नेपाळची पूर्ण माहिती, लोकांचे रीतिरिवाज, राहण्याची पद्धती, ट्रेकिंगविषयी सूचना, नेपाळमधील पशुपक्षी, खाद्यपेये यांची वैशिष्ट्यं फोटोसहित पाहायला मिळाली.

लॉजवर आल्यावर पत्रं, गाणी, लिखाण, गप्पा यांच्यांत वेळ जाऊ लागला. आता बदामसात, रमी, चांगलेच रंगात येऊ लागले होते. मनानं सगळेच एकमेकांच्या खूपच जवळ आले होतो. एकमेकांचे स्वभावही खूप परिचयाचे झाल्यामुळं परस्पर कुरघोडीच्या चेष्टामस्कऱ्या चालू होत्या.

मोरे, डॉक्टर, शिंदे यांचं झोपेतील घोरणं हा एक असाच विषय! तर दुसरा विषय– म्हणजे आमच्या दोघा-तिघांचं सावकाश चालणं!

किशोरचं लांव लांब टांगा टाकत चालण्याचा प्रकार हा एकमेकांची खिल्ली उडवण्यास पुरेसा होता. त्यात थंडीमुळं सगळयांचीच नासिकाग्रं लाल होऊन झिरपू लागली होती.

नाकं पुसून पुसून वरची त्वचा निघू लागली होती. थंडीमुळं दाढी करणं थांबलंच होतं. त्यामुळं प्रत्येकाचे चेहरे पाहण्यासारखे झाले होते.

'एस्. आर्., बेस कॅम्पला गेल्यावर तिथं ज्यांनी एव्हरेस्ट चढण्यासाठी कॅम्प टाकले आहेत, त्यांत कोणी आजारी असेल, तर नशीब म्हणून तुझा नंवर लागेल, बघ! जाऊन ये एव्हरेस्टवर!'

डॉक्टर माझ्या पहिल्याच ट्रेकिंगमुळं चेष्टा करण्याचं सोडत नव्हते. मग त्यांना चेक म्हणून विषय त्यांच्या पत्नीप्रेमावर वळवायचा. तो विषय ओघळत रामजवळ येऊन थांबायचा!

'मग, मोरेसाहेब! घरी वहिनी काही ठीक दिसत नव्हत्या. आजारी वगैरे आहेत, की काय?' सवनीसची विचारणा!

'अरे, कसचं काय, ट्रेकिंगचा विषय सुरू झाल्यापासून घरात मौनव्रत सुरू झालं, माहितीये? वरं, भांडणात तरी ती बोलेल, असं वाटलं होतं, पण भांडणात सुद्धा ती माझ्याशी बोलत नाही, माहितीये?'

मोरे उसासून बोलत होते. मोरेंना एका वाक्याआड वाक्याच्या शेवटी 'माहितीये' म्हणण्याची सवय.

'तुम्ही घरी कशाला येता? तिकडंच फिरत जा ना!' किशोरच्या बायकोचा वैताग! तरी पण किशोरच्या खिशात मात्र सौ. किशोरचा फोटो! आठवण झाली, की फोटो काढून बघत बसणार!

'त्यात काय काळजी करायची? आँ? येतोय् की एका महिन्यात? तुमची तुम्ही काळजी घ्या.' आपल्या करड्या आवाजात सवनीसनं सौ. सवनीसांची बोळवण केली असावी, असं माझं मत!

सौ. कुलकर्णीबाबत तर विचारूच नका! एव्हाना असतील नसतील, त्या देवादिकांना नवस वगैरे बोलून झाले असतील! ट्रेकिंगपेक्षा नवस फेडण्याचाच खर्च जास्त होणार आमचा!

'जप चालला असेल! कामाधामांत लक्ष नसेल! अहो, मकर राशीचं भविष्यच

तिला हे करायला लावणार, हे सांगायला कुणा ज्योतिष्याची गरजच नाहीये!'

गाण्यांच्या भेंड्या सुरू झाल्या होत्या. 'ख' अक्षरावरून गाणी शोधत होतो. 'ख़ोया ख़ोया चाँद', 'खो गया है मेरा प्यार...'

गाणी शोधता-शोधता खुर्रर्र आवाज येऊ लागला. पाहतो, तर मोरेसाहेब घोरू लागले होते.

पहाटे पाचपासून परत आवराआवर सुरू केली. गेल्या रात्रीही झोप म्हणावी तशी लागली नाही. इतकी दमणूक झाल्यावर, खरं म्हणजे, गाढ झोप यायला हवी होती. पण सलग अशी झोप आलीच नाही.

आजचा टप्पा चढाचा नव्हता. डोंगराच्या कडेकडेनं सपाट वाट व उतार! नामचे शहर चढावर वसल्यामुळं नामचेला येण्यासाठी चढ, तर इथून जाण्यासाठी उतार!

आता असलेला उतार परतताना चढ म्हणून सामोरा येणार आहे, या विचारानंही धडकी भरायची.

इथला निसर्ग, शांतपणा विचारांना सहज चालना देत होता. धावपळीच्या जगातून आम्ही शांत रम्य अशा विश्वात आलो होतो, की त्याचा फायदा असा होऊ लागला की, मी अंतर्मनात डोकावू लागलो. आताचा उतार मला परत येताना चढ म्हणून चढायचा आहे, ही भविष्यातील जाणीव मला आताच होऊ लागली आहे. या वाटेला मी आता धन्यवाद देत जाणार आहे. तर येताना ह्याच वाटेला लाखोली वाहणार आहे. तसा काय फरक असणार आहे आताच्या व नंतर येतानाच्या परिस्थितीत? काही नाही, तीच वाट, हेच वातावरण, तोच मी, तेच चालणं, सगळं एकच; पण रस्त्याचा उतार व चढ एवढाच फरक विरुद्ध विचारांना प्रवृत्त करतो.

डोंगराच्या कडेकडेनं असलेली वाट सपाट असली, तरी धोकादायक होतीच! डाव्या हाताला उंचच उंच डोंगरांचे सुळके, तर उजव्या हाताला नजर जात नाही, अशा खोल दऱ्या!

नजर फिरतच होती! मला सिंहगडचा खानापूरहून जाणाऱ्या रस्त्यावरचा शेवटचा टप्पा आठवायचा. बिरनाळेनं दिलेला तो अनुभव मला इथं खरोखरच कामाला आला.

त्या वेळेसच्या त्या पाठीमागल्या दरीनं असेच डोळे फिरवले होते. पण आता मला ह्या भीतीचं काही वाटेनासं झालं होतं. प्रत्येक डोंगराचा वळसा घेतला, की समोर एव्हरेस्ट दिसायचा! मग थोडा वेळ थांबायचं, पुढं चालायचं!

साधारणतः नऊच्या सुमारास सणसा हे गाव लागलं. इथं वेगळया वेगळया प्रकारचे डोंगरी अलंकार, मूर्ती यांची बरीच दुकानं होती. पण किमती मात्र फारच होत्या. येताना विकत घेता येईल, यादृष्टीनं काही वस्तू पाहत–पाहत रस्ता काटत होतो.

आज दीपक फारच सावकाश चालत होता. थोडा लंगडतही होता. मामा शिंदे त्याच्या बरोबरच होता. सबनीसची व त्याची कालची बाचाबाची रात्रीच पत्त्यांच्या बदामसातमध्ये निवळली होती. मधेच एका ठिकाणी थांबून, मामानं दीपकच्या पोटऱ्या व पाय बामनं चोळून दिले. थोडा वेळ मामानं दोघांच्याही सॅक्स पाठीवर घेतल्या होत्या. दीपकच्या पायांच्या नसा मोकळया झाल्या, तसा तो हळूहळू मार्गी लागला.

आजचा प्रवास उताराचा जास्त असल्यामुळं साडेतीन तासांतच आटोपला.

गाव म्हटलं, म्हणजे साधारणतः चारपाचशे लोकांची वस्ती! एखादी छोटी गल्ली, की तिला बाजारपेठ म्हणावं? एखादी शाळा, पाण्याची टाकी, छोटी किरकोळ अशी किराणा व गरजेच्या वस्तूंची दुकानं, पंचायतीचा ओटा व कार्यालय वगैरे वगैरे समोर येतं. पण इथं दोन घरं– म्हणजेच गावं. म्हणजे आपल्याकडे दूर रानात असणारी एक-दोन घरांची वस्ती असते, तशी, बरं, ही घरंही इतकी लहान होती की, जेमतेम दोन-दोन व्यक्ती नेहमीसाठी राहू शकतील, पण तरीही हे गाव या संज्ञेत मोडलं होतं, फुंगीतांगा!

दोनच घरांचं गाव फुंगीतांगा! त्या घरांचंही रूपांतर लॉजमध्ये झालेलं.

साडे दहा वाजले होते. लॉजचं नाव 'रिव्हर साईड थामसेस्कु' होतं. इथं एडमंड हिलरी ट्रस्टतर्फे वनप्रकल्प राबवला जातो व स्वतः वर्षातून ते एकदा इथं येतात.

लामा लिपीतल्या बौद्धांच्या एका रांगेतील नऊ लाकडी फिरक्या, प्रत्येक फिरकीला एक छोटं चार भिंतींचं छप्पर त्या फिरक्या डोंगरावरून येणाऱ्या सततच्या पाण्याच्या जोरावर अखंड फिरणाऱ्या!

त्यांचा फिरतानाचा खडखड खडखड आवाज, समोरून साधारणतः शंभर एक फूट खालून जाणारी दूधकुशी नदी, त्या पाण्याचा खळखळाट, सर्व बाजूंच्या डोंगरांतून घुमणारा त्याचा प्रतिध्वनी!

कुठलंही प्रदूषण नसलेली स्वच्छ हवा व थंडगार वारा यांनी आमचा साडेतीन तासांचा चालण्याचा शीण चुटकीसरशी घालवला.

नदीमध्ये स्नान करण्याची टूम सबनीसनं काढली. ज्या पाण्यात हाताचं बोट धरलं, तर बधिरपणा जाणवायचा, त्या पाण्यात स्नान!

या कल्पनेनंच सर्वांना बधिरपणा आला असावा. कारण लगेच कोणी संमती दिली नाही.

लुक्लाला उतरल्यापासून स्नान हा विषय सोडून दिलेला होता. तो एकदम समोर आला. नाही म्हटलं, तरी चार-पाच दिवस बिनस्नानामुळं शरीर कसकसलेलं वाटत होतं.

त्यामुळं मला तरी स्नानाची कल्पना आवडली व आपण जिथं वावरणार आहोत, तेथील वातावरणाशी , थंडी-वाऱ्याशी समरस व्हायचं असेल, तर तेथील नैसर्गिक पाण्यात स्नान करणं हाच एकमेव पर्याय असतो, असा माझा तरी अनुभव आहे.

मग चार-पाच दिवसांचे घामेजलेले कपडे घेऊन एकेकजण नदीचा उतार उतरू लागला होता. पाणी बर्फवत गार होतंच; पण त्याचा नितळपणा इतका होता, की तळाचा दगड सुद्धा स्पष्ट दिसायचा!

प्रथम कपडे धुण्यासाठी पाण्यात हात घातला, तो बधिरच झाला. मग थोडा वेळ सारखा तोच प्रयत्न करू लागलो. हात पाण्यात घालायचा नि पटकन् काढायचा. परत परत तेच! त्या हाताला सवय झाली, की दुसरा हात, मग पाय, असं कर्
करीत सगळेच कपडे धुण्यासाठी उतरले!

पर्यावरणाची किती आवश्यकता आहे नि किती फायदा आहे, हे कपडे धुताना लक्षात आलं. कारण गेले आठ-दहा दिवस वापरत असलेले कपडे एका धुण्यात इतके स्वच्छ निघाले, की सर्फच्या ललिताजींना इथं आणावं व मग विचारावं,

'क्या किफायतशीर है? और किसमें समझदारी है?'

एव्हाना बहुतेकांच्या मनाची तयारी झाली होती नि मग किशोर व राम सोडून आम्ही सर्व यथेच्छ डुंबू लागलो.

तसं दररोजच्या स्नानाला असं किती महत्त्व द्यायचं? पण आज स्नानाला महत्त्व आलं होतं, त्या दूधकुशीच्या नितळतेमुळं.

साधारणतः १° तापमान असलेल्या थंडगार पाण्याच्या स्पर्शामुळं, निसर्गानं उधळलेल्या अवतीभोवतीच्या सौंदर्यामुळं तेथील वातावरण समरस होण्यासाठी आमच्या तयार झालेल्या मनोवृत्तीमुळं, सगळ्यांचा दिलखुलास खेळीमेळीच्या वातावरणामुळं!

एरव्ही लुक्लापासून साध्या पाण्यात सुद्धा हात न धरणारे आम्ही चक्क कपडे काढून डोक्यावरून पाणी घेतोय्, म्हणजे आश्चर्यच नाही का? इतक्या कडाक्याच्या थंड हवामानातही आम्ही थंड पाण्यानं स्नान करू शकलो की, त्यामुळं सर्वांचाच उत्साह व आत्मविश्वास वाढला. घरी गरम पाण्याशिवाय स्नान न करणारे इथं मात्र सहजरीत्या थंड पाण्यात उतरले, यावरूनच प्रत्येकाची मनाची तयारी केवढी जबरदस्त होती, हे लक्षात येत होतं; आणि आमच्या पुढील मोहिमेचं यशस्वीपण निश्चितच या प्रसंगातच साठवलं आहे, असं मला मनोमन वाटू लागलं, प्रत्येकाचं मनोबल जबरदस्त उंचावलं आहे, हे दिसून येत होतं. सबनीसच्या या निर्णयाला मी मनापासून दाद दिली. अझरुद्दीनं शेवटच्या षटकात गोलंदाजी सचिनकडे द्यावी अन् सामना खिशात घालावा, तसा हा निर्णय, अनपेक्षित!

दुपारी दोन- अडीचपर्यंत आम्ही नदीच्या पात्रातच बसून होतो. सूर्याची दुपारची कोवळी किरणं अंगांगावर तेज, जोम, उत्साहाचा लेप लावीत होती, तर दूधकुशीवरून येणाऱ्या थंडगार झुळका त्या लेपावर आल्हाददायक फुंकर घालीत होत्या.

अथांग शांतता. मी अत्यंत बारकाईनं निसर्ग अनुभवत होतो. वृक्ष, वेली, पक्षी,

उंच कडे, त्यांवरून येणाऱ्या नागमोडी वाटा, कोसळलेल्या दरडी, नदीत वाहून आलेले महाकाय खडक, थोड्याशा उंचावरून पडणारं नदीचं दुधासारखं शुभ्र पाणी, नितळ पाण्यात आरशालाही लाजवील, असं पडणारं स्वतःचं प्रतिबिंब, पाठीवर थंडगार पाण्याचा शिंतोडा पडल्याबरोबर येणारे शहारे, प्रत्येक वस्तू अन् वस्तू समाधानानं अनुभवत होतो. प्रत्येक क्षण ना क्षण आठवणींच्या साठ्यात साठवत होतो. प्रत्येक श्वास ना श्वास मनावरची अहंकारी धूळ स्वच्छ करीत होता. इथल्या निसर्गाची जादूच अशी होती, की येथील कावळे देखील तारस्वरात कर्णकर्कश ओरडत नाहीत, तर तेही स्वर लावतात पंचमाचा, भले त्याला कोकिळेसारखा गोडवा नसेल, पण त्याची पंचमातली कावकाव निश्चितच वेगळी वाटते.

गारवा वाढायला सुरुवात झाली, तसे आम्ही घरवजा, रेस्टॉरंटवजा लॉजवर आलो. लॉज फारच लहान होता. आत पत्त्यांचा डाव पडला होता.

मी व राम बाहेर येऊन शेजारच्या एका विशाल खडकावर गप्पा मारत निरीक्षण करीत बसलो होतो. माझ्या ओठांतून एक ओळ सहज आली.

*खिलते हैं गुल यहाँ खिलके बिखर जाने को*
*मिलते हैं दिल यहाँ मिलके बिछड जाने को*

'एस्. आर्. ह्या गाण्यात एकाच ओळीत सुख आणि दुःख कसं सहज मिसळलं आहे, नाही?' राम मला विचारीत होता.

'हं...' मी म्हटलं, 'अरे, आयुष्यात सुखदुःख अशीच एकमेकांच्या हातात हात घेऊन येतात. खरं म्हणजे, हे निर्विवाद सत्य आहे. अशा सहजसुंदर अध्यात्मास घेऊन जो कवी निसर्गाचं वर्णन करतो, त्याच्या ओळी आपल्याला सहज भावतात!'

'कवितेचं, गाण्याचं अध्यात्माशी नातं कसं काय?' राम विचारत होता.

तेवढ्यात मोरेही लॉजच्याबाहेर येऊन आमच्या गप्पांत सामील झाले होते.

'मराठीत गदिमांचं अशाच आशयाचं गाणं गीतरामायणात आहे.'

*'वियोगार्थ मीलन होते नेम हा जगाचा*
*पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा.'*

मोरे चटकन म्हणाले,

'आपण या परिसरात आल्यानंतर किती पराधीन आहोत, हे लक्षात येतं. कुठलाच क्षण आपल्या हातात नसतो, माहितीये?' मोरे भारावले होते.

–नि मग एकामागून एक गाणी, अध्यात्म, निसर्ग याच्यासंबंधाची वीण आम्ही तिघे विणू लागलो.

'राम, भा. रा. तांबे ह्या कवीचा निसर्ग व त्याच्या नियमानं अध्यात्म असंच काळजाला भिडणारं व सहज पटणारं.. त्यांची एक प्रसिद्ध कविता आहे : 'मधु मागसी माझ्या सख्यापरी' ज्यांच्या आयुष्याची संध्याकाळ जवळ आली आहे. ते आयुष्याचा जमाखर्च मांडताना म्हणतात :

*'आजवरी कमळांच्या द्रोणी मधु पाजिला तुला भरोनी...'*

'प्रेम देण्यासाठी कमलपत्राचा द्रोण का ? तर कमलपत्रावर कुठलाही द्रव पदार्थ राहतच नाही, तेव्हा माझ्याजवळ काही न ठेवता मी सर्वच तुला दिलं. हे निसर्गनियमातून अध्यात्म त्यांनी सांगितलं.'

राम भारावून ऐकत होता. तो गप्पांत रंगू लागला. निसर्गाच्या सान्निध्यात गप्पांना एक सुखद शिडकावा मिळत होता.

गारवा अधिक पडायला लागला, तसे आम्ही लॉजमध्ये परत आलो.

आम्ही आठजण कसेबसे झोपणार होतो. वारा आत झोंबायला लागला होता. फुंगीतांगा चार-पाच डोंगरांच्या बरोबर मध्ये होतं. त्यामुळं सूर्यप्रकाशाच्या उजेडाची कमतरता पाच-साडेपाचपासूनच भासू लागली होत. साडे-सहापर्यंत जेवणं आटोपली. तोपर्यंत बाहेर अंधाराचं पूर्ण साम्राज्य पसरलं होतं. वीज नसल्यामुळं कंदील, मेणबत्त्या यांवरच रात्रीचे व्यवहार!

गार पाण्याच्या स्नानामुळं कसकसलेलं शरीर मोकळं झालं होतं. सबनीसच्या पोतडीतील जुन्या अवीट गाण्यांचं वलय सुरू झालं, तसं प्रत्येकजण आपला स्वर त्यात मिसळवू लागला.

बाहेर नीरव शांतता! दूधकुशीच्या पाण्याचा खळखळाट एखाद्या अलिप्त असलेल्या ऋषि-शिष्याप्रमाणे आपल्या कामातच मग्न होता. दोन्ही तीरांवर काही झालं, तरी त्याच्याशी माझा संबंध नाही, मला माझं वाहण्याचं काम करायचं आहे, असा असणारा नि जवळ असून दूरवरून येतोय्, असा वाटणारा तो पाण्याचा आवाज, तर जगाच्या शांततेसाठी राजवैभवाचा परित्याग केलेल्या बुद्धदेवाचा संदेश तिथं बसवलेली रहाडगाडगी अव्याहत फिरून देत असताना, त्याच्या होणाऱ्या खडखडाटाचा आवाज, ह्या दोन आवाजांच्या तीरांमधून वाहत होती, ती नीरव शांतता! मनाला शांतता मिळण्यासाठी यापेक्षा सुंदर वातावरण कुठून मिळणार ?

सकाळी सहा वाजता जाग आली. कालच्या थंड पाण्याच्या स्नानामुळं, आणि आम्ही अगदी नदीच्याच काठावर असल्यामुळं थंडी जबरदस्त जाणवत होती. फुंगीतांगा हे चहूबाजूंनी डोंगरांनी वेढलं असल्यामुळं सूर्यदर्शन दहा-साडेदहापर्यंत तरी होत नसावं. लॉजच्या बाहेर पडलो, तर बाहेर फळीवर दोन ट्रेकर्स झोपलेले! स्लीपिंगबॅगमुळं इतक्या थंडीतही बाहेर झोपलो, तरी चालू शकत होतं.

चहा-पाणी, नाष्टा झाला, तसा एक एक सॅक आवरण्यास सुरुवात झाली. आज आमचा प्रवास थँगबुचेपर्यंत होता. १२६८७ फूट उंचीपर्यंत आज आम्ही जाणार होतो. खरं म्हणजे, फुंगीतांग्याच्या या शांत व रमणीय वातावरणातून हलूच नये, असं वाटत होतं. चित्रात दिसणारं एखादं रमणीय दृश्य प्रत्यक्षात आम्ही पाहत होतो. पण पुढील उद्दिष्टही गाठायचं होतं. त्यामुळं फुंगीतांग्याचा मोह सोडणं भाग होतं.

काल फक्त उतार होता, तर आज फक्त चढ आहे. सकाळी सातपासून आम्ही चढ चढण्यास सुरुवात केली आहे. पहिल्या एक-दीड तासातच नि सकाळच्या ताज्या वातावरणात प्रवासाचा पहिला टप्पा झटकन् पार केला जातो. या अनुभवामुळं प्रत्येकजण पहिल्या झटक्यात जास्तीत जास्त अंतर काटण्याचा प्रयत्न करत होता.

फुंगीतांगा म्हणजे आम्ही जवळजवळ डोंगरदऱ्यांच्या पायथ्याशी होतो. त्यामुळं उंचच उंच झाडांच्या गर्द घन जंगलातूनच वाट होती. आम्हांला झाडांची फक्त खोडंच दिसत होती. वरचे शेंडे उंचीमुळं व दाट घनदाटीमुळं दिसणं शक्यच नव्हतं. इथं देवदार, भोजवृक्ष झाडं खूपच होती.

भूर्जपत्रावर पत्र, संदेश हे पौराणिक कथातून वाचलं होतं. भूर्जपत्र काढून त्यावर लिहूनही बघितलं. डॉक्टरांनी तर बरीच भूर्जसाल काढून सॅकमध्ये ठेवली.

म्हटलं,

'डॉक्टर, काय भानगड आहे?'

'अरे एस्. आर्; मेधाला भूर्जपत्रावरच पत्र पाठवतो. एकदम खूश होईल, बघ!'

प्रत्येक गोष्टीत आपल्या आवडत्या व्यक्तीचं स्मरण करणाऱ्या डॉक्टरांचं खरोखरच कौतुक वाटलं. थोड्या वेळापूर्वी कडाक्याची वाटणारी थंडी, चढामुळं पार घामाघूम होऊ लागली होती. नाक नेमकं सर्दीमुळं गळत होतं, की घामामुळं, हे कळतच नव्हतं. वाऱ्याचा मागमूस नव्हता. व आम्ही चालत होतो, त्या रस्त्यावर आम्हीच असू, असं दिसत होतं. कारण विरुद्ध दिशेनं येणारा एकही ट्रेकर भेटत नव्हता वा आमच्या बाजूनं जाणाराही कोणी दिसत नव्हता. सर्वांचेच विश्रांतीचे टप्पे सुरू झाले होते. अजून आम्ही जंगलातूनच जात असल्यामुळं सूर्यकिरणांचा स्पर्शही आम्हांला वा भूमीला झाला नव्हता. आज मात्र कोणी मागं-पुढं झालं नव्हतं. जवळजवळ सगळे एका रांगेतच चाललो होतो.

उजव्या बाजूला एकदम जाणवण्यासारखी सळसळ झाली, म्हणून नजर टाकली, तो काय चक्क कस्तूरीमृग! एका झाडाखाली एक छोटासा काळसर कस्तूरीमृग पानं खात होता.

मला एकदम प्रश्न पडला, की इथं कस्तूरीमृग कसा? तो सहसा कुठं आढळत नाही.

एकाएकी मला स्मरण झालं. कालिदासाच्या पूर्वमेघात एक श्लोक आहे :

*आसीनानां सुरभितशिलं नाभिगन्धैर्मृगाणाम्*
*तस्या एव प्रभवमचलं प्राप्य गौरं तुषारैः।*

*शुभ्र जलाचे तुषार उडवी त्या गंगेचें हें उगमस्थल,*
*कस्तुरिहरणें बसलीं, त्यांचा इथें शिळांना मादक परिमळ।।*

शान्ता ज. शेळके

माझा कॅमेरा वरच होता. मी तो ॲडजस्ट करेपर्यंत तो मृग झाडाच्या आडोशाला गेला. आमच्या सर्वांच्या वडवडीमुळं तो काही वाहेर येईना. हळूहळू सगळे पुढं जाऊ लागलो. मी आपला शांतपणे वसून फोटो काढण्यासाठी त्याची वाहेर येण्याची वाट पाहू लागलो. अर्धा तास झाला, तरी काही हालचाल नाही. शेवटी नाद सोडून दिला. नाही तर पौराणिक कथेत वाचलंच होतं, की सीतेच्या हट्टासाठी कांचनमृगाच्यामागे लागून रामाला आपल्या पत्नीचा विरह सहन करावा लागला होता. ना राम त्या मृगामागे धावता, ना मारीच ओरडता. ना रावण सीतेला पळवून नेता! पण त्या एका मोहापायी पूर्ण रामायण घडलं. मग आता श्रीरामाला एवढ्या अनुभवाची ठेच लागली असता आपण का शहाणे होऊ नये?

चला पुढं. कॅमेरा कव्हरमध्ये टाकून सॅकमध्ये टाकला. एक वळण पुढं वळलो नाही, तर तो मृग वाहेर आलेला! मी कॅमेरा काढण्याचा प्रयत्नच केला नाही. बाकीचे वरेच पुढं गेले होते. कस्तूरीमृगाच्या मोहानं मी मागे राहिलो होतो.

वाटचाल सुरू झाली होती. एक एक वळण घेत घेत चढ चढत होता. एका ठिकाणी सर्वच थांवले होते. मी पोचल्यानंतर पुढं चालू लागलो. एका ठिकाणी ऱ्होडेड्रेशियाचं डेरेदार झाड! असं सुंदर झाड आतापर्यंत कुठंच दिसलं नव्हतं. ऱ्होडेड्रेशिया म्हणजे नेपाळचं राष्ट्रीय फूल.

सूर्यकिरणही पडले होते. कॅमेऱ्यात तो क्षण टिपून घेतला.

आता स्थानिक लोक दिसू भेटू लागले होते. लाकडी खांब, पाणी वगैरे साहित्य वाहून नेलं जात होतं. साडेवारा झाले होते नि आम्ही एका विस्तीर्ण सपाटीवर आलो होतो. थँगवूचे! चढ संपला, की लगेच सपाटी! त्यामुळं सपाटीवर येईपर्यंत कळलंच नाही नि म्हणून सपाटीवरच्या दृश्यामुळं मागचं सगळं विसरायला लावलं. नामचे नि फुंगीतांगाच्या नेमकी उलटी स्थिती, म्हणजे ती दोन्ही डोंगरांच्या वेचक्यात, तर हे थँगवूचे डोंगरावरील सपाटीवर. चहूवाजूंनी उतरण! खुंवु खोऱ्यात आम्ही अजून आत शिरलो होतो. कुसुम कुंगरूच्या जवळजवळ पायथ्याशीच होतो. एव्हरेस्ट व्ह्यू हॉटेलपासून दिसणारं खुंवु खोरं जवळ आल्यामुळं जास्तच विस्तीर्ण दिसत होतं. आम्ही निसर्गसौंदर्य पाहीपर्यंत किशोर व सवनीस हॉटेल बुक करून आले होते.

'थँगवुचे रेस्ट हाऊस'– तीन वाजूंनी मोठमोठ्या काचेच्या खिडक्या असलेलं! वेडवर पडलं, की तिन्ही वाजू स्पष्ट दिसतात. जवळजवळ पंचवीस वेडचं लॉज! पण सध्या आम्ही आठजण फक्त. सगळयांनी आपापल्या वेडची मालकी घेतली.

पाण्याच्या थंडाव्यामुळं फ्रेश होणं हा प्रकारच नव्हता. फक्त घामेजलेले कपडे काढणं व दुसरे घालणं एवढंच! प्रत्येकजण वाहेर पडून निसर्गसौंदर्य पाहण्याच्या घाईत होता. मी सुद्धा स्पोर्टसूट घालून वाहेर पडलो. त्या विस्तीर्ण मैदानात आल्यावर मात्र गार वाऱ्यामुळं थंडी जवरदस्त जाणवू लागली. नुसत्या स्पोर्टसूटवर राहणं शक्यच नव्हतं.

पँट, फीदरकोट घातलाच पाहिजे, म्हणून परत लॉजवर आलो. लॉजवर नुकतीच एक फॉरेनर ट्रेकर उतरत होती. तिच्या 'मॉर्निंग' शब्दाला प्रत्युत्तर देत मी माझ्या बेडपाशी आलो. पँट चढवली, फीदरकोट घेऊन वर पाहतो, तो काय ? ती युवती कपडे बदलण्याच्या हेतूनं टी शर्ट काढत होती. माझा श्वास वरचा वर व खालचा खालीच! वास्तविक अनावृत स्त्रीदेह मी पहिल्यांदाच पाहतो आहे, अशातला भाग नव्हता, तरीही मी विचलित झालो होतो. त्या युवतीनं नुसता टीशर्ट काढला नाही, तर माझ्या तथाकथित दांभिक विचारांच्या रंगाचा मुलामाच काढला. इतक्या स्वच्छ, नितळ तरल वातावरणात चाललेला माझा प्रवास, त्यावरचा विचार अनावृत देहदर्शनानं सहज नष्ट व्हावा, हा विचारच मनाला सतावू लागला. कदाचित हा आपल्या व त्यांच्याकडील संस्कृतींतला फरक असेल! आपल्याकडे स्त्री-पतीसमोरही मुलास स्तनपान करत नाही, तर आडोसा बघते, तर इथं ही युवती चारही बाजूंनी काचेच्या खिडक्या असलेल्या लॉजमध्ये सकाळी साडेअकराच्या लख्ख प्रकाशात टीशर्ट बदलते, म्हणजे विरोधाभासच नव्हे काय? आपल्या संस्कृतीत परस्त्री देहदर्शन असं सहजासहजी होण्यासारखी बाबच नसताना इथं माझ्यासमोर मात्र हे दृश्य घडत होतं, त्यामुळं मुळात सर्वांत आधी माझ्यातला पुरुष जागृत झाला होता व अनिमिष नेत्रांनी ते दृश्य पाहत होता.

वाहत्या ढगातून क्षणभर चंद्र बाहेर यावा व परत ढगात गडप व्हावा, तसा क्षणभरात तिनं सहजरीत्या टीशर्ट बदलला सुद्धा!

तेवढ्यात दीपक आत शिरत होता. त्याचे विस्फारलेले डोळे त्यानं पाहिलेल्या दृश्याची साक्षच देत होते. कॅमेरे घेतले नि आम्ही सुसाट बाहेर पडलो.

लामा लिपीतील कोरलेल्या वेगवेगळया शिळा इथं खूप आहेत. इथं बुद्धाचं एक सुंदर मंदिर आहे. हे मंदिर एकदा आगीच्या भक्षस्थानी पडलं होतं. आता पुन्हा उभारलेलं! मंदिर पूर्णतः लाकडी! वर तिबेटी बनावटीचा पॅगोडा!

जगाला अहिंसेचा संदेश देणाऱ्या बुद्धदेवाची शांत मूर्ती आतील गाभाऱ्यात विराजमान असलेली, तर तीवर पडणारा मंदप्रकाश मूर्तीचं पावित्र्य अजून वाढविणारा! चारही भिंतींवर बुद्धाच्या वेगवेगळया भावमुद्रा, रंगसंगती सुद्धा अप्रतिम होती.

आतील बुद्धमूर्तीची भव्यता कॅमेऱ्यात पकडणं शक्य नव्हतं. हिमालयातील शांत परिसर व त्यात शांत अशी बुद्धमूर्ती! मन शांत न होईल, तरच नवल!

बराच वेळ बुद्धमूर्तीकडे पाहत नुसता बसून राहिलो.

आम्ही जसजसे एव्हरेस्टच्या दिशेनं पुढं सरकत होतो, तसतसा निसर्गसौंदर्याचा वाढता नजराणा डोळयांसमोर येत होता. म्हणजे आम्ही काल पाहिलेल्या निसर्गानं हरखून जायचो, यानंतर अजून काही निसर्गसौंदर्य असूच शकत नाही, असं वाटायचं, तर आजचं सौंदर्य पाहिल्यावर कालचं सौंदर्य त्यापुढं फिकं पडू लागायचं! सोनं जसजसं झळाळत जाईल, तसतसा त्याचा पिवळेधमकपणा खुलत जातो, दुसरी तकाकी

पहिल्यापेक्षा जास्त, तसंच आमचं होऊ लागलं होतं. आमच्या निसर्गसौंदर्याच्या कल्पना फारच थिट्या आहेत, हे पटू लागलं होतं.

नितळ निसर्गाच्या किमयेमुळं मन तर शांत होऊ लागलंच होतं; पण बुद्धमूर्तीच्या दर्शनामुळं हळूहळू गंभीरही होऊ लागलं होतं. तेथील हिरवळीवर पसरलो. समोरचं दृश्य डोळ्यांनी पाहताना मनात विचार येत होते :

आम्हां मानवांना इतक्या संतादिकांनी सांगून- सवरून सुद्धा दैनंदिन औट घटकेच्या क्षुल्लक मोहापायी आम्ही किती चुकीच्या मार्गानं धावत आहोत. परमेश्वरानं उधळण केलेला हा निसर्गाचा खजिना आम्हांला नको वाटतो, तर आम्ही भुकेलो आहोत क्षुद्र असा पैसा-अडका, जमीन-बंगला, कार, गाड्या या नश्वर वस्तूंसाठी, त्या मिळविण्यासाठी तोंडाला फेस येईपर्यंत धावत आहोत.

आज दुपारी जेवताना मात्र माझे हालच झाले. दाल, चावल होते; पण दाल कमीच होती. सबनीसनं नॉनव्हेज रस्सा घेतला होता; पण मला ते शक्यच नव्हतं. मग विचार केला : नाही तरी डाळीत पाणी असतंच; मग आपण चावल पाण्याबरोबर खाल्ला, तर?

मग बरोबर आणलेल्या चटण्या एकत्र केल्या. चावल, चटण्या व त्यात पाणी.

एव्हरेस्ट ट्रेक झिंदाबाद!

संध्याकाळी सहाला तर या निसर्गसौंदर्यावर अजून एक पुट चढलं. सूर्य नुकताच मावळला होता. त्याची मावळतीचे किरण चहूबाजूंच्या शिखरांवरून उतरत होते. ह्याच वेळेस कोंगदेच्या शिखरावर चंद्रही मावळू लागला होता. पावसाळी ढग गर्दी करू लागले होते. त्यामुळं वातावरणात कुंदपणा आला होता. मेघांवरून सूर्यकिरणांचा संधिप्रकाश संपूर्ण आसमंतात पसरला होता. मेघांआडून डोकावणारी सोनेरी-शिखरं, मावळतीच्या किरणांनी मेघांना दिलेली सोनेरी कड, सोनेरी संधिप्रकाश, त्यामुळं माझी तंद्री लागली होती.

'उद्या मुक्काम फेरीचे-...' किशोर सांगत होता,' नेहमीप्रमाणे आपण सकाळी. सातला निघणार आहोत. साधारणतः साडेतीन तासांनी पॅमबुचे हे गाव लागेल! तिथं सर्वांनी थांबायचं! त्या गावच्या शेजारील डोंगरावर यतीचे अवशेष ठेवले आहेत, ते पाहायचे व नंतर फेरीचेकडं प्रयाण करायचं.'

आजपर्यंत सर्वांच्या तब्येती तरी उत्तम होत्या. नामचे गावी राम चव्हाणचा किरकोळ थंडीताप वगळता सर्वच तब्येतीत होते. थंडीच्या कडाक्यामुळं सर्दीचा त्रास मात्र सर्वांनाच होत होता. रुमालानं नाकं पुसून-पुसून लालबुंद झाली होती. माझी व

मामा शिंदेच्या नाकावरची त्वचा सुद्धा बदलू लागली होती. सर्दी आणि झोप कमी होत असल्यामुळं डोळे तांवारल्यासारखे दिसत होते. आणि ही स्थिती आम्ही १२,००० फूट उंचीवर असतानाची आहे. अजून ७५०० फूट उंच जायचं आहे. म्हणजे अजून काय काय हाल होतील, याची कल्पनाच नको. अर्थात हे हालही निसर्गसौंदर्य चुटकीसरशी पुसून टाकत होतं व आपला प्रेमळ फुलोरा फिरवून आम्हांला उत्साहित करत होतं.

येथील लॉजेसमधून राहण्याची व्यवस्था मात्र लोकांनी चांगली करून ठेवली होती. खोल्या उबदार राहण्यासाठी त्यांच्या शेकोट्या रात्रभर चालू राहायच्या. शेकोटीची ऊब आणि स्लीपिंग बॅग्ज्, सॉक्स, हातमोजे, माकडटोपी यांमुळं थंडीपासून आम्ही सुरक्षित राहत होतो. शाकाहारी जेवणासाठी तरी फक्त भात, दाल व बटाटा-भाजी मिळत असली, तरी ती चवदार मिळत होती. सामिष खाणारांसाठी अंडा-ऑम्लेट किंवा इतर काही मिळायचं; पण शाकाहारींसाठी हे तीनच पदार्थ आणि बरोबर आणलेले तहानलाडू, भूकलाडू!

सर्व लॉजेस्‌मधून एक तरी प्रेमळ म्हातारी असायची नि तिचा अन्नपूर्णेचा हात या चविष्ट भोजनामागे असायचाच!

'कस झालंय्?' म्हणून ती तिच्या भाषेत विचारायची.

'छान', म्हणून आम्ही आमच्या भाषेत सांगायचो. नाही तरी मायेला प्रेमाला बोलण्यासाठी भाषा थोडीच लागते?

उद्या आम्ही पाहणार होतो, त्या यतीच्या अवशेषांबद्दल खूपच उत्सुकता होती. त्याबद्दल खूप ऐकलंही होतं. यती-हिममानव हे खरोखरच होते; आहेत, की फक्त कल्पना! काही समजत नव्हतं. कारण यती म्हणा– हिममानव म्हणा, हे सामान्य माणसापेक्षा आकारानं अवाढव्य असतात, असं ऐकिवात आहे. ते कधी कुणाला मदत करायचे, तर कधी कुणाचा पाठलाग करतही फिरायचे, वगैरे वगैरे अशा खूप आख्यायिकाही ऐकल्या. पण प्रत्यक्षात मात्र मी त्या यतीला वा हिममानवाला पाहिलं आहे, असं म्हणणारा कोणी भेटत नाही. त्यामुळं त्या यतीचं स्वरूप मीं कल्पनेनंच ठरवलं होतं व उद्या त्या अवशेषांशी माझी कल्पना ताडून पाहणार होतो.

सर्व व्यवस्थित असताना सुद्धा झोप मात्र शांत व सलग लागत नव्हती. झोप कमी झाल्यामुळं इतर वेळेस जो थकवा वाटतो, तसा थकवाही जाणवत नव्हता. अनभिज्ञ असलेले आम्ही काही तरी पाहणार आहोत व नजरेसमोर कुठल्या क्षणाला काय होईल, हेही ज्ञात नाहीये, त्यामुळं ती एक अस्वस्थ हुरहुर अंतःकरणात आहे, तीच बहुतेक कमी झोपेचं कारण असावी, असं वाटतं.

आज दीपक कोण्णूर जरा होमसिक झाल्यासारखा दिसला.

मी विचार करीत होतो, की सकाळच्या दृश्याचा तर हा परिणाम नाही ना?

आज २७ एप्रिल! १ मे ला त्याच्या लग्नाचा वाढदिवस. मधू इथं नि चंद्र गोव्यात! त्याची सासुरवाडी गोव्याची. तेव्हा इकडे ट्रेकवर निघाल्यानंतर त्यानं

बायकोला माहेरी पाठवलं होतं. तेव्हा बायको गोव्यात , हा इथं नि आयुष्यातील भीषण अपघाताचा वर्धापन दिन! होमसिक न झाला, तरच नवल!

रात्री आठच्या सुमारास पावसास सुरुवात झाली. पाऊस साधासुधा नव्हताच. त्याचं कोसळणं मनात धडकी भरवत होतं. थोड्या वेळापूर्वी आम्ही त्या काचेतून हिमशिखराचं सौंदर्य न्याहाळत होतो. गाण्याच्या भेंड्यांना रंग चढत होता नि आता हा मुसळधार पाऊस! ढगांचं गडगडणं, विजेच्या कडाडण्यासारखा आवाज करणारं ते कमी वाटतंय्, म्हणून की काय, वीज सपकन् आसूड मारल्यासारखी कडाडून कुठं तरी कोसळलेली असायची. प्रत्येक क्षण नि क्षण उरात धडकी वाढवत होता. डोळयात बोट घातलं, तरी दिसणार नाही, असा गडद अंधार पसरला होता. फक्त आवाजावरूनच आम्ही एकमेकांना साद देऊन बोलत होतो. गडद अंधारामुळं खिडकीबाहेरची एक वस्तूही दिसत नव्हती. पावसाच्या धारा थाड थाड करीत खिडक्या फोडतात, की काय, असं वाटत होतं. प्रलयकाळचा पाऊस म्हणतात, तो हा तर नव्हे ना! अशी मनात शंका चाटून गेली. विजा, वारा, पाऊस यांचं नुसतं थैमान चालू झालं होतं व ते थांबण्याचं वा कमी होण्याचं चिन्हही दिसत नव्हतं. त्यामुळं उद्याच्या दिवसाबाबत सर्वच चिंतेत! आजपर्यंत निसर्ग चांगलाच साथ देत होता. पण आज एकदम बदल पडला. इथलं हवामान कायम बदलत राहतं, त्याचा प्रत्यय येण्यास सुरुवात झाली होती. पाऊस थांबलाच नाही, तर पुढं जायचं, की नाही? चर्चा सुरू झाली.

'अरे, एस्. आर्. सारखा भाग्यवान आपल्याबरोबर आहे. पहिल्याच ट्रेकिंगला एव्हरेस्टला चाललाय्! तेव्हा उद्या सगळं स्वच्छ असणार! तुम्ही आता कशाला काळजी करत बसलाय्?' डॉक्टरांची चेष्टा सगळयांना त्याही परिस्थितीत दिलासा देत होती.

त्या सगळया पावसाच्या तांडवनृत्यात, त्या गडगडाटात केव्हा झोप लागली, हे समजलं पण नाही!

सकाळी उठून बघतो, तर खरोखरच सगळं स्वच्छ वातावरण! काल रात्री ढगांशिवाय दिसत नव्हतं, तर आता आकाश एकदम निरभ्र! ढगांचा थोडासा पुंजकही नाही. एवढंच नव्हे, तर एव्हरेस्टच्या मागच्या बाजून कायम धुरासारखे ढगांचे पुंजके दिसायचे, तेही आज दिसत नव्हते. निळयाशार आकाशाच्या पार्श्वभूमीवर धवल शिखरांची रांग कागदावर पेन्सिलीच्या रेघांनी काढावी, तशी सुबक, कुठंही फराटा नाही.

'मी म्हटलं नव्हतं? अरे, एस्. आर्. आहे आपल्याबरोबर!' डॉक्टर.

सगळयांनीच त्याला दुजोरा दिला नि उत्साहात आवराआवर सुरू झाली.

आज आमचा प्रवास होता - थँगबुचेपासून फेरीचेपर्यंत! म्हणजे १२६८७ फूट

उंचीवरून १४२०० फूट उंची आम्हांला गाठायची होती. बुद्धमंदिरातील बुद्धाला वंदन करून आम्ही थँगबुचे उतरायला सुरुवात केली, घनदाट जंगलातून वाट असल्यामुळं थंडगार, गारव्याच्या माऱ्यातून वाट कापणं चालू होतं.

ऱ्होडेड्रेशियाचं घनदाट जंगल. अनेक सर्पांनी एकमेकांना कवटाळावं, तशी यांची मुळं जमिनीवर पसरलेली. त्यांतूनच वाट होती.

सबनीस व मामा शिंदे झपाट्यानं पुढं गेले होते. आमची चाल आता थकल्यामुळं नव्हे, तर निसर्गसौंदर्याच्या निरीक्षणामुळं मंद झाली होती.

कुसुम कुंगरूची शिखरं मागं पडली होती व पुढं दिसत होता महाकाय अबादअलम. काय पाहावं नि काय नको ? हे समजतच नव्हतं. पॅमबुचे जसंजसं जवळ येऊ लागलं, तसतसं त्याच्या मागील एक नवीनच शिखर दिसू लागलं. 'ऑलिंपिक' गावाच्या पलीकडे नदी व त्याहीपलीकडील डोंगररांगांच्या मागून 'ऑलिंपिक' डोकावत होता.

उतारामुळं दमणूक वगैरे होत नव्हती. साडेदहाच्या सुमारास आम्ही पॅमबुचे गावात प्रवेश केला.

आधी पोचलेल्या सबनीस व मामा शिंदे यांनी यतीच्या अवशेषांबद्दलची चौकशी करून ठेवली होती. दोन वर्षांपूर्वी त्या अवशेषांची चोरी झाली होती व ते अवशेष नेपाळ देशाच्या बाहेर गेले होते. आता फक्त गुहा आहे. त्यामुळं यतीचे अवशेष नाहीत, म्हटल्यानंतर नुसतीच गुहा पाहण्यात उत्साह कुणालाच नव्हता.

थोडा वेळ विश्रांती घेऊन आम्ही फेरीचेकडे चालण्यास सुरुवात केली. आता परत चढास सुरुवात झाली होती. इथून पुढं एक गोष्ट प्रकर्षानं जाणवायला लागली, आतापर्यंतची उंच उंच दाट किर्र झाडी वनराई संपली होती व खुरटी झाडं दिसू लागली होती. झाडं जसजशी कमी होऊ लागली, तशी ऑक्सिजनच्या प्रमाणात घट होऊ लागली नि थोडं चालणंही आम्हांला कित्येक मैल चाललो, असं वाटू लागलं. आजूबाजूच्या डोंगरांवरील झाडांवरूनही त्यांच्या उंचीची कल्पना येत होती. खोल दरी असलेल्या पायथ्याशी झाडाची उंची जास्त, तर जसजशी डोंगराच्या टोकाकडे नजर जाऊ लागते, तशी झाडांची उंची कमी कमी झाल्याची दिसत होती आणि एका विशिष्ट उंचीनंतर झाडच नव्हतं. अगदी खुरटं सुद्धा!

आम्ही आता साधारणतः अशाच उंचीवर येऊन पोहोचलो होतो, की इथून पुढं आम्हांला झाडी किंवा हिरवळ हा प्रकारच आढळणार नव्हता. आता आम्हांला खुंबु ग्लॅशियरचं शेवटचं टोक दिसू लागलं होतं. एव्हरेस्टजवळील खुंबुत्सेच्या पायथ्यापासून निघालेल्या ग्लॅशियरची लांबी साधारणतः वीस कि.मी. आहे. शंभर फूट खोलीचं हे ग्लॅशियर बर्फानं भरून वाहत असेल, त्या वेळेस काय भयानक दिसत असेल, याची कल्पनाही न करणं बरं, आम्ही आता शिखरांचा पसरलेला एक समूह त्यातच सर्वांत

उंच असलेला अबादअलम! त्याच्या काही शिखरांच्या परिसरात येऊन दाखल झालो होतो.

फेरीचे गाव लांब दिसू लागलं होतं. दोन्हीकडून डोंगर व शिखरांच्या रांगा व मधोमध वाहणारं नदीचं पात्र व त्याच्याच कडेला चार-दोन घरं. तरी अजून एक, दीड किलोमीटर अंतर असेल. फक्त मुक्कामाचा टप्पा दिसला, की हायसं वाटायचं. चाल आपोआपच मंदावायची. आता मी पाहत होतो, तिथून मात्र सगळं रखरखाटासारखंच दिसत होतं. हवा कमी , झुडपं सुद्धा नाहीत. कोसळलेल्या दगडांच्या राशी, बर्फाचे ग्लॅशिअर्स... सगळं स्तब्ध, निश्चल. वाहत होती फक्त नदी आणि चालत होतो, ते आम्ही! बाकी वाहतं जीवन असं काही नव्हतंच.

'नदीच्या छोट्या पात्रावरील झुलता पूल ओलांडून आम्ही फेरीचे गावात प्रवेश केला. गाव म्हणजे चार-दोन लॉजेस्. पण एक अद्ययावत दवाखाना सुद्धा, आत्तापर्यंत खूप झाडी, देवदार वृक्ष असल्यामुळं सगळं बांधकाम लाकडी होतं, तर इथून पुढं सर्व बांधकाम दगडी! कारण लाकूड नाहीच व डोंगर, दरडी कोसळून आलेले दगड भरपूर. खुंबु खोऱ्यात आम्ही आता खूपच आत आलो होतो. चहूबाजूंनी हिमाच्छादित पर्वतराशी होतीच, पण केव्हाही ढासळतील, अशा दगडांच्या महाकाय राशी पण होत्या. थंडगार वाऱ्याच्या सपक्यातच दीडच्या सुमारास आम्ही फेरीचे येथील लॉजवर पोहोचलो. 'अबादअलम हॉटेल'! वीस रुपये कॉट प्रत्येकी.

फेरीचेमध्ये अमेरिकन डॉक्टर दांपत्यानं एक अद्ययावत दवाखाना चालवला आहे. गेली कित्येक वर्षं त्यांचा हा व्यवसाय चालू असून गिर्यारोहकांना ऐनवेळी तातडीची मेडिकल ट्रीटमेंट मिळणं म्हणजे वरदानच आहे. रोज दुपारी तीन वाजता त्या डॉक्टरांचं ट्रेकर्सना काळजी घेण्याविषयीचं सूचनावजा भाषण होत असतं, आज आमच्यासह अजून दहा-बारा पर्यटक त्या लेक्चरला हजर होते. डॉक्टरचं वय साठ-पासष्ट वर्षं. पांढरी कोरीव दाढी, चश्मा, चेहऱ्यावर आत्मविश्वास!

'बारा हजार फुटांनंतर एच्.ए.एस्.– म्हणजे हाय अल्टीट्यूड सिकनेस् सुरू होतो. ऑक्सिजनचं प्रमाण कमी असल्यामुळं मेंदूला पुरवठा कमी!' डॉक्टर सांगत होते. प्रश्न विचारून आम्हांला कितपत माहिती आहे वा नाही, हे ते बघत होते.

डॉक्टर पुढं सांगू लागले.

'एच्.ए.एस्.मुळं (हाय अल्टीट्यूड सिकनेस्) मनुष्याच्या मेंदूवर परिणाम होतो. चकरा येऊ लागणं, हातापायांचे स्नायू शिथिल होणं, हातापायांवर सूज येणं, डोकं दुखणं, कानांत दडे बसणं, एकदम चढ चढल्यास श्वासोच्छ्वासास त्रास होऊन एक्झॉस्ट होणं, अन्नाबद्दल नॉशिया येणं, पाणी थंड व अशुद्ध असल्यामुळं जुलाब, वांत्या होणं, पोट दुखणं, मळमळणं, धाप लागणं, तोल जाणं असे प्रकार होतात.'

डॉक्टरांच्या एकेका विधानाबरोबर प्रत्येकजण अस्वस्थ होत होता.

' समजा, तुम्ही पुढील मुक्कामाला गेलात नि तुमच्या सहकाऱ्याला संध्याकाळच्या

सुमारास जुलाब, वांत्या, चकरा येणं, डोकं दुखणं असा प्रकार झाल्यावर तुम्ही काय करणार? त्याला मागील मुक्कामाला आणणं जरुरीचं असतं. जास्त उंचीवरून कमी उंचीवर आणल्यानंतर पेशंटला निम्मा रिलीफ आपोआपच मिळतो. पण रात्रीची वेळ, त्यात वाट अनोळखी नि ती वाट सुद्धा डोंगराच्या कडेकपारींतून असेल, तर!

'आजारी माणसाबरोबर अजून चार-पाच माणसं व त्यांच्याजवळ बॅटऱ्या असणं आवश्यक असतं. एवढी सर्व तजवीज करावी लागणारच. नाही तर माणूस सोडावा लागणार! एकाबरोबर सगळ्यांनाही मागं यावं लागेल. कारण पेशंट व्यवस्थित झाल्यानंतरच बाकीची मंडळी निश्चिंतपणे वर जाऊ शकतील ना!

'पेशंटला जास्त चढामुळं श्वसनाचा त्रास होऊन एक्झॉस्ट होण्याची वेळ *असेल, तर त्याला ताबडतोब स्लीपिंग* बॅगमध्ये झोपवणं व विश्रांती घेणं हाच उपाय!

'हे सगळे प्रकार टाळण्यासाठी प्रत्येकानं आधीच काळजी घेणं आवश्यक असतं. पाणी उकळून व गरम पिणं, खाण्यावर ताबा ठेवणं, नॉर्मल आजाराला प्रिकॉशनरी गोळ्या असतात. त्या पण तुम्ही आधी घेऊ शकता'.

येथील दवाखान्यात असलेल्या गोळ्या मात्र फारच किमतीच्या होत्या.

'हाय ॲल्टीट्यूडला अजून एक धोका असतो. माणूस खूप चिडचिडा बनतो. किंवा कमालीचा शांत तरी होतो. चिडचिडेपणा वाढल्यामुळं एकमेकांत भांडणं सुरू होतात व जर शांत बनला, तर त्याला काय होतं आहे, हे तो बोलतच नसल्यामुळं इतरांची पंचाईत होते, तेव्हा याबाबतीत सर्वांनी संयम ठेवणं फार आवश्यक असतं.'

धोक्याच्या बऱ्याच सूचनांमुळं सर्वचजण चुळबुळ करू लागले.

डॉ. भालेरावांनी आमची ही अस्वस्थता ओळखली. त्यांनी समजावलं,

'अरे, तुम्ही घाबरता काय? मी आहे ना! हाय अल्टीट्यूड सिकनेस् बारा हजार फूट उंचीनंतर निदर्शनास येऊ लागतो. किंवा परिणाम करू लागतो. आपण आत्ताच हे लेक्चर चौदा हजार फुटांवरून ऐकतोय्. आता कुणाला त्रास होतोय् काय? सगळे फ्रेश आहेत. मग काळजी कशाची?'

संभाषण मराठीत केल्यामुळं इतर ट्रेकर्सना ते समजणं शक्यच नव्हतं.

'बारा हजार फुटांनंतर मालवाहतूक याकच्या पाठीवरूनच होतं. येथील परिस्थितीला याकशिवाय दुसरा कुठलाही प्राणी टिकत नाही. याक जर समोरून येत असेल, तर तुम्ही डोंगराच्या बाजूला यायचं. दरीच्या बाजूला गेलात, की याकच्या वळण्यात तुम्ही तळ गाठलाच म्हणून समजा! असे कित्येक अपघात दुर्दैवानं झाले आहेत.'

'मी इथं काही टीशर्टस् विक्रीला ठेवले आहेत. हे टीशर्ट घातलेल्या माणसाला अजूनपर्यंत अपघात झालेला नाही.'

डॉक्टर त्यांच्या विक्रीसाठी ठेवलेल्या टी शर्ट्सची जाहिरात करीत होते. टीशर्टस्ची किंमत रुपये पाचशे नि पुढं, इतर पर्यटकांनी टीशर्ट व मेडिसीन खरेदीसाठी

सुरुवात केली. आम्ही सर्वांनी डॉक्टरांचे आभार मानले नि लॉजवर आलो.

कुठला गोंधळ–गडबड काही नाही. स्तब्ध शांतता! आमच्या बोलण्याचाच काय तो आवाज! लॉजवर आल्यानंतर डॉक्टरांच्या सूचनांवर विचार सुरू झाले. आत्तापर्यंत आम्ही पद्धतशीर विनाअडचण इथपर्यंत पोचलो होतो. कशाचीही काळजी नव्हती. डॉक्टरांनी सांगितलेल्या धोक्यांमुळं मात्र प्रत्येकजण काळजीत पडला! म्हणजे कधी कधी अज्ञानही चांगलं असतं, असं वाटू लागलं. आम्ही त्या डॉक्टरांच्या लेक्चरला गेलोच नसतो, तर विनाकाळजी एव्हरेस्ट पायथा गाठून आलो असतो, पण आता नाही.

आता म्हणजे – काही होईल का?

कोणाला काही झालं, तर काय करायचं?

रात्रीतून परतीचा प्रवास जमेल का?

नि मग उरलेल्या प्रवासाचं काय करायचं?

याकच्या धडकेनं वा अन्य कारणानं एखादा खाली कोसळला, तर?

कोणावर अशी वेळ येऊ नये; पण आलीच, तर?

आपल्याजवळील औषधं आपल्याला पुरेशी होतील ना?

हे आणि असे प्रश्न मनात येणं साहजिकच होतं. एक तर प्रदेश अनभिज्ञ, त्यात प्रवासाच्या कुठल्याही सुविधा नाहीत. असंख्य सुविधा असूनही, छोट्या छोट्या कारणांनीही समोरचा माणूस यमपाशात शिरताना आपल्याला नेहमीच्या व्यवहारात दिसतो. इथं तर पावलोपावली धोका! तुमच्या मनाची इच्छाशक्ती नि परमेश्वराचा आशीर्वाद यांशिवाय तुम्हांला कुणी वाचवूच शकणार नाही, ही वस्तुस्थिती!

'काही काळजी करायची नाही' असं मनाला कितीही बजावलं, तरी परिस्थिती तशी वाईट नव्हती; पण आश्वासकही नव्हती. खात्रीशीर नव्हती.

भालेरावांनी त्यांच्या डॉक्टरी शब्दांत दिलासा दिला असला, तरी प्रत्येक जण पुढच्या येणाऱ्या प्रसंगाच्या काळजीत होता, हे निश्चित! भविष्याच्या पोटात नेमकं काय दडलं आहे, याचं प्रत्येकजण चित्र रेखीत होता.

प्रत्येक माणसानं जीवनात खरोखरी कसं असायला हवं, याचा प्रत्यय मी घेत होतो. आम्ही निघालो आहोत– दुर्दम्य महत्त्वाकांक्षेनं! एव्हरेस्टचा पायथा तरी गाठायचा, या उद्देशानं. त्या दिशेनं आम्ही चालतही आहोत गेले आठ-दहा दिवस. म्हणजे भूतकाळात आम्ही खूप कष्टही घेतले आहेत. पण पुढच्या भविष्याक्षणी आम्ही त्या दिशेनं जाऊच, असंही ठामपणे सांगता येत नाही. परिस्थिती आम्हांला केव्हा मागे फिरवेल, हे कळत नाही. एव्हरेस्ट पायथा ही आशा असली, तरी भविष्यकाळात ती आमच्या इच्छाशक्तीपेक्षा परिस्थितीवर अवलंबून. त्यामुळं कष्ट करूनही फळ मिळेलच, ही अपेक्षा आम्ही सोडून दिली होती.'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या गीतेच्या उक्तीप्रमाणे आमची अवस्था आपोआप झाली होती, भूतकाळ विसरलो होतो. भविष्याबद्दल खात्री नव्हती. आम्ही जगत होतो फक्त वर्तमानकाळाचा क्षण.

उद्याचा आमचा मुक्काम होता लेवुचे या गावी! अदमासे सोळा हजार फूट उंचीवरचं गाव, साडे सहा ते सात तासांचा प्रवास, रात्रीचे नऊ वाजले होते. स्लीपिंग बॅगमध्येही मी कुडकुडत होतो – म्हणजे बाहेर थंडीचा कडाका जबरदस्त असणार.

दिवस उजाडला ! तसे आम्ही आवरून एकेकजण बाहेर पडलो. दोन्ही बाजूंनी दगडराशींच्या डोंगरांच्या रांगा, औषधालाही झुडूप नाही. पाठीवर अवादअलमाची शिखरांची रांग, डाव्या हातानं व समोरही अशाच बर्फाच्छादित रांगा! एक-एक पाऊल पुढं पडत होतं. सूर्य डोंगराआडच होता. त्यामुळं तेथील वस्तीला वा आम्हांला त्याचं उगवणं झालं नव्हतं.

सूर्य डोंगराआडून बाहेर आला नि एकदम खळखळ असा पाण्याचा आवाज सुरू झाला. सूर्यकिरण जसे जमिनीवर पडले, तसं रात्री थंडीच्या कडाक्यानं पाण्याचा जो बर्फ झाला होता, त्याचं लगेच पाणी होऊन ते वाहू लागलं होतं. हे सर्व क्षणार्धात घडलं. प्रत्येक क्षणाला आम्हांला अवाक्‌च करावं, असं निसर्गानं ठरवलेलं दिसत होतं....

प्राणवायूच्या कमतरतेमुळं एक एक पाऊल सुद्धा आम्हांला जड झालं होतं. आज पहिल्या टप्प्यात सुद्धा आम्हांला जास्त भरभर चालता येत नव्हतं. प्रत्येकाची चाल मंदावली होती. पहिल्या तासाभरातच कडाक्याच्या थंडीतही थकल्यामुळं मी घामेजलो होतो.

डाव्या बाजूंची हिमशिखरं आम्हांला साथ देत होती. समोरच्या शिखरांवरून गोलाकार होऊन झालेले ग्लॅशियर सुंदरच दिसत होते. ध्यानस्थ बसलेल्या ऋषिशिष्यांप्रमाणे सर्व शिखरं एकदम शांत होती. ॐ काराचा अनाहत ध्वनी कोणत्याही क्षणी सगळीकडून उमटेल, असं वातावरण! प्रत्येक जण खाली मान घालून मार्गक्रमण करीत होता. चालताना थकवा येत असल्यामुळं बोलण्याचे श्रम कोणी घेत नव्हतं.

फेरीचेहून निघून तीन तास झाले होते. वाटेवर असलेल्या एकमेव घरात– हॉटेलात आम्ही हॉटलेमन घेत होतो. एका परातीत मक्याचे दाणे भाजून ठेवले होते, पोर्टर त्याच्या भाषेत सांगत होता, की हे चणे खात राहिल्यामुळं कानांजवळच्या नसा मोकळ्या राहून डोकं दुखत नाही. उंचीवरील हवामानात मेंदूतील शिरा आखडू शकतात व ते शरीरात कायमचा दोष निर्माण करू शकतात. त्यासाठी तोंड, घसा यांचं चलनवलन सारखं चालू राहावं, म्हणून इथं कडक चण्यांचा उपयोग करतात. विमान–प्रवासात चॉकलेट्स दिली जातात, ती याच कारणासाठी तर नव्हेत? 'आजीचा बटवा' किती सोपा उपाय. नाही तर डोकेदुखीसाठी त्या फेरीचेमधील डॉक्टरकडून १०० - १०० रु.च्या गोळ्या घ्या. त्याचे साईड इफेक्ट्स. त्यापेक्षा हे बरं, खाणंही होतं नि आजारही लांब!

आता फक्त एक चढ नि मग सपाटी व उतार! आजचा निम्मा टप्पा संपला होता. थोडा वेळ विश्रांती घेऊन निघालो नि परत एकदा आमच्या सहनशक्तीची परीक्षा

सुरू झाली. नामचेला येणारा चढ फार वरा, कारण वेळानं का होईना, ते चढता येत होता. इथं तसं नव्हतं. चढ तसाच होता; पण फरक होता ऑक्सिजनच्या कमतरतेचा! फार मुश्किलीनं जास्तीत जास्त पाच पावलं टाकली जायची. त्यानंतर पाच मिनिटं विश्रांती! असा प्रकार करीत-करीत प्रत्येकजण चालला होता. एकदा चालण्यास सुरुवात केली की, मधे बसायचं नाही. उभ्यानंच विश्रांती घ्यायची, म्हणजे पाय दुखत नाहीत. पण इथं मात्र विश्रांतीसाठी आम्हांला बसावंच लागायचं. धोका पत्करायचा नाही, दमछाक होऊ द्यायची नाही, नि शेवट तर गाठायचा! त्यामुळं कितीही वेळ लागो, आम्ही तो चढ चढणारच होतो. काही परदेशी गिर्यारोहक मात्र दोन काठ्यांच्या साहाय्यानं भराभर चढ चढत होते. त्यांच्याकडे थंड हवामान तसं कायमच! फक्त चढण जास्त होती. भारतीयांना मात्र हवामान पूर्ण उलटंच! ४०-४२ डिग्री तापमानातून एकदम मायनस् डिग्रीच्या तापमानात नि परत जीवघेणे चढ, त्यामुळं जड जात होतं.

हा चढ चढत असताना तेथील सहा-सात जणांची, स्थानिक लोकांची टोळी आमच्या मागून झपझप आली व वर गेली. थोड्या वेळानं तीच मंडळी परत खाली आली व आमच्या थोडं खाली जाऊन परत वर येऊ लागली. आत्तापर्यंत कधी भीती वाटली नव्हती. पण आता मात्र मनात शंका येऊ लागली. आपल्याला लुटण्याचा जर प्रकार यांनी केला, तर कोणी प्रतिकार करूच शकत नव्हतं नि त्या निर्जन प्रदेशात मदतीलाही कुणी येणार नव्हतं. कारण या लोकांना येथील चढ-उतारांचा चांगलाच सराव होता. आमच्यापैकी प्रत्येक जण शंका घेतच चालत होता. नंतर नंतर दिसू लागलं, की, ते आमचं निरीक्षण करीत होते. आमच्यापैकी कोणाची दमछाक होतेय् काय? कुणाला सामान नेण्यासाठी मदत लागेल काय? तेवढीच मजुरी मिळू शकेल. या लोकांचा हा व्यवसायही असावा. कारण काल फेरीचे येथील डॉक्टरांनी सांगितलं होतं की, पेशंट वरून खाली आणण्यासाठी त्याला उचलून आणावं लागतं. मग पाच-सहा व्यक्ती लागणारच! त्यामुळं आमच्यापैकी कुणाची दमणूक होऊन, त्याला मदत लागतेय् काय, याचं ते निरीक्षण करीत असावेत.

आम्ही उगाचच त्या स्थानिक लोकांबद्दल शंका घेतली, असं वाटू लागलं. वास्तविक या सर्वांची गुजराण पर्यटकांवरच अवलंबून! त्यामुळं ती सोन्याची अंडी देणारी कोंबडी कापतील, असं वाटत नाही. पण आमच्यासारख्या शहरी जीवनास या फालतू शंका येणारच! तेथील नेपाळ सरकारनंही व स्थानिक रहिवाशांनीही या पर्यटकांस पूर्ण संरक्षण दिलेलं आहे. गेले आठ-दहा दिवस आम्ही पाहत आहोत, आम्ही कुठंही हिंडत असलो, तरी एखादी वस्तू जाणं, गहाळ होणं असं झालेलंच नाही. इतकी सुरक्षितता इथं आहे.

जसजसा चढ संपत आला व आमच्यापैकी एकाचीही दमछाक होणार नाही, असं दिसू लागताच, ती सर्व मंडळी खाली उतरून दिसेनाशी झाली. चढ- चढण्यात आम्ही कसेबसे यशस्वी झालो. वरती सात-आठ थडगी होती. चढ चढताना वा इतर

कारणांनी मृत्यू पावलेले गिर्यारोहक विश्रांती घेत होते.

त्यानंतर मग सुरू झाला होता उतार! उतार नदीच्या दरडीवरून होता. नंतर नदीच्या पात्रातील दगडादगडांतून वाट! समोरच्या नदीजवळ आम्ही जाऊ लागलो, पाहतो, तर ती नदी वाहतच नव्हती. संपूर्ण नदी हिममय! हिमनदीच प्रत्यक्षात समोर! डोंगरातून नदीला मिळणारे ओहोळही हिमाचेच! हिमनदीचं दर्शन प्रथमच होत होतं. फेरीचे सोडल्यापासून डोळयाला काळा गॉगल लावला होता. त्यातूनही त्या सर्व हिमथरांकडे पाहणं कठीण होत होतं. अवघड जात होतं. एवढी प्रखरता त्या परावर्तित सूर्यकिरणांत होती. गॉगल काढला, की डोळे दिपून जायचे. कारण जिकडे पाहाल, तिकडे बर्फच बर्फ! नि त्यावरून येणारे किरण! त्यामुळं आता पाहताना बर्फ टाळून पाहावं लागायचं.

अप्रूपता संपल्यावर आम्ही हिमनदी ओलांडून अलीकडील तीरावर आलो. दुपारचा एक वाजला होता दूरवर लेबूचे दिसू लागलं होतं. मुक्काम टप्प्यावर आल्यामुळं आधीच्च हळू असलेल्या चाली अजून मंदावल्या. किशोरचं स्वागत स्वीकारत प्रत्येकानं आपआपली जागा घेतली होती. सॅकमधील आवश्यक सामान काढण्यास सुरुवात केली होती. काही विश्रांतीसाठी पहुडले होते.

अचानक तेथील वातावरण बदलू लागलं. सर्व परिसर झाकाळून गेला नि क्षणात पाऊस सुरू झाला, पण पाण्याचा नाही, बर्फाचा! हिमवर्षाव सुरू झाला होता; आम्ही वाटेत असताना हिमवर्षाव सुरू झाला असता, तर आमची त्रेधाच उडाली असती! पण आम्ही येऊन विसावतो काय नि काही क्षणांत हिमवर्षाव सुरू होतो काय? बरं, पावसाची म्हणा किंवा हिमवर्षावाची तशी काही चिन्हंही दिसत नव्हती.

हिमस्नानाची मजा लुटण्यासाठी आम्ही लगेच फीदरकोट व त्यावरून रेनकोट घातले. हे सर्व होऊन बाहेर येईपर्यंत पाहतो, तो काय संपूर्ण परिसर पांढराशुभ्र झालेला! कापूस पिंजून उडणाऱ्या तंतूप्रमाणे मऊशार व हळूवार असे पांढरे शुभ्र हिमकण पडत होते. त्या बर्फाचा स्पर्श, लुसलुशीत मऊ अशा सशाप्रमाणे होत होता. त्या हिमवर्षावानं अशी एकही जागा सोडली नव्हती, की जिथं बर्फ साचला नव्हता. डोंगरदऱ्या-घरं-रस्ते-तंबू-याक, या सर्वांना एकच रंग आलेला ! पवित्र धवल रंग. हिमालय हे नाव सार्थक करणारं हिम सगळीकडे दिसू लागलं. आम्ही सर्वच आनंदानं, उत्साहानं, या मिळालेल्या दुर्मीळ अनुभवानं बेभान झालो होतो.

रेनकोटवर पडणाऱ्या हिमतुषारांच्या आवाजाखेरीज दुसरा आवाज नव्हता.

'तुम्ही माझ्याजवळ आला आहात ना, मग मी माझ्या जवळचा खजिना का म्हणून झाकून ठेवू? बघा! अगदी दिलखुलासपणे मजा करा, अनमान करू नका, मी माझ्याजवळची प्रत्येक गोष्ट न् गोष्ट तुमच्यापुढं उघडी करतोय्. तुम्ही फक्त त्याचा आस्वाद घ्या.'

हिमवर्षावातून हिमालय आपलं गुपित जणू आमच्या कानात सांगत होता.

मुलानं पहिलंवहिलं एक पाऊल टाकलं, की आई ज्या कौतुकानं पळत-पळत जाऊन त्याला कुशीत घेते, तसंच निसर्गासमोर एक पाऊल जर तुम्ही टाकलं, तर तो धावत-धावत सर्वच तुमच्या भोवती पसरतो. फांदीवरील एक फूल घेण्यासाठी फांदी वाकवली, तर तेवढंच फूल नाही पुढं येत, तर संपूर्ण फांदीवरची फुलंच तुमच्याकडे झुकून जणू सांगतात, की त्या एकाच फुलानं नाही समाधान झालं, तर आम्हीही आहोतच हं!

असंच काहीसं या हिमालयाच्या कुशीत होऊ लागलं होतं. आमचं सर्वस्व जे आहे, ते तुम्हांला अर्पण आहे. या आणि आम्हांस कृतकृत्य करा. आमच्या खजिन्याच्या पायघड्या आम्ही तुमच्या पायांशी घालतो आहोत. तुम्हांला चालताना दगडांचं जाजम रुतेल, म्हणूनच त्यावर हा हिमाचा मऊशार गालिचा अंथरतो आहोत! फक्त तुम्ही आमच्याजवळ या! आमच्याशी झोंबत हिमालयातून वाहणारा गार वारा हिमालयाचा निरोप आम्हांला देत होता.

काळया ढगांचे थवेच्या थवे वेगात जात होते. संपूर्ण परिसर त्या काळया ढगांनी भरलेला, तर खाली पृथ्वी हिमाचं पूर्ण पांढरंशुभ्र वस्त्र ल्यालेली! हिमवर्षावाच्या सरींचा मधे अंतरपाट! उतरणीला लागलेल्या सूर्याच्या किरणांचे झोत ढगाच्या कडा प्रकाशमान करीत खाली सर्व मंडप उजाळून टाकत होते. आजूबाजूचे डोंगर साक्षीला आलेल्या देवाब्राह्मणांप्रमाणे धरती आकाशाचं स्वयंवर न्याहळत होते. श्यामवर्णी आकाश व गौरकाय राधा म्हणजे धरती यांचं मीलन याचि देही याचि डोळा मी पाहत होतो व त्या स्वयंवराच्या मीलनाच्या आनंदात सहभागी होत नाचत होतो, बागडत होतो.

हिमस्नान मी प्रथमच अनुभवत होतो. त्यामुळं जास्त वेळ बाहेरच होतो.

तेवढ्यात सवनीसचा आवाज आला.

'ए, चला आत. आजारी पडायचंय् का? आँ? काही कळतं, की नाही?'

त्याच्या करड्या आवाजानं आत जावंच लागलं. सर्व झाकाळून आल्यामुळं आत अंधारच होता. आतील भट्टीपाशी गप्पांची मैफल सुरू झाली. बाहेर हिमवर्षाव चालूच होता, उद्या पुढं जाता येईल, की नाही, यावर विचार-विनिमय सुरू झाला. एकीकडे अंधूक प्रकाशातही पत्त्यांचा डाव पडला होता.

हिमवर्षाव बंद झाला, तसे मी, किशोर व राम चव्हाण बाहेर पडलो. संध्यासमयीचे सूर्यकिरण शिखरांना सोन्याचा मुलामा देत होते. चंद्रही आकाशात विलसत होता. तोही मावळतीलाच झुकला होता. थोड्या वेळापूर्वी काळया मेघांनी दाटलेलं आकाश निळी दुलई पांघरावयास घेत होतं. मेघाआडून येणारे सूर्यकिरणांचे झोत विलक्षण मोहक दिसत होते. बर्फावरून चालताना येणारी मौज काही औरच होती. एका पडवीत चार-पाच याक उभे होते. त्यांच्या पाठीही हिमानं पूर्ण पांढऱ्या झाल्या होत्या.

दिसणारं प्रत्येक दृश्य कॅमेऱ्यात टिपण्याचा प्रयत्न करीत होतो. पण एकंदरीत

आम्ही जे अनुभवत होतो, पाहत होतो, ते पूर्ण कॅमेऱ्यातून टिपणं अशक्यच होतं. हे सर्व टिपण्यास व्हीडीओ कॅमेराच हवा!

नेहमीप्रमाणे साडे सहा– सातपर्यंत जेवणं आटोपली. उद्या सकाळच्या परिस्थितीवर पुढं जायचं अवलंबून होतं. एक तर पुढची वाट माहिती नव्हती व दगडावरील बर्फामुळं पाय घसरण्याची शक्यता असते. त्यामुळं हिमवर्षाव असाच चालू राहिला, तर पुढं जायचं नाही, असा निर्णय घेण्यात आला. गप्पाटप्पांत साडेआठ वाजले होते. झोप तर येत नव्हती. मग वेळ बाहेर पडलो. किर्रर्र अंधार. चंद्रही मावळला होता. दोन-तीन घरांतून येणारा दिव्याचा चोरटा प्रकाश सोडला, तर उजेडच नव्हता. आकाश मात्र पूर्ण निरभ्र होऊन, चांदण्याचं वस्त्र अंगावर घेऊन आलं होतं. खडी केलेलं वस्त्र उंच उचलून धरल्यावर जसं दिसेल, तसं चहूबाजूंनी डोंगराच्या कडांवर ताणून ठोकून बसवलेलं आकाशाचं वस्त्र व त्या वस्त्रावर चांदण्याच्या खडीची नक्षी! चहूबाजूंनी डोंगर असल्यामुळं मर्यादित दिसणारं आकाश खूपच खाली झुकलंय्, असं वाटत होतं. तारका, चांदण्यांचं टपोरेपण तर विशेष जाणवत होतं; नि ते इतकं जवळ वाटत होतं, की सहज हात उंच करून एखादं चांदणीचं फूल तोडावं नि एखाद्या युवतीच्या कुंतलात माळावं. हिमवर्षावानं वातावरणात थंडीचा कडाका जबरदस्त वाढला होता. उद्या काय? याचा विचार करीत डोळे मिटू लागलो.

सकाळी जाग आली, तर हिमवर्षाव चालू होता. काल दुपारी एक वाजता आकाश निरभ्र, तर तीनला पूर्ण मेघाच्छादित! रात्री नऊला पुनः निरभ्र, तर रात्रीतून कधी तरी हिमवर्षाव व्हावा, अशी स्थिती! निसर्ग आपला लहरीपणा आम्हांला दाखवत होता.

हिमवर्षाव होत असल्यामुळं आज इथंच थांबण्याचा निर्णय पक्का झाला होता. पण दिवस नुसता बसून काढणं सबनीसला मान्य नव्हतं. मग आहे त्या परिस्थितीत पुढच्या मुक्कामाच्या म्हणजे गोरक्षेपच्या वाटेवर जितकं चालत जाता येईल, तितकं जायचं व परत यायचं, असं ठरलं. त्यानं सर्वांना तयार होऊन निघण्याचा आदेश दिला. मला व दीपकला तयार होण्यास जरा वेळ लागला. तोपर्यंत बाकीचे बाहेर पडून चालायलाही लागले होते. आम्ही दोघे बाहेर पडेपर्यंत तर सर्व नजरेआड झालेले होते. आम्ही गोरक्षेपच्या दिशेनं निघालो. हिमवर्षाव व त्याचबरोबर वाहता वारा यांमुळं चालणं जरा जिकिरीचंच जात होतं. त्या मऊ हिमतुषारांचा सपकाही चेहऱ्यावर आघात करीत होता. बराच वेळ चालूनही पुढं गेलेली मंडळी आम्हांला दिसेनात व चालण्याचाही त्रास होत होता. तेव्हा आम्ही दोघांनी परतण्याचा निर्णय घेतला व लॉजवर आलो. वीस-पंचवीस मिनिटांत पुढं गेलेलीही मंडळी पण आली. पण आमची भेट न झाल्यामुळं सबनीस जाम चिडला होता. आम्ही लॉजमधून बाहेर पडलोच नाही, असा त्याचा

गैरसमज होणं साहजिकच होतं.

'काय, रे गधड्यांनो, इथं मजा मारायला आला काय?'

'तुम्ही दोघे का नाही आलात?'

सवनीस आमच्यावर बरसला.

अरे, आलो होतो. तुम्ही बराच वेळ दिसला नाहीत, तेव्हा परत आलो.' मी त्याला स्पष्टीकरण देत होतो.

'सवन्या, अरे, आम्ही कशाला खोटं बोलू?' दीपक वैतागला.

'मला शिकवता काय? आम्ही सगळे काय मूर्ख म्हणून गेलो होतो बाहेर?'

सवनीस ऐकायला तयार नव्हता. दीपकही थांबेना! शब्दानं शब्द वाढत होता.

'आधी बाहेर तुम्ही दोघे एक तास फिरून या. नाही तर उद्यापासून आमच्यावरोबर पुढं यायचं नाही. सरळ परतीचा मार्ग धरायचा!' सवनीसनं निर्वाणीचा इशारा दिला.

दीपक धुमसू लागला होता. एवढं सगळं सांगून विश्वास बसत नव्हता, याचा त्याला राग येऊ लागला होता. त्याला कसं तरी बाहेर काढलं. दोघं फेरीचेच्या वाटेनं चालत निघालो. दीपकची चिडचिड चालूच होती. तो बोलून दाखवत होता व माझ्या स्वभावामुळं मला ते जमत नव्हतं, एवढंच! ह्या परप्रदेशात निर्वाणीच्या वेळेस वाद-विवाद वाढू नये, एवढंच मी पाहत होतो.

बराच वेळ धुसफूस चालल्यानंतर दीपक म्हणाला,

'आपण समोरच्या डोंगरावर जाऊ या.'

मी पाहिलं, तर तिथं जाण्यास ना वाट, ना काही पावलं टाकायला व्यवस्थित जागा.

मी म्हटलं,

'अरे, नको. वाट नाही, सगळी ओवडधोवड दगडं, त्यांवर बर्फ. तेव्हा नसता धोका नको.'

पण तो हट्टाला पेटला होता. सवनीसवरचा राग त्या थंड बर्फातही त्याला पेटवत होता.

मग मीही तयार झालो.

आम्ही आता असा डोंगर चढू लागलो, की जिथं कशासाठी कुणी जाण्याचं प्रयोजनच नसल्यामुळं वाटच नव्हती. डोंगर म्हणजे दगडांचीच पूर्ण रास असल्यामुळं कुठला दगड केव्हा घसरेल, हे सांगता येत नव्हतं. पण आता जिद्दीलाच पेटल्यामुळं आम्ही दोघेही या प्रकाराकडे बघतच नव्हतो.

'परशुराम, आपण खालचे लोक वर येईपर्यंत बालेकिल्ला बघून येऊ.' मी

परशुराम जाधवला म्हणत होतो.

२६ जाने., १९८० नसरापूरला ऑफिससमोर झेंडावंदन झाल्यावर राजगडावर जायचा कार्यक्रम आयोजित केला होता. आमचे कार्यकारी अभियंता आंबेकर! कुलकर्णी, पेंडसे तेथील स्थानिक नाना ताम्हणकर, परशुराम जाधव व मी असे आठ-दहा जण होतो. सगळयांत तरुण मी व जाधव आम्ही दोघे झटक्यात राजगड चढलो होतो. बाकीचे खूपच सावकाश येत होते. मग त्यांच्यापेक्षा एक गोष्ट जास्तच करायची, म्हणून मी बालेकिल्ला बघून येऊ, असे परशुरामला म्हणत होतो.

त्यानंही लगेच ती कल्पना उचलून धरली. आम्ही बालेकिल्ला बघून परत खाली येत होतो. त्या वेळेस ही बाकीची मंडळी राजगडावर येत होती. ते राजगडावर आल्यानंतर त्यांनी बालेकिल्ल्यावर जायचं ठरवलं.

आंबेकर म्हणाले,

'मी इथंच जरा विश्रांती घेतो... कुलकर्णी, जाधव इथं थांबतील...'

आता परत माझ्या डोक्यात विचारपूर्वक सुरू झालं. इतरांपेक्षा एक गोष्ट जास्त करायचं आपण ठरवलं. पण आता हे सर्व बालेकिल्लाही चढणार. मग आपण काय करायचं? आंबेकरांना डोळा लागला होता. समोर पाण्याचं प्रचंड तळं होतं. मी परशुरामला म्हटलं,

'परशुराम आपण एक गोष्ट सर्वांपेक्षा जास्त करायचीय्, आपण पोहायचं का?'

त्यालाही कल्पना आवडली, दोघांनी कपडे काढले व अंडरपँटवर मागचा पुढचा, कुठलाही विचार न करता दणादण उड्या टाकल्या होत्या.

पाणी वरच्या थरावर जरा बरं होतं. पण आम्ही उड्या टाकल्या तो थेट खाली गेलो आणि ते साठलेलं पाणी इतकं थंडगार होतं की, आम्हांला हातपायच हालवता येईनात! हातपाय लाकडासारखे कडक होऊन, आखडून गेले होते. उसळीसरशी आम्ही कसेबसे वर आलो व काठ गाठला.

आमच्या उड्यांचा आवाज ऐकून एव्हाना तेथील वॉचमन धावून आले.

आंबेकर दचकून जागे झाले. वॉचमननं आम्हांला झापडायला सुरुवात केली.

'अरे, काय, राव? आमची नोकरी का घालवताय्? इथं या तळयात दरसाल एक-दोन बळी जातातच! आज तुमचा नंबर होता, असं दिसतंय्!'

मला त्याचं म्हणणं पटलं होतं. आम्हांला हातपाय हालवता येईनात. त्या वेळेस आमचा काळ आला होता; पण वेळ आली नव्हती, असं दिसतंय्!

आजही दीपक व मी अशाच न रुळलेल्या वाटेनं जात होतो. पाय ठेवता येईल, तिथं पाय ठेवायचा नि पुढं चढायचं, असं करीत-करीत आम्ही वरच्या टोकावर आलो. नि परत एकदा अवाक होण्याचा प्रसंग आमच्यावर आला. डोंगराच्या पलीकडे चक्क ग्लॅशियरचा मार्ग होता. तर ग्लॅशियरच्या पलीकडच्या काठावर अबादअलमच्या

जवळील हिमशिखरांची रांगच्या रांग पसरली होती. पूर्ण दृश्यच महाकाय होतं. सवनीस चिडला नसता, तर आम्ही रागानं बाहेर पडलो नसतो व जिद्दीनं अशा माहीत नसलेल्या, वाटा नसलेल्या डोंगरावर चढलो नसतो व मग आम्ही हे सुंदर, महाकाय दृश्य पाहावयास मुकलो असतो. आता असंच म्हणायचं ना की, जे होतं, ते भल्यासाठी, म्हणून थंडगार वाऱ्याचे सपके खातच डोंगर उतरू लागलो.

'मग! आता कस वाटतं ? चुकारपणा करता काय, गाढवांनो ?' लॉजवर आल्या आल्या सवनीसनं चेष्टेच्या सुरात विचारलं.

'अरे, सवन्या, खरंच आम्ही सकाळी तुमच्या मागे आलो होतो. पण जाऊ दे, तुझ्या म्हणण्याप्रमाणे जाऊन आलो ना आता!' दीपक चिडचिडत--सवनीसला एक्टा दीपकच सवन्या म्हणायचा.

आज दिवसभर काही उद्योगच नव्हता. पत्ते, गप्पा नि झोप!

डॉ. भालेरावांनी लिहिलेलं आतापर्यंचं प्रवासवर्णन वाचण्याचा कार्यक्रम झाला. डॉक्टरांची चिकाटी जबरदस्त होती. मी सुरुवातीला लिहिण्याचा उत्साह दाखविला, पण नंतर तो हळूहळू केव्हा मावळला, ते समजलं नाही. सगळं लक्षात ठेवायचं नि नंतर एकदम लिहायचं– असा थोडासा स्वतःलाच दिलासा!

गप्पा मारता-मारता मी डॉक्टर भालेरावांना विचारलं,

'डॉक्टर, तुम्हांला लिखाणाबाबत मानलंच पाहिजे हं.' माझं मत.

'अरे, एस्. आर्, तुझा हा पहिलाच ट्रेक आहे, म्हणून! नाही तर तू आम्हांला लिहू देणार आहेस, होय ?' डॉक्टर भालेरावांचं उत्तर!

'नाही, पण तुम्हांला ही सवय लागली कशी ? तुमचा व्यवसाय डॉक्टरकीचा. आवड अशा गिर्यारोहणाची आणि त्यातही टाईम टु टाईम नोंद करत राहणं म्हणजे अवघडच.' माझी शंका मी बोलून दाखवली.

'बरं का, एस्. आर्, डॉक्टरांचा जो टिंगरेनगरला दवाखाना आहे, ना, तिथं एक क्लब आहे. 'महाराष्ट्र माऊटेनीअरिंग अँड अलाईड स्पोर्ट्स क्लब!' त्याचे डॉक्टर आजीव सदस्य आहेत.'

किशोर येरवड्यालाच राहत असल्यामुळं त्याला डॉक्टरांची बरीच माहिती होती.

'दरवर्षी त्या क्लबची एक तरी मोहीम असतेच असते व डॉक्टर दरवर्षी जातातच'.

'त्याचं काय ऐकतो, एस्. आर् ? मी आपला लहान माणूस! किशोरसारखा थोडासा मानससरोवर पाहून आलोय्! अरे, दरवर्षी एक महिना दवाखान्याला सुटीच द्यावी लागते... नि आता कधी टूर जर उशिरा असेल ना, तर पेशंटच विचारतात,- डॉक्टर, या वेळेस टूर दिसत नाही, वाटतं ? नि लोकांनाही मग टूर किंवा ट्रेकिंग करून

आलो, की मग स्लाईड्स् व वर्णन सांगणं हे मलाच करावं लागतं. नि त्यातून मला प्रत्येक नोंद ठेवण्याची सवयच लागली.'

'गेल्या वर्षी डॉक्टर मनाली ट्रेकला गेले होते. त्याच्या स्लाईड्स फारच सुंदर आल्या आहेत.' किशोर माहिती पुरवत होता.

'गेल्या वर्षी मनाली-रोहंतारा पास-बियास कुंड हा ट्रेक आम्ही पंधरा दिवसांत पूर्ण केला. अरे, बियासकुंडचा परिसर पाहणं म्हणजे अवर्णनीय आनंदच! अरे, तिथून जवळच असलेल्या 'मनीकरण' येथील कुंडात चक्क उकळतं पाणी, भात व बटाटे शिजून निघायचे.' डॉक्टरांनी माहिती दिली. 'पण, एस्. आर्, तुला तो मनाली ट्रेक म्हणजे किस झाडकी पत्ती, अरे, पहिल्याच ट्रेकला तू इथं एव्हरेस्टला येतोयेस्, म्हणजे चेष्टा नाही.'

डॉक्टरांची वेव्हलेंथ सगळयांशी चांगलीच जमली होती.

मग पत्त्यांचे दोन डाव पडले. बदामसातला एकमेकांच्या फिरक्यांनी जास्त खुमारी येऊ लागली होती.

पत्त्यांचा कंटाळा येऊ लागला, तसा एकएक जण आरामासाठी बेड गाठू लागला होता.

दुपारी कधी तरी स्विझर्लंडचे दोन ट्रेकर्स आले. गप्पांच्या ओघात कळलं, की ते एव्हरेस्ट चढण्यासाठी एव्हरेस्ट बेसला कँप देऊन आले आहेत. त्यांचा इंटरकॉम पॅनेल बिघडला होता व तो आता दुरुस्त कसा होईल, या चिंतेत ते होते.

सबनीस टेस्टिंगला होताच. त्यामुळं तो म्हणाला,

'आम्ही परवाच्या दिवशी बेस कॅम्पला येणार आहोत. त्या वेळेस जमलं, तर पॅनल दुरुस्त करून देऊ.'

त्या ट्रेकर्सना या आश्वासनामुळं आनंद वाटला. त्यांनी लगेच येण्याचं आमंत्रण सुद्धा दिलं.

हिमवर्षावामुळं लोबुचेचा मुक्काम वाढला होता. दुपारी जसं ऊन पडलं, तसं बर्फ वितळू लागलं होतं. काही वेळातच जादूची कांडी फिरावी, तशी स्थिती पूर्ववत झाली. शिखरांवरील बर्फाशिवाय बाकीचं बर्फ द्रवरूप झालं होतं. उद्या सकाळी कशीही परिस्थिती असली, तरी पहाटे पाचला आम्ही निघणार होतो.

उद्या आमचा शेवटचा मुक्काम होता. उद्या आम्ही एव्हरेस्टच्या सागरमाथ्याच्या अगदी जवळ जाणार होतो. जगातील सर्वांत उंच असलेल्या पर्वतराशीजवळ आम्ही पोचणार होतो. त्यामुळं मनात प्रचंड उत्सुकता होती. नियतीनं काय वाढून ठेवलं असेल? नियती निष्ठुर आणि क्रूर असते, असं कुठं तरी वाचलं होतं, त्याची अचानक आठवण झाली. मनात कुतूहल होतं आणि एक अनामिक अशी भीतीही वाटत होती. मनात भावनांचा विचारांचा कल्लोळ उठला.

निसर्गाची काय किमया असेल?

उद्या कुठला खजिना आमच्यासमोर खुला होणार आहे?

जे जे काही समोर येत होतं, ते कल्पनातीतच असल्यामुळं कल्पनेच्या भराऱ्या मारण्यात काहीच अर्थ नव्हता.

परमेश्वराजवळ फक्त प्रार्थना करीत होतो, की

'देवा, आत्तापर्यंत तुझ्या आशीर्वादावरच आम्ही इथवर आलो आहोत. तुझ्या निसर्गानंही आम्हांला साथच दिली आहे. ती साथ अजून एक- दोन दिवस तशीच असू दे! एवढीच तुझ्याकडे प्रार्थना!'

झोपेतही हुरहुर जाणवत होती; नि अशा अर्धवट झोपेतच पहाटेचे चार वाजले. थोड्याच वेळात शेवटच्या टप्प्यासाठी सुरुवात होणार होती. हाय ॲल्टीट्यूडमुळं आमचा एक पोर्टरच आजारी पडला होता. त्यामुळं एकच पोर्टर पुढं येणार होता व त्याला घेता येईल, तेवढंच सामान!

पहाटेची वेळ असली, तरी बर्फराशीमुळं थोडा प्रकाशही खूप वाटत होता. पाचलाच मार्गक्रमण सुरू झालं.

आज आमचा प्रवास होता लोबचेपासून गोरक्षेपपर्यंत! १६१५० फुटांवरून आज १७०६० गाठायचं व नंतर तेथून काला पत्थर म्हणजे १८१९२ फुटांवरून एव्हरेस्टचं दर्शन घ्यायचं व मुक्कामाला परत गोरक्षेपला यायचं! आज सबनीस व मामा शिंदे फारच झपाट्यात पुढं निघाले होते. मागोमाग मी व राम चव्हाण! त्यानंतर बाकीचे. सर्वांत शेवटी होता किशोर! आजचा मार्ग होता दगडांच्या राशींतून! ढासळलेले मोठमोठे डोंगर, कडे-कपाऱ्या व त्यांतून ही पायवाट! चढ-उतार तर सारखे चालूच होते. पण आता त्यांची सवय झाली होती.

एव्हरेस्टजवळ नेणारा शेवटचा टप्पा. उत्सुकता शिगेला पोहोचली होती. जबरदस्त हुरहुर. परीक्षेचे पेपर्स सुरू होण्याच्या आधीचे क्षण जसे असतात, तसे.

खाली मान घालून वाटचाल चालू होती. मधे एका ठिकाणी छोटीशी पाण्याची घळ होती. दगडांवरून उड्या मारीतच ती घळ ओलांडावी लागत होती. आज माझीही चाल जरा वेगात सुरू झाली होती. मावळतीला गुरं, पशुपक्षी, आपलं कुणी तरी घरट्यात वाट बघतंयृ, या भावनेनं, घरच्या ओढीनं धावत्या पावलांनी परतत असतात, तसा माझ्याही पावलांचा वेग कुणाच्या तरी ओढीनं, कुठल्या तरी अनामिक संकेतानं वाढला होता. अन्यथा आतापर्यंत सदोदित मागे असणारा मी सबनीसच्या मागोमाग आणि रामबरोबर चालतो आहे, म्हणजे आश्चर्यच नव्हे काय?

माझी ही मनःस्थिती मी कुणालाच सांगू शकत नव्हतो. कोणाबद्दल ही ओढ होती? मी सुद्धा समजू शकत नव्हतो. एव्हरेस्ट हे तर नुसतं निमित्तच. त्याच्या रूपानं मला कुणी तरी भेटणार आहे, दर्शन देणार आहे.

रामची पावलं माझ्याबरोबर पडत होती, की माझी पावलं त्याच्याबरोबर?

कधी एकदा गोरक्षेप येतंय् व कधी मी काला पत्थर पठारावर जातोयू, असं झालं होतं. आता त्या भेटीच्या क्षणाच्यामधे कुठलेच क्षण नको, असं वाटू लागलं.

आठ वाजता मी गोरक्षेप गाठलं. सबनीस, शिंदे साडेसातलाच पोचले होते. आम्ही आल्याचं पाहताच आम्हांला मागून या, असं सांगून लगेच काला पत्थरच्या दिशेनं निघाले सुद्धा!

मागचे चौघेजण येईपर्यंत बाहेरच एका दगडावर बसून मी व राम समोरचं दृश्य पाहत होतो. दुर्बीण जवळच होती. समोर सपाट मैदान होतं. मैदान म्हणजे नेहमीचं तळं असावं, पण सध्या पाऊस नसल्यानं मैदानासारखं. डाव्या बाजूला उंच गेलेला काळ्या पठाराचा भाग दिसत होता. इतर काही ट्रेकर्सबरोबर सबनीस व शिंदे चढताना दिसत होते. प्युमोरी, लिंग्ट्रेनची शिखरं पठाराच्या मागून डोकावत होती. तर अगदी समोर दिसत होता खुंबुत्से व त्याचा ग्लॅशियर! उजव्या हाताला दिसत होते लुत्से, नुत्से व तशीच शिखरांची रांग अबादअलमला जोडून थेट थॅमसेस्कुपर्यंत आलेली होती. लुत्सेच्या मागून डोकावत होता एव्हरेस्ट–सर्वांचा राजा.

आकाश पूर्ण निरभ्र होतं. आम्ही लुक्लाला उतरल्यापासून मधील एक दिवस सोडला, तर रोज आकाश स्वच्छ! बदल व्हायचे, ते साधारणतः दुपारी दोन-तीनच्या पुढं! सकाळी परत स्वच्छ, चकचकीत वाटायचं.

इथं गोरक्षेपला पाणी व जेवण चांगलं मिळत नाही, असं कळलं होतं. मोहिमेच्या शेवटच्या टप्प्याचे दोनच दिवस राहिले होते. आज व उद्या! आज काला पत्थर, तर उद्या बेस कॅम्प, आयुष्यातल्या अवर्णनीय आनंदाच्या संधीचे दोन दिवस मला गमवायचे नव्हते. म्हणून माझा मी स्वतःशीच निर्णय घेतला होता, की इथलं काही खायचं नाही वा थंड पाणीही घ्यायचं नाही. कसेही जाऊ देत, कितीही त्रास होऊ देत, पण हे दोन दिवस असेच ढकलायचे! कारण प्रकृतीवर परिणाम झाला, तर हाताशी आलेले आनंदाचे क्षण जायचे व कायमची हुरहुर मात्र मागे ठेवायचे.

माझा निर्णय मी कोणाजवळही बोलून दाखवला नाही.

लोबुचेहून गोरक्षेपला येईपर्यंत दीपक आजारी पडला होता. त्यामुळं काळा पठार चढण्याचा त्याला कोणी आग्रह केला नाही. सबनीस- शिंदे आधीच पुढं गेले होते. त्यामुळं उरलेलो आम्ही पाचजण काळ्या पठारावर निघालो. सॅक्स् लॉजवरच ठेवल्या होत्या. बरोबर होते फक्त कॅमेरे! खाण्याचे काही पदार्थ पोर्टरजवळ!

सोपा भासणारा काळा पठारही आपली चुणूक दाखवू लागला होता. गोरक्षेपपासून दिसणारं टोक शेवटचं नव्हतंच. त्या पठाराला वळसा घालून पुढं जातो, तर अजून एक उंच पठार व त्यापुढंही तसंच उंच पठार! आज सकाळी पाचपासून आम्ही चालत होतो. मधला अर्धा तास सोडला, तर गेले सहा तास चालणं चालूच होतं. साडे अकरा वाजले होते. अजून कमीत कमी दोन तास लागतील शेवटचं टोक

गाठायला! आलेला जबरदस्त थकवा मनाची द्विधा मन:स्थिती करू लागला होता.

आता इथपर्यंत तर आलोय् ना! इथून जे दिसतं, ते पाहायचं नि परतायचं. एक मन म्हणू लागलं.

इथं, इतक्या लांब हजारो मैलांवरून तू आलास नि आता शेवटच्या दोन तासांच्या पायपिटीसाठी मागं फिरतोयूस! परत असा कधी योग येईल का?– दुसरं मन.

अरे, पण इथं एक पाऊलही पुढं टाकणं मुश्किल झालं आहे. क्षमता जवळजवळ संपलीयू. –पहिलं मन कुरकुरतच होतं.

मी व राम बरोबरच होतो. मागे पाहिलं. किशोर थोडा मागेच होता. पण मोरे नि डॉक्टर खूपच खाली होते.

हे बघ, ती मंडळी येऊन तुला भेटेपर्यंत जितकं चढता येईल, तितकं चढ. मग बघू काय करायचं, ते!

दुसऱ्या मनाचा सल्ला ऐकला. एक एक पाऊल पुढं पडू लागलं. इथून पुढं सर्व काळया दगडांचा थर होता. वाट नव्हतीच. ज्याला जसं जमेल, तसं त्यानं वरच्या टोकाकडे जायचं. काल मी व दीपक माहीत नसलेल्या डोंगरावर गेलो होतो. तशाच तऱ्हेनं इथं वाट काढावी लागत होती. जसजसे आम्ही वर जात होतो, तसतसा वाऱ्याचा जोर जाणवू लागला होता. थंडगार वारे अंगाला झोंबत होते. दमछाक चालूच होती. मागची मंडळी यावी, म्हणून वाट पाहत होतो. पण ते अजून नजरेच्या टप्प्यातही आले नव्हते. राम चव्हाण काही फुटांवर पुढं, तर किशोर काही फुटांवर मागे! लांबवर खाली दोन ठिपके वर सरकताना दिसत होते. निश्चितच मोरे नि डॉक्टर! पोर्टर कधी पुढं, कधी मागं करीत सर्वांना पाणी पुरवत होता. दुपारचा एक वाजला होता. शेवटचं टोक आवाक्यात आलं, असं नुसतंच वाटायचं. पण ते दूरवरच आम्हांला वाकुल्या दाखवत उभं असायचं. अजून अर्धा तास चालावं लागणार, असं दिसतं. राम विश्रांतीसाठी उभा होता. थोडा खाली किशोरही विश्रांती घेत होता. त्याची विश्रांती घेण्याची एक वेगळीच स्टाईल आहे. चढावर चालता-चालता वरच्या बाजूच्या दगडावर पुढचा पाय ठेवायचा, त्या वाकलेल्या गुडघ्यावर दोन्ही हात जुळवून, वाकून उभं राहायचं. विचारवंत सॉक्रेटिसची पोज!

प्रत्येकाची विश्रांतीची स्टाईल वेगळीच. सबनीसची विश्रांतीची पद्धत देव आनंदासारखी! हातपायांतून वारा गेल्याप्रमाणे बुजगावण्यासारखं उभं राहणं! पुढं आलेले मामा व सबनीस काही दिसले नाहीत.

–आणि आता मी व राम शेवटच्या उंच टोकावर पोचलो होतो. वारा सुसाट धावत होता. आम्हांला दगडांचे आधार घेऊनच उभं राहावं लागत होतं. पठार चढताना एव्हरेस्ट पाठीशी होता. आता एका दगडावर बसून तो सुवर्णमय क्षण उपभोगू लागलो. जगातील उच्चतम टोक असलेला एव्हरेस्ट जेथून जास्तीत जास्त दिसेल, अशा उंच

पठारावर आम्ही बसलो होतो. कष्टमय आनंद, उल्हास आमच्या चेहऱ्यांवरून ओसंडू लागला होता.

एव्हरेस्टच्या एका बाजूनं चो ला पासून खुंबुत्से ते थेट प्युमोरीपर्यंत गेलेली हिमशिखरांची वलयांकृत रांग, तर दुसऱ्या बाजूनं नुत्से-लुत्सेपासून अवादआलम थॅमसेस्कू अशी हिमशिखरांची रांग! ह्या सर्व हिमशिखरांच्या रांगेत, या हिमकोंदणात मधे शोभून दिसत होता हिम नसलेला हिरा–एव्हरेस्ट–सागरमाथा! हिमकोंदणातील हिरा!

आश्चर्य वाटून मी स्वतः स्वतःशीच हसलो. आश्चर्य वाटत होतं. ते एव्हरेस्टवर बर्फ नसल्याचं!

दुपारचे पावणे दोन वाजत होते. आम्ही आता उभे आहोत १८,१९२ फुटांवर, की जिथला वारा आम्हांला साहवत नव्हता. उभा राहू देत नव्हता. एव्हरेस्टची उंची आहे. २९,०२८ फूट म्हणजे अजून ११००० फूट उंच, त्या टोकावर वाऱ्याचा जोर काय असेल? वाऱ्याच्या जोर जबरदस्त असल्यामुळं पडणारं बर्फ त्याच्या माथ्यावर पडूच शकत नाही. ते वाऱ्याच्या फटकाऱ्यामुळं बाजूला फेकलं जातं; नि म्हणूनच एव्हरेस्टवर बर्फ नाही. पूर्ण हिमालय ज्या बर्फासाठी हिमासाठी प्रसिद्ध, म्हणूनच ज्याचं नाव हिमालय, त्या हिमालयातील सर्वांत उंच असलेलं शिखर एव्हरेस्ट–सागरमाथा. तिथं मात्र बर्फ नाही. कुणाला सांगितलं, तर खरंही वाटणार नाही; नि म्हणूनच मला हसू आलं.

घरातील प्रगल्भ मनाच्या व्यक्तीनं म्हणावं की,

'बाबांनो, हे जे काही आहे. ते माझं नाही. हे मी सर्व तुम्हांला देतोय्. तुम्ही सुखात राहिलात, तर तेच माझं समाधान...'- ह्या वृत्तीचा होता एव्हरेस्ट! सर्व दुसऱ्याला देऊन टाकणारा; स्वतःजवळ काहीही न ठेवणारा, एकदम निःस्वार्थी म्हणून तर त्याला सर्वोच्च स्थान मिळालं नसेल ना! काहीही असो, पण तो 'हिमकोंदणातील हिरा' पाहण्यात मी भान हरपलो होतो.

मी, राम व किशोर थांबलो असतानाच मोरे व डॉक्टर तिथं आले. डॉक्टरांनी त्या उंच स्थानावर ठेवण्यासाठी गगनगिरी महाराजांचा फोटो मोठ्या श्रद्धेनं आणला होता. माणसाची श्रद्धा कशी असते, नाही? एखाद्या ठिकाणी निःसीम श्रद्धा असेल, तर अवघड कामंही सहज–सोपी होत जातात. मी नाही का? रामदासांच्या त्या श्लोकांवर व त्यावरील टीका–टिपणीवर श्रद्धा ठेवून इथपर्यंत पोचलो होतो.

वाऱ्याच्या सपक्यामुळं तिथं जास्त बसणं शक्यच नव्हतं. आम्ही सर्वच थोडे खाली उतरलो नि एका कड्याच्या आडोशाला बसलो.

उजव्या बाजूला मोरे बसले होते, तर डाव्या बाजूला डॉक्टर बसले होते. राम व किशोर बसले होते. पंचायतन जमून आलं होतं.

मी टक लावून एव्हरेस्टकडे बघत होतो.

किती भाग्याचा क्षण होता माझ्या आयुष्यातला! मनात इच्छा होते काय नि मी एव्हरेस्टजवळ आलो काय? सगळंच अकल्पित नि अनाकलनीय!

कुठल्या तरी झाडाच्या पालापाचोळयानं गगनाला भिडण्याची अपेक्षा करावी नि क्षणात वादळाचा तडाखा बसून तो पाचोळा उंच गगनाला भिडावा, तसंच माझ्या बावतीतही झालं.

मी एकटा ह्या सर्व प्रकाराशी अनभिज्ञ असलेला, पण या सर्व सहकाऱ्यांनी, सुहृदांनी इथपर्यंत आणून पोचवला. यात माझं काय होतं? काही सुद्धा नाही.

गेल्या दहा-बारा दिवसांची वाटचाल डोळयांसमोरून सरकू लागली. प्रत्येक कष्टमय क्षण आठव देत होता.

नामचेचा चढ काय किंवा थँगबुचेचा उतार काय? तो संपल्यावर मुक्कामाला हसतमुखानं प्रत्येकाचं स्वागत करणारा किशोर.

फुंगीतांगा इथं नदीत आंघोळ करताना आधीच जवळीक साधलेले, नि आता अधिक जवळ आलेले– चेष्टेनं माझी पाठही घासणारे मोरे...

झुलत्या पुलावर माझी झालेली त्रेधा-तिरपीट पाहून योग्य टेक्नीक सांगणारा, प्रसंगी रागावणारा, चिडणारा चंद्रशेखर सबनीस.

'तुला मानलं, यार, पहिलंच ट्रेकिंग नि एव्हरेस्टला! लोकांना तपश्चर्या करावी लागते. पण तुझं मात्र सगळं अप्रूपच!' असं म्हणून माझं मनोधैर्य वाढविणारे डॉ. मुकुंद भालेराव.

एकदा गप्पांच्या ओघात गाण्यांमध्ये प्रतीकं कशी कशी घेतली जातात. कवीनं त्याला अध्यात्माचा स्पर्श कसा केलेला असतो, यावर विषय चालला असताना हळुवार झालेला. लाजरा-बुजरा, चढ चढताना नेहमी माझ्या मागे असणारा, थकल्यानंतर माझ्या मनातली इच्छा 'थांबू या थोडा वेळ' बोलून सारखा पाठीशी असणारा राम चव्हाण.

'मी तुमची सॅक घेऊ का थोडा वेळ, नाही तर तुमचं काही सामान माझ्या सॅकमध्ये टाकू या' असं म्हणून मदत करणारा मानसिंग शिंदे.

बिनधास्त असणारा, जिद्दीनं पेटून, नसलेल्या वाटेनंही अनभिज्ञ डोंगरावर चढणारा व बरोबर मलाही नेणारा– दीपक कोण्णूर!

प्रत्येकाचा माझ्या इथं येण्यात किती तरी सहभाग होता, तसं नसतं, तर मी इथं पोचलोच नसतो ना!

सगळं सगळं आठवू लागलं नि मी गदगदू लागलो. डोळयांच्या कडा पाणवू लागल्या होत्या.

'मग काय, एस्.आर्., शेवटी आपण पोचलो इथं!' मोरेंचा धीरगंभीर आवाज व माझ्या पाठीवर थाप पडली.

नि मग मला राहवलं नाही. चटकन् मोरेंच्या पायाकडे माझा हात गेला नि मी गदगदून म्हणालो.

'हे सर्व तुमच्यामुळं.'

त्यांनी चटकन् माझा हात उचलून घेतला, दुसरा हात डॉक्टरांच्या हातात होता. आणि एकदम पाऊस सुरू झाला. वातावरणात इतका काही बदल झाला नव्हता की, पाऊस सुरू व्हावा!

अरे, नाही! हा तर पाऊस नाही.

ह्या तर माझ्या डोळयांतून पडणाऱ्या अश्रूंच्या धारा आहेत. ते आनंदाश्रू पुसून टाकण्याचा मी प्रयत्न केलाच नाही.

चार- पाच मिनिटं अशाच अवस्थेत गेली. सर्वांनाच त्या सुखद क्षणानं भारावून टाकलं होतं.

एकमेकांचं अभिनंदन करताना आवाज भरून आले होते.

त्या अभिनंदनाच्या आनंदातून मी थोडा अलिप्त होऊ लागलो होतो. अंतर्मुख होऊ लागलो होतो. आडोसा धरून बसल्यामुळं वाऱ्याच्या घोंगावण्याचा आवाज कमी जाणवत होता. समोर एव्हरेस्ट स्थितप्रज्ञासाखा, तर त्याच्या समोर मी.

एव्हरेस्टवरून नजर बाजूला काढावी, असं वाटतच नव्हतं.

मी आत कुठं तरी शांत होतोय्, असं वाटू लागलंय्... मन, चित्त, दृष्टी सगळं एकाग्र झालं होतं. देहभान तर हरवलंच होतं. श्वासोच्छ्वास संथ लयीत चालू असावा. कारण आता मला काहीच कळत नव्हतं, जाणवत नव्हतं. शरीर मोराच्या पिसासारखं हलकं झालं होतं. मन निर्विकार झालं होतं. तर निरपेक्ष नजर समोरच्या अप्रतिम दृश्यावर स्थिरावली होती.

साक्षात ईश्वराचा वत्सल हात अंगावरून फिरावा, तसं एकदम शांत शांत वाटत होतं. आनंदभरानं डोळे मिटले, तर अंतश्चक्षूंवरही एव्हरेस्टचंच दर्शन. दिव्यचक्षू लाभल्यानंतर, अर्जुनास अंतर्बाह्य जसं विश्वरूपदर्शनच होत होतं, तशी एव्हरेस्टनं माझी स्थिती केली होती.

एव्हरेस्टच्या रूपानं समोर हातांची मिठी झालून आश्वासक नजरेनं पाहणारे विवेकानंद दिसत होते, तर 'अहं स्थावराणां हिमालयः' असं निश्चयी स्वरात सांगणारा सदासतेज असा श्रीकृष्ण स्मितहास्य बरसताना दिसत होता. काल पहाटेपासूनच मला जी अनाकलनीय हुरहुर लागली होती, अनिवार ओढ लागली होती, ती याचीच तर नव्हे?

माझी तपश्चर्या फळाला आली होती. साक्षात ईश्वरच एव्हरेस्ट-स्वरूप दर्शन देतोय्. या एव्हरेस्टपेक्षा वेगळा असणार आहे का तो? नाही! निश्चितच नाही. तोच तो परम ईश्वर. गेला महिना, दोन महिने ज्या एकाच विचारानं व त्या विचाऱ्यांच्या कृतीनं मी भारावलो होतो, आता एव्हरेस्टचं दर्शन हेच एक उद्दिष्ट अंतःकरणात ठसवलं होतं, ते प्रत्यक्ष साकार झालं होतं.

श्री ज्ञानदेवांनी वर्णिल्याप्रमाणे निर्वातीचा दिवा कसा शांत तेवत राहतो, तशी